
अल्पावधीत लोकप्रिय ठरलेले ग्रंथप्रसाराला वाहिलेले दर्जेदार मासिक

# मेहता मराठी ग्रंथजगत

ऑगस्ट २०१०। किंमत १५ रुपये


दिवाळी अंक २०१०
वाचकांसाठी स्पर्धा
पान नं ७,८,९ पहा















Glimpses of Changing
Banking Scenario
**P.N. Joshi**





The Breadwinner
**Deborah Ellis**





Pravana's Journey
**Deborah Ellis**




Mud City
**Deborah Ellis**





Salt & Honey
**Candi Miller**




Call Centre
An Inside Story
**Vikrant Shukla**





The Myth Called Wealth
**Rajesh Wattamwar**




Master Your Mind
**Dr. Neel Burton**




The Meaning of Madness
**Dr. Neel Burton**




Plato's Shadow
**Dr. Neel Burton**




Cancer Care & Mysteries & Yoga
**Dr. Nitin Unkule**

Mehta
Publishing House
Fiction & Non-Fiction
Books

◆ ऑगस्ट २०१०
◆ वर्ष दहावे
◆ अंक आठवा

# मेहता मराठी ग्रंथजगत

## — अनुक्रमणिका —

| | |
|---|---|
| **संपादकीय** | **४** |
| **साहित्यवार्ता** | **१८** |
| **पुस्तक परिचय** | |
| **मना सर्जना :** डॉ. अनिल गांधी | **५०** |
| **रुसी मोदी : द मॅन हू ऑल्सो मेड स्टील :** अनु. अंजनी नरवणे | **५८** |
| **उधाण वारा :** अनु. विलास गीते | **६८** |
| **स्लमगर्ल ड्रीमिंग :** अनु. मैत्रेयी जोशी | **७४** |
| **पुरस्कार** | **८४** |
| **वाचकांचा प्रतिसाद** | **९३** |
| **श्रद्धांजली** | **९६** |
| **बालनगरी** | **१००** |

संपादक :
सुनील मेहता

कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

संपादन साहाय्य :
वंदना घाटगे

अंकाची किंमत १५ रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस

मांडणी-अक्षरजुळणी
*मेहता पब्लिशिंग हाऊस*

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
**Email -** info@mehtapublishinghouse.com
**Website - www.mehtapublishinghouse.com**

**वार्षिक वर्गणी १५० रु. तीन वर्षांची ३५०रु. पाच वर्षांची ५००रु. ३ किंवा ५ वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*

# संपादकीय

**पायरसीचा कॅन्सर**

प्रकाशन व्यवसायाचे महत्त्व सध्या देशांना आणि सर्व भाषांना नव्याने प्रतीत होऊ लागले आहे. कोणत्याही देशाच्या ज्ञानसत्तेचा पाया प्रकाशन व्यवसायाच्या भक्कमपणावर ठरतो, याची जाणीव झाल्यामुळे या व्यवसायाला जागतिक स्वरूप प्राप्त होत आहे. नवीन आशय निर्मितीचा हा उद्योग असून त्यात सातत्याने नवी भर पडत असते; ही आशयनिर्मिती करण्यासाठी त्या-त्या देशातील बुद्धिमान, नवनिर्मितक्षम व्यक्ती, विद्धान, व्यासंगी, कलावंत, शास्त्रज्ञ अभ्यासक, संशोधक, विविध विषयातील तज्ज्ञ यांचे सहकार्य घेण्यात येते आणि त्या आशयाला जागतिक पातळीवर नेण्याचा प्रयत्न केला जातो. देशादेशांतील सांस्कृतिक, सामाजिक, वैज्ञानिक सहकार्याला त्याद्वारे चालना दिली जाते. प्रकाशन संस्था पुस्तकांची निर्मिती करण्यासाठी लेखक, चित्रकार यांच्या प्रतिभेचा आणि अभ्यासाचा उपयोग करून घेतात आणि त्या पुस्तकांचे मार्केटिंग, प्रसिद्धी, वितरण, अनुवाद यासाठी प्रयत्न करून, पुस्तक जास्तीत जास्त वाचकांपर्यंत जावे या दृष्टीने वेगवेगळे उपक्रम राबवतात. पुस्तकाचा योग्यप्रकारे प्रसार झाल्यास लेखक-प्रकाशक या दोघांनाही आर्थिक फायदा होतो. त्या फायद्याच्या बळावर नवनवे प्रकल्प हाती घेणे शक्य होते.

परंतु सध्या लोकप्रिय पुस्तकांच्या अनाधिकृत, पायरेटेड प्रती सर्रास निघत आहेत; त्यामुळे लेखक-प्रकाशक यांचे प्रचंड नुकसान होत आहे. प्रकाशन व्यवसायाला या पायरसीच्या कर्करोगाने पार खिळखिळे करून टाकले आहे. पाश्चात्य देशातील बेस्ट सेलर पुस्तकांच्या पायरेटेड प्रती फूटपाथवर अगदी कमी दरात सहसा मिळतात; परदेशातील पाठ्यपुस्तकांच्या पायरेटेड प्रती विद्यार्थ्यांच्या हातात दिसतात. गेल्या वर्षी भारतात वेगवेगळ्या शहरात साडेपाच कोटी रुपयांची पायरेटेड पुस्तके जप्त करण्यात आली. पुस्तकांपेक्षाही चित्रपटांच्या बनावट सीडींचा खप मोठ्या प्रमाणावर होतो. नवा चित्रपट रिलीज झाला, की दुसऱ्या दिवशी सर्व प्रमुख शहरात फूटपाथवर चौकाचौकात त्या चित्रपटाच्या पायरेटेड सीडीज् उपलब्ध होतात. चित्रपट निर्माते पोलिसांकडे तक्रार करतात, तेव्हा पोलिस काही विक्रेत्यांवर छापे घालून माल जप्त करतात. पण बाकीचे विक्रेते आपला धंदा चालूच ठेवतात. पुस्तकांच्या आणि

चित्रपटांच्या अधिकृत प्रतींच्या किंमती या नेहमीच लेखक-कलावंतांचे मानधन, निर्मात्यांचा नफा आणि उत्पादनाचा दर्जा या गोष्टी लक्षात घेऊन ठेवल्या जातात. पायरसी करणाऱ्यांना या सर्व बाबींचा विचार करण्याची गरज नसते. सुमार उत्पादन दर्जामुळे पायरेटेड पुस्तकांची निर्मिती स्वस्तात होते आणि बाजारात त्यांची विक्री अल्प किंमतीत होते. मूळ किंमतीपेक्षा खूपच कमी खर्चात पुस्तके वाचायला मिळू शकतात. चित्रपटांच्या बनावट सीडींची निर्मिती ही तर, त्यापेक्षाही सोपी गोष्ट असते आणि सीडी अधिकच स्वस्तात तयार करता येते. त्यामुळे पायरेटेड पुस्तके आणि सीडी यांना मोठा ग्राहकवर्ग लाभतो.

परदेशातील प्रकाशक आणि चित्रपट निर्माते भारतीय बाजारपेठेतील पायरसीच्या प्रचंड प्रसारांमुळे फारच अस्वस्थ आहेत आणि ते भारत सरकारकडे त्याबद्दल पुन:पुन्हा तक्रारी करत असतात. त्यांच्या दडपणामुळे सरकार काही ठिकाणी छापे घालते, परंतु या कृतींमध्ये सातत्य नसते. त्यामुळे पायरसीला आळा बसत नाही. भारतातील पायरसीची अद्ययावत माहिती मिळविण्यासाठी परदेशी प्रकाशक व चित्रपट निर्माते भारतातील गुप्तहेर यंत्रणांची आणि कायदेतज्ज्ञांचीही मदत घेत असतात. पायरेटेड प्रती बाजारात येऊ नयेत, म्हणून भारतीय प्रकाशकांना वा सीडी उत्पादकांना भारतापुरते हक्क विकण्याचा मार्गही काहीजण पत्करत आहेत. त्यामुळे थोडे का होईना, निश्चित उत्पन्न मिळू शकेल असा विचार ते करीत असतात.

युनायटेड स्टेटस ट्रेड रिप्रेझेंटेटिव्हच्या कार्यालयाने इ.स. २०१० मध्ये तयार केलेल्या स्पेशल रिपोर्ट ३०१ नुसार पुस्तके आणि नियतकालिके यांची पायरसी ४० देशात मोठ्या प्रमाणात होत आहे असे दिसते. 'स्पेशल वॉच लिस्ट'मध्ये भारताचे नाव अग्रभागी आहे. ट्रेड बुक्स, पाठ्यपुस्तके, व्यावसायिक पुस्तके (शास्त्रीय, तंत्रज्ञानविषयक आणि वैद्यकीय), आणि ॲकॅडमिक जर्नल्स यांची पायरसी प्रकाशन व्यवसायाला भेडसावत आहे. खरे म्हणजे या सर्व प्रकारच्या पुस्तकांच्या आणि जर्नल्सच्या किंमती भारतात खूप कमी ठेवण्यात येतात. जगात सर्वांत कमी दरात ही पुस्तके भारतात अधिकृतपणे मिळतात. तरीही त्यांची पायरसी चालू आहे, याबद्दल या रिपोर्टात आश्चर्य व्यक्त करण्यात आले आहे. या पायरसीमुळे लेखक आणि प्रकाशक यांचे नेमके किती नुकसान होते याची आकडेवारी या अहवालात देण्यात आलेली नाही.

गेली १० वर्षे इंग्लंडमधील 'पब्लिशर्स असोसिएशन' आणि 'दि असोसिएशन ऑफ पब्लिशर्स इन इंडिया' यांच्या संयुक्त विद्यमाने ॲटी-पायरसी मोहीम सुरू आहे. मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या पायरसीचा बंदोबस्त करण्याचा प्रयत्न या मोहिमेद्वारे होत आहे.

भारतीय कायदे आणि न्याय यंत्रणा कॉपीराइट कायद्याच्या बौद्धिक संपत्तीच्या

केसेस जलद गतीने मार्गी लावण्यात कमी पडतात. त्याबाबत अधिक जागृतीची गरज आहे.

लेखकाच्या बौद्धिक संपत्तीचे मोल जाणून पुस्तके अधिकृतपणेच विकत घेण्याची प्रवृत्ती वाचकांमध्ये दृढमूल करायला हवी. पुस्तकाच्या निर्मितीसाठी होणारी गुंतवणूक आणि परिश्रम यांचा प्रकाशकाला रास्त मोबदला मिळायला हवा. याबाबत सर्वसामान्य वाचकांनीही मानसिकदृष्ट्या तयारी ठेवायला हवी.

परदेशातील पाठ्यपुस्तके मूळ किमतीच्या एक दशांश किमतीत विद्यार्थ्यांना मिळतात, तेव्हा त्यांच्या अधिकृत आवृत्त्याच घेण्याची नैतिक जबाबदारी आपण दाखवायला हवी.




**सर्व वाचक, सभासद वर्गणी भरण्यासाठी, व पुस्तके मागविण्यासाठी खालील पत्त्यावर संपर्क साधा**

## मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी
मंडपाजवळ, कोल्हापूर ४१६ ०१२.
वेळ : सकाळी ९ ते रात्री ८
(शनिवारी बंद)
फोन : (०२३१)२५४२९०१.
टेलिफॅक्स : (०२३१)२५४१८८१.
Email : mehtabooks@eth.net


## सभासदांना सूचना

आमच्या प्रिय वाचकांनी, तसेच सभासदांनी वर्गणीचे नूतनीकरण करावे.
कृपया वर्गणीत वाढ झालेली आहे
हे लक्षात ठेवून वर्गणीची पूर्ण रक्कम पाठवावी.
पुस्तक खरेदीस येताना मेंबरकार्ड जरूर आणावे.
ही नम्र विनंती.

# दिवाळी अंक २०१०

## रसिक वाचकांसाठी स्पर्धा
## एक हजार रुपयांची पुस्तके बक्षिस मिळवा

**वाचक मित्रांनो,**

- या दिवाळी अंकासाठीही एक स्पर्धा जाहीर करत आहोत.

- ही स्पर्धा सर्वांसाठी खुली आहे. फक्त अट एवढीच की इ.स. २००९-२०१० मध्ये तुम्ही एका पेक्षा जास्त पुस्तके विकत घेऊन वाचलेली असावीत.

- किमान दोन पुस्तके तरी दोन वर्षात विकत घेतलेली असणे आवश्यक. त्यासाठी बिल वगैरे पुरावा देण्याची गरज नाही. तुमच्या शब्दावर आमचा विश्वास आहे.

- आपण खरेदी केलेल्या पुस्तकांची नावे **(जास्तीत जास्त दहा)** पोस्टकार्डावर लिहून कळवा.

- त्यातील तुम्हाला सर्वात जास्त आवडलेल्या पुस्तकाबद्दल तीनचार ओळीत माहिती द्या.


- या स्पर्धेत भाग घेणाऱ्यांची नावे दिवाळी अंकात छापण्यात येतील.

- लॉट टाकून यशस्वी ठरणाऱ्या दोन स्पर्धकांना प्रत्येकी १,००० रुपयांची पुस्तके बक्षीस म्हणून देण्यात येतील

**पत्र पोचण्याची अंतिम मुदत ५ सप्टेंबर २०१०**

**आमचा पत्ता :**

मेहता पब्लिशिंग हाऊस, संपादक, मेहता मराठी ग्रंथजगत
१९४१ माडीवाले कॉलनी, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.
फोन – ०२०-२४४७६९२४




# दिवाळी अंक २०१०

## बालमित्रांसाठी स्पर्धा
## गमतीदार बातमी कळवा
## बक्षीस मिळवा

**बालमित्रांनो,**

यावर्षी तुमच्यासाठी एक मजेदार स्पर्धा घेणार आहोत. अगदी सोपी आणि मस्त. बारावी पर्यंतच्या मुलामुलींना या स्पर्धेत भाग घेता येईल.

- तुमच्या घरी रोज सकाळ, लोकसत्ता, लोकमत, महाराष्ट्र टाइम्स यासारखे एखादे दैनिक येतच असेल, ते तुम्ही वाचतही असाल. त्यातली एखादी बातमी तुम्हाला मजेदार वाटत असेल, ती वाचून तुम्हाला हसू आले असेल, मित्रांना ती बातमी सांगाविशी वाटली असेल.
- आमची स्पर्धा अशा मजेदार बातमीबद्दलचीच आहे.
- अशी मजेदार बातमी वाचनात आली तर ती कापून एका कोऱ्या कागदावर चिकटवा. त्या वर्तमानपत्राचे नाव, तारीख त्या बातमीखाली लिहा. ती बातमी तुम्हाला मजेदार का वाटली ते ४/५ ओळीत लिहा. खाली तुमचे नाव, इयत्ता, शाळा व घरचा पत्ता, फोन हे सर्व लिहा. आणि हा बातमी चिकटवलेला कागद आम्हाला पोस्टाने, कुरिअरने पाठवा.
- आम्हाला आवडलेल्या निवडक बातम्या दिवाळी अंकात छापू. पहिल्या तीन ठरणाऱ्या बातम्यांना प्रत्येकी ५०० रुपयांची पुस्तके बक्षीस म्हणून देऊ.
- तर मग आजपासूनच दैनिकातील मजेशीर बातम्या शोधायला लागा.
- **जुलै-ऑगस्ट** या दोन महिन्यातील बातम्यांतून गमतीदार बातम्या निवडा. पाठवा. आहे की नाही मज्जा?
- **अंतिम मुदत ५ सप्टेंबर २०१०**



**आमचा पत्ता :**

मेहता पब्लिशिंग हाऊस, संपादक, मेहता मराठी ग्रंथजगत
१९४१ माडीवाले कॉलनी, सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०. फोन – ०२०-२४४७६९२४

## धुलाईयंत्रात जाऊनही मांजर सुखरूप

सिडनी : मांजरांना उगाच लुडबूड करण्याची खोड असते आणि अनेकदा ती त्यांच्या जीवावरही बेतू शकते. असाच एक प्रसंग येथील एका मांजराच्या बाबतीत घडला. किंबा नावाचे हे मांजर मालकाच्या नकळत आराम करण्यासाठी घरातल्या धुलाई यंत्रात शिरले. पण, त्याचा आराम फार काळ टिकला नाही. कारण, काही वेळातच मालक लिंडसे रॉगर यांनी धुलाई यंत्र सुरू केले. अर्ध्या तासाने त्यांनी धुलाई यंत्र उघडले, तेव्हा त्यांना आतून 'म्याव' आवाज आला. त्यांनी नीट तपासले, तेव्हा त्यांना धक्काच बसला. आत किंबाबाई होत्या. कपड्यांबरोबरच त्यांचीही चांगलीच धुलाई झालेली होती. त्यानंतर रॉगर यांनी तातडीने किंबाला जवळच्या पशुरुग्णालयात नेले. वेळीच उपचार केले म्हणून मांजर वाचले.


## चोरानेच बोलावले पोलिसांना

बोस्टन (अमेरिका) : येथील एक चोर एका दुकानात चोरी करण्यासाठी गेला, पण तो स्वतःच अडचणीत सापडल्याने त्याच्यावर पोलिसांना फोन करण्याची वेळ आली. त्याचे झाले असे; दक्षिण बोस्टनमधील एका दुकानात सर्व तयारीनिशी हा चोर पोचला. त्याला एका खिडकीतून आत घुसण्याची युक्ती सुचली. खिडकीला लोखंडी जाळी बसवलेली होती, तिचे गज वाकवून आत घुसण्याचे त्याने ठरवले. त्याप्रमाणे गज वाकवला आणि गजातून तो आत शिरला; पण हाय! येथेच त्याचा अंदाज चुकला. त्या जाळीत तो अशा पद्धतीने अडकला, की त्याला अजिबात हलता येत नव्हते. शेवटी मदतीसाठी त्याने आपल्या मोबाईलवरून पोलिसांना फोन केला. पोलिसांनी तातडीने येऊन त्याची सुटका केली आणि नंतर त्याला रीतसर अटकही केली.

## जन्म आणि लग्नही साथ साथ

बुशकिल (अमेरिका) : काही लोकांच्या बाबतीत बरेच योगायोग जुळून येतात. पेनसिल्वानिया प्रांतातल्या ॲमी सिंगले आणि स्टीव्हन स्मिथ त्यापैकी एक. ते दोघेही एकाच दिवशी, एकाच रुग्णालयात, जन्माला आले. त्यांच्या जन्मानंतर दोघांच्याही माता रुग्णालयाच्या एकाच खोलीमध्ये राहिल्या. आता ते दोघेही एकमेकांशी लग्न करणार आहेत. याचे कारण त्यांच्या आयांनी बाळंतपणाच्या वेळेस झालेली मैत्री शेवटपर्यंत टिकवली. त्यांच्या मैत्रीचा हा वारसा त्यांची मुले, ॲमी आणि स्टीव्हन यांनी पुढे चालवला आणि एकमेकांशी मैत्री केली. त्यातूनच स्टीव्हनने ॲमीला लग्नाची मागणी घातली आणि तिनेही होकार दिला. आता लवकरच ते विवाहबद्ध होणार आहेत.

## टी बुक क्लब १८ मधील सहावे पुस्तक




# नेक्स्ट

**मायकेल क्रायटन**
अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर

**४००रु.**
टी बुक क्लब सभासदांना **२००रु.**
**पोस्टेज ३०रु.**

कर्करोगाच्या उपचारांसाठी आलेल्या रुग्णांच्या पेशी मिळवून त्या विद्यापीठाला विकणारा डॉक्टर. या पेशींच्या मालकीसाठी काहीही करायला तयार असणारे उद्योगपती आणि मतलबी प्राध्यापक. चिम्पँझी मादीच्या जनुकसंचात स्वत:चेच जनुक मिसळून बेकायदेशीररीत्या 'ह्यूमंझी' बनवणारा बेजबाबदार जीवशास्त्रज्ञ.

धर्म आणि विज्ञान यांची चलाखीनं सरमिसळ करणारा, आपल्या विद्यार्थ्यांचं संशोधन चोरणारा आणि राजकारणात राजकारण्यांनाही मागे टाकणारा शास्त्रज्ञ रॉबर्ट बेलार्मिनो. स्वत:ची तुंबडी भरण्यासाठी कोणत्याही थराला जाणारे प्रसिद्धी माध्यमांचे लोक. या सगळ्या काळ्या पार्श्वभूमीवर मनोरंजन करणारा आणि गणित सोडवणारा बुद्धिमान पोपट....

या सगळ्यातून तयार होते प्रश्नांची मोठी मालिका.

उत्तरं नसलेले, अस्वस्थ करणारे प्रश्न....

मन मानेल ते करायला सज्ज असणारं आजचं जीवशास्त्र पाहता

पुढे काय होणार?

## टी बुक क्लब १८ मधील प्रकाशित झालेली पुस्तके

| | | | |
|---|---|---|---|
| डिसेप्शन पॉईंट | डॅन ब्राऊन | अनु. अशोक पाध्ये | ५०० |
| द अॅटर्नी | स्टीव्ह मार्टिनी | अनु. अजित ठाकूर | ३५० |
| क्रायसिस | रॉबिन कुक | अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर | ३५० |
| वन शॉट | ली चाइल्ड | अनु. बाळ भागवत | ३४० |
| द फर्म | जॉन ग्रिशॅम | अनु. अनिल काळे | ४४० |

T BOOK CLUB
या क्लबचे सभासद व्हा.
आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके
निम्म्या किमतीत मिळवा!

# T बुक क्लब १९

नोंदणी सुरु

**सभासद फी ५०रु. आजच सभासद व्हा!**

जगप्रसिद्ध इंग्रजी कादंबऱ्यांचे सरस मराठी अनुवाद आणि तेही निम्म्या किमतीत! एका क्लबमध्ये ६ पुस्तके,
ही सहाही पुस्तके घेणे आवश्यक!

## टी बुक क्लब १९ मधून प्रकाशित होणारी पुस्तके

| **पुस्तकाचे नाव** | **मूळ लेखक** | **अनुवाद** | **किंमत** (अंदाजे) |
|---|---|---|---|
| सीविच | अॅलिस्टर मॅक्लीन | अनु. अशोक पाध्ये | २२० |
| पिरॅमिड | टॉम मार्टिन | अनु. उदय भिडे | ३०० |
| द असोशिएट | जॉन ग्रिशॅम | अनु. अशोक पाथरकर | ३०० |
| द गिफ्ट ऑफ रेन | टॅन ट्वॅन इंग | अनु. अशोक पाथरकर | ४०० |
| नथिंग टू लूज | ली चाइल्ड | अनु. उदय कुलकर्णी | ३५० |
| डिजीटल फोर्ट्रेस | डॅन ब्राऊन | अनु. अशोक पाध्ये | ४८० |

वाचकांनी आपली सभासद फी (५०रु.) डी.डी. अथवा मनीऑर्डरने
'मेहता पब्लिशिंग हाऊस' येथे पाठवावी.

**आगामी**




# पानगळीच्या आठवणी

**शोभा चित्रे**

'गोठलेल्या वाटा', 'गौरी, गौरी कुठे आलीस?' या सारख्या अत्यंत लोकप्रिय ठरलेल्या शोभा चित्रे यांच्या पुस्तकांनंतर आता 'मेहता पब्लिशिंग हाऊस'तर्फे येणारी 'पानगळीच्या आठवणी' या गाजलेल्या पुस्तकाची ही दुसरी आवृत्ती.

म्हटलं तर हे आत्मकथन आहे. त्यातील कथानकाला विशिष्ट काळाच्या, प्रसंगांच्या मर्यादा आहेत. हे शोभा चित्रे यांच्याच जीवनातले प्रसंग जरी असले तरी ते त्यांच्याच कुटुंबापुरते सीमित आहेत. मध्यमवर्गात जन्मलेली लेखिका अमेरिकेतल्या जीवनाचा स्वीकार करून जगत असताना, बदलत्या काळाबरोबर विविध अनुभवांना तोंड देत असताना बदलली नाही ती फक्त एकच गोष्ट. ती म्हणजे मनावरचे मध्यमवर्गीय संस्कार.


लग्नानंतरच्या आयुष्यात निर्माण झालेले नवे भावबंध, नातीगोती, मनावरचे मध्यमवर्गीय संस्कार जोपासताना परदेशातील आयुष्यात वाट्याला आलेली अटळ धडपड ही त्यांची वैयक्तिक जरी असली तरी ती वाचकाला प्रातिनिधिक वाटेल. पण त्याही पलीकडे, जीवनातल्या एका विशिष्ट अनुभवावर लिहितालिहिता त्यांचं भावविश्व इतकं विस्तारलं जातं की, तो सीमित अनुभव जणू सर्वस्पर्शी बनतो आणि वाचकाला अंतर्मुख करून टाकतो.

'पानगळीच्या आठवणी' ही प्रत्येकाने आवर्जून वाचावी अशी भावनाप्रधान साहित्यकृती. जीवघेण्या विलक्षण अनुभवाचा वेध घेत सांगितली जाणारी ही प्रांजळ कथा हृदय हेलावून सोडते, हे नि:संशय.

आगामी

# चिकन सूप फॉर सोल

**भाग ४**





अनुवाद
**उषा महाजन**

'चिकन सूप फॉर द सोल' या पुस्तकाच्या पहिल्या तीन भागांप्रमाणे या चौथ्या भागात जॅक कॅनफिल्ड आणि मार्क हॅन्सेन हे सुप्रसिद्ध लेखक परत एकदा देशविदेशातनं आत्मबळ वाढवणाऱ्या नव्या कथा मागवून त्यांची मेजवानीच घेऊन वाचकांच्या भेटीला आले आहेत. या वेळी त्यांच्या बरोबरीने प्रथमच हॅनॉक आणि लेडी मॅकार्टी या दांपत्यानं या संकलनकार्यात अमूल्य असा हातभार लावला आहे.

प्रेम, शिकवणूक, पालकत्व, बुद्धिमत्ता, अडचणींवर मात, स्वप्नपूर्ती, मृत्यू, वाईटातनं चांगलं शोधण्याची कला अशा प्रत्येकाच्या जिव्हाळ्याच्या विषयांशी निगडित असलेल्या हृदयस्पर्शी कथांचा नवा ठेवा या चौघांनी मिळून वाचकांसमोर उलगडला आहे.

या कथांवर मनन-चिंतन करून तुम्हा-आम्हा सर्वांचाच जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलून जाईल आणि बिकट सद्य:परिस्थितीमध्ये अशाच परिवर्तनाची निकडीची आवश्यकता आहे, याबद्दल वादच नाही.

आपापल्या मूडनुसार, वेळेनुसार कोणतेही पान उघडावे न तेवढेच वाचूनही वाचनानंद मिळवावा असे हे पुस्तक




# वपुर्झा

**व. पु. काळे**

**१८०रु. पोस्टेज २५रु.**

व.पु. काळे ह्यांचे हे पुस्तक. कथा-कादंबरी वगैरे कोणत्याही प्रचलित साहित्यप्रकारात बदलता येणारे नसले, तरी वपुस्पर्श झालेला हा वैविध्यपूर्ण लेखनगुच्छ असा आहे, की वाचकांनी भरभरून दाद दिल्याने गेल्या बावीस वर्षांत त्यांचे सतरा वेळा पुन:पुन्हा मुद्रण करावे लागले आहे. एकाचा दुसऱ्याशी संबंध नसलेल्या तरीही त्यांच्यात एक धागा असलेल्या अनेक ढंगी परिच्छेदांची सुरेख गुंफण ह्या पुस्तकात गुंफण्यात आली आहे. त्यामुळेच आपल्या इच्छेनुसार हाताला लागेल ते पान उघडावे आणि त्या पानावरील लिखाणात मग ती एखादी छोटीशी गोष्ट असो वा मोजक्या शब्दात सांगितलेला तो एक विचार असो रंगून जावे, असे हे पुस्तक आहे. हा एक मुक्त आनंद आहे म्हणूनच त्याला शीर्षक-क्रमांक-संदर्भ वगैरेचे बंधन नाही.

भगवद्गीता हा मानसशास्त्रावरील पहिला ग्रंथ होय.

# आपण सारे अर्जुन




**व. पु. काळे**

**१००रु. पोस्टेज २०रु.**

आपल्या कथाकथनाने हजारो रसिकांना हास्यअश्रूंच्या लाटेवर लीलया लोटून देणारे कथाकार वसंत पुरुषोत्तम काळे यांना ब्रेन ट्युमरने मृत्यू पावलेल्या आपल्या प्रिय पत्नीच्या दुराव्यानंतर अंतर्बाह्य उन्मळत असल्याचा प्रत्यय आला. आपण सुपर संभ्रमात विषादावस्थेत सापडलो आहोत असे वाटले. त्या मन:स्थितीतून बाहेर पडण्यासाठी त्यांना एका मित्राने ओशो रजनीश यांच्या गीतेवरील प्रवचनांच्या कॅसेट्स भेट देऊन, त्या ऐकण्यास सांगितले. आणि आश्चर्य हे की त्या कॅसेटस ऐकून वपुंना जगण्याचे नवे बळ मिळाले. भगवद्गीता हा धार्मिक ग्रंथ नसून तो मानसशास्त्रावरचा पहिला जागतिक ग्रंथ आहे हे त्यांना उमगले. आपण स्वत:च अर्जुन आहोत, आणि स्वत:च नव्हे तर प्रत्येक माणूस हा अर्जुन आहे, आणि त्याला अर्जुनाप्रमाणेच आपण पदोपदी कोंडीत सापडल्याची, गोंधळल्याची, संभ्रमाची जाणीव होते, असेही त्यांना कळून चुकले.

महाभारताला शेवट नाही, फक्त सुरुवात आहे अशीही एक कल्पना वपु भारावून मांडतात. ओशो रजनीशांच्या कॅसेट्सनी आपल्याला श्रीकृष्ण उलगडून दाखवला, महाभारताचा वेगळा अर्थ सांगितला. माणूस कळायला एक नवा डोळा दिला असे म्हणून वपु "आपण सारे अर्जुन" या लेखमालेच्या रूपाने स्वैर व स्वच्छंद चिंतन मांडण्यासाठी सज्ज झाले आहेत. त्यातील पहिल्या १९ लेखांचा (किंवा प्रवचनांचा) हा संग्रह.

वपुंच्या कथाशैलीवर मराठी माणूस फिदा आहे. वपुंच्या गोष्टीवेल्हाळ प्रकृतीला असा स्वैर मुक्त चिंतनाचा फॉर्म साजेसा आहे.

## व. पु. काळे यांचे कथासंग्रह



### मोडेन पण वाकणार नाही

स्वत:च्या नाठाळ तत्त्वांसाठी नामशेष होणे
पत्करणाऱ्या विक्षिप्त व्यक्तींच्या तऱ्हेवाईक कथा


**८०रु. पोस्टेज २०रु.**



### गुलमोहर

वपुंच्या सुंदर, सदाबहार कथांचा संग्रह


**१००रु. पोस्टेज २०रु.**



### कर्मचारी

आपलीतुपली म्हणजे आपल्यासारख्याच मध्यमवयीन,
मध्यमवर्गीय कर्मचाऱ्यांची ही कथा
पण वपु स्टाईल मधील

**११०रु. पोस्टेज २५रु.**




### दोस्त

स्वातंत्र्यपूर्व काळातील ग्रामीण जीवनाचे मनोवेधक
चित्रण करणारी कादंबरी

**१२०रु. पोस्टेज २५रु.**

# व. पु. काळे यांच्या कादंबऱ्या

## पार्टनर



एकदा वाचून समाधान होऊ नये
अशी फर्मास दिवाणी-कहाणी

**१२०रु. पोस्टेज २५रु.**

## ही वाट एकटीची




वाचकाला प्रथमपासून अखेर पर्यंत धरून ठेवेल
अशी ही एकटीच्या वाटेची कहाणी

**१२०रु. पोस्टेज २५रु.**


## तू भ्रमत आहासी वाया



नायिकेच्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाच्या प्रकाशानं झळाळून
उठलेली, मनाला व्यापून उरणारी कादंबरी

**७०रु. पोस्टेज २०रु.**

## ठिकरी




नियतीच्या खेळात वेगवेगळ्या परिस्थितीत
ठिकरी प्रमाणे फेकल्या गेलेल्या
एका मनस्वी मुलीची विलक्षण कहाणी

**६०रु. पोस्टेज २०रु.**

# साहित्यवार्ता



*** 'नटरंग' चित्रपटाची म्युनिच चित्र महोत्सवामध्ये निवड**

प्रतिष्ठेचा मानल्या जाणाऱ्या युरोपमधील म्युनिच फिल्म फेस्टिव्हलसाठी 'नटरंग' या सर्वोत्कृष्ट ठरलेल्या मराठी चित्रपटाची निवड झाली आहे. २५ जून ते ३ जुलै या कालावधीत हा चित्रपट महोत्सव आयोजित करण्यात आला होता.

जगभरातील सर्वोत्कृष्ट चित्रपटांचा सहभाग यंदाच्या २८ व्या चित्रपट महोत्सवामध्ये होता. त्यामध्ये 'नटरंग' या मराठी चित्रपटाची निवड करण्यात आली होती. मराठी चित्रपटसृष्टीत मानाचा तुरा रोवणाऱ्या या चित्रपटाची रौप्यमहोत्सवी आठवडाही सादर करण्यात आला होता. जर्मनी येथे 'नटरंग' या चित्रपटाने महोत्सवाचे उद्‌घाटन झाले. ४८ देशांमधून २०० चित्रपट या महोत्सवात दाखविण्यात आले.

*** चंद्रमोहन कुलकर्णींच्या चित्राची 'ऑक्सफर्ड'कडून निवड**

प्रसिद्ध चित्रकार चंद्रमोहन कुलकर्णी यांचे चित्र ब्रिटनमधील ऑक्सफर्ड प्रकाशन संस्थेने पुस्तकाच्या मुखपृष्ठासाठी निवडले आहे. दुसऱ्या एका पुस्तकासाठी या प्रकाशन संस्थेने त्यांच्याकडून रेखाचित्रेही तयार करून घेतली आहेत.

चंद्रमोहन यांची 'चाइल्डहूड लॉस्ट' ही चित्रमालिका गाजली होती. त्या मालिकेतील एक चित्र पुण्यात खासगी संग्राहकाकडे आहे. हे चित्र इंटरनेटवर पाहून ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसची सहसंस्था असलेल्या 'ऑक्सफर्ड बुकवर्म्स लायब्ररी' या प्रकाशन संस्थेने मुखपृष्ठासाठी मागितले. आता हे चित्र क्लेअर वेस्ट यांनी संपादित केलेल्या 'केजिंग ॲट स्टॉर्म' या पुस्तकाच्या मुखपृष्ठावर झळकणार आहे. या पुस्तकात आशियातील उत्तम कथांचा समावेश आहे. तसेच, सहाना चौधरी यांच्या 'इव्हिनिंग ट्रेन' या पुस्तकासाठी चंद्रमोहन यांच्याकडून 'ऑक्सफर्ड'ने रेखाचित्रेही काढून घेतली आहेत. या पुस्तकात भारत, नायजेरिया, न्यूझीलंड, मलेशिया व ब्रिटन या देशांतील कथा असतील. या कथा मुलांसाठी सांगितल्या आहेत. त्यासाठी प्रकाशन संस्थेने 'कॉमनवेल्थ शॉर्ट स्टोरीज कॉम्पिटिशन' भरविली होती.

*** साहित्यप्रेमी भगिनी मंडळात सुधा गोखले यांचे व्याख्यान**

'पृथ्वीवरील स्वर्ग' अशी ओळख असलेल्या काश्मीरच्या बर्फात गोठलेले

दु:ख, हृदय हेलावणाऱ्या घटना कथन करून सुधा गोखले यांनी प्रेक्षकांसमोर काश्मीरचे वास्तव उलगडले. साहित्यप्रेमी भगिनी मंडळातर्फे ज्येष्ठ कवी ग. ह. पाटील यांच्या स्मृत्यर्थ 'धगधगते काश्मीर' या विषयावर गोखले यांचे व्याख्यान आयोजिण्यात आले होते. काश्मीरमधील महिलांसाठी कार्य करताना आलेले अनुभव त्यांनी सांगितले.

गोखले म्हणाल्या, ''दहशतवादी, त्यांचा बीमोड करण्यासाठी तैनात केलेले लष्कर, स्वार्थी राजकारणी या सर्वांमुळेच काश्मीरचा सुंदर चेहरा विद्रूप झाला आहे. एक पर्यटक म्हणून १९५८ मध्ये अनुभवलेले शांत-सुंदर काश्मीर आणि अलीकडे एक संवेदनशील अभ्यासक या भूमिकेतून पाहिलेले काश्मीर यात प्रचंड तफावत आहे. स्त्रियांवरील अन्यायाला तर परिसीमाच उरलेली नाही. दुर्दैवाने त्यांच्या समस्या कधी चर्चेत येत नाहीत. काश्मीरमध्ये रशीद यांच्या घरी राहत असताना तेथील नागरिकांच्या वेदना मी अतिशय जवळून पाहिल्या. जिवावर बेतणारे धाडस करून दहशतवाद्यांचीही भेट घेतली. काही अंतरावरूनच परत फिरलेला मृत्यूही पाहिला. काश्मीरमधील अस्थिरतेत होरपळून निघालेल्या स्त्रियांच्या वेदना समजून घेण्याचा, त्यांना आधार देण्याचा प्रयत्न केला. या अनुभवामधून 'मोहतरमा ते अम्मा' हे पुस्तक लिहिले.''

धगधगते काश्मीर शांत होण्यासाठी आपणही पुढे येऊन प्रयत्न केले पाहिजेत, असे आवाहन गोखले यांनी केले.

*** शांताबाई मोडक यांचे आत्मचरित्र म्हणजे मातृत्वाच्या उत्कटतेची परिणती**

जुन्नर येथील कै. शांताबाई मोडक ऊर्फ माई यांचे आत्मचरित्र म्हणजे मातृत्त्वाच्या उत्कटतेची परिणती आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ कवी प्रा. शंकर वैद्य यांनी केले.

शांताबाई मोडक यांच्या जन्मशताब्दी महोत्सवाच्या सांगता समारंभाच्या औचित्याने 'ऋणानुबंध' या पुस्तकाचे प्रकाशन श्री. वैद्य यांच्या हस्ते झाले.

शांताबाई मोडक यांचे लेख, त्यांना आलेली पत्रे याचे भावाविष्कार असलेल्या 'शांतांजली' या पुस्तकाचे प्रकाशन सुमनअक्का बालाजीवाले यांच्या हस्ते करण्यात आले.

या पुस्तकात प्रा. राम शेवाळकर, डॉ. प्र. न. जोशी, ग. प्र. प्रधान, डॉ. व. दी. कुलकर्णी, डॉ. विकास आमटे आदींचे लेख समाविष्ट आहेत.

*** 'पंढरी' या वेब पोर्टलचे उद्घाटन**

जगभरातले सर्व प्रकारचे ज्ञान इंटरनेटवर उपलब्ध आहे. मात्र त्या मराठी साहित्याचे प्रमाण अत्यल्प आहे. ज्या भाषेमागे तंत्रज्ञान नसते, ती भाषा हळूहळू लुप्त होते. त्यामुळे मराठी भाषेसह सर्व भारतीय भाषांमधील अधिकाधिक ज्ञान इंटरनेटवर

उपलब्ध करणे आवश्यक आहे, असे मत परममहासंगणकाचे निर्माते डॉ. विजय भटकर यांनी व्यक्त केले.

ग्लोबल डिजिकॉमतर्फे विकसित करण्यात आलेल्या 'www.pandhari.org' या संकेतस्थळाचे उद्‌घाटन डॉ. भटकर यांच्या हस्ते झाले. या वेळी संगीतकार कौशल इनामदार व ग्लोबलचे संस्थापक राहुल शिलेदार उपस्थित होते.

भटकर म्हणाले की, संकेतस्थळ म्हणजे ज्ञानदालन. संकेतस्थळाद्वारे ज्ञानभांडारच खुले होते. 'पंढरी' या संकेतस्थळाद्वारे वारकरी संप्रदाय, वारकरी, वारीचा अर्थ जगासमोर येईल.

कौशल इनामदार म्हणाले की, तरुणांना परंपरेशी घेणेदेणे नसते असे म्हणणे चुकीचे आहे. तरुण मुलेही आपल्या पद्धतीने परंपरेचा अर्थ लावून परंपरेचे जत करतात. 'pandhari.org' हे संकेतस्थळ वारकरी संप्रदायाच्या परंपरेचा वेगळ्या नजरेतून अन्वयार्थ लावणारे संकेतस्थळ आहे.


शिलेदार म्हणाले, की थोर संतांचे विचार तरुण पिढीपर्यंत पोचावेत, यासाठी तरुण पिढीत लोकप्रिय असलेल्या इंटरनेट या माध्यमाची निवड करण्यात आली. या संकेतस्थळावर वारकरी संप्रदायाचा ८०० वर्षापासूनचा इतिहास, आळंदी, देहू, पंढरपूर आदी देवस्थाने, वारींविषयी माहिती, दुर्मीळ छायाचित्रे, ग्रंथ, ओव्या, विविध संतांची माहिती आदींचा समावेश आहे.

दरम्यान, ज्यांच्याकडे वारीसंबंधी, वारकरी संप्रदायासंबंधी दुर्मीळ कागदपत्रे, ग्रंथ ओव्या, छायाचित्रे असतील त्यांनी आमच्या या उपक्रमाला हातभार लावावा, असे आवाहनही शिलेदार यांनी केले.

राहुल शिलेदार यांनी स्वागत केले व आभार मानले. प्रकाश पायगुडे यांनी सूत्रसंचालन केले.

*** गौतम राजाध्यक्ष यांचा 'चेहरे' मराठी चित्रग्रंथ प्रकाशित**

माझे 'फेसेस्' या नावाचे इंग्रजीत १९९७ साली पुस्तक प्रकाशित झाले असले, तरी आज प्रकाशित होत असलेला 'चेहरे' हा चित्रग्रंथ मात्र इंग्रजी पुस्तकाचे रूपांतर


**पुढाकार घ्या**

५वी आवृत्ती

संजीव परळीकर

कायमस्वरूपी यश, मन:शांती मिळवून
मजेत जगण्यासाठी...

**२००रु. पोस्टेज ३०रु.**

वा भाषांतर नाही. ते पूर्णत: मराठीतील वेगळे पुस्तक आहे. रसिकांनी त्याकडे स्वतंत्र मराठी कॉफी टेबल पुस्तक म्हणून पाहावे, असे छायाचित्रकार गौतम राजाध्यक्ष यांनी सांगितले.

'चेहरे' या कॉफी टेबल पुस्तकाचे प्रकाशन गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या हस्ते झाले. राजाध्यक्ष यांनी तीन दशकात छायाचित्रण आणि लेखन या दोन्ही क्षेत्रात केलेली मुशाफिरी या पुस्तकात पानोपानी उमटलेली आहे. करारी व्यक्तिमत्त्वाचे लष्करी शिस्तीचे सॅम माणेकशॉ इथे भेटतात. तसेच, नम्र आणि जिद्दी स्वभावाचे रतन टाटाही भेटतात. शतकांचे शतक पूर्ण करू पाहणारा सचिनही भेटतो आणि चित्रपटसृष्टीचे अवघे तारांगण इथे अवतरते.

कला, उद्योग, क्रीडा अशा विविध क्षेत्रांतील शिखर गाठलेली व्यक्तिमत्त्वे, आपापली रंग आणि मूड्स या पुस्तकांत आढळतात. अत्यंत सोपे आणि देखणे हे कॉफी टेबल पुस्तक मराठीतच असावे, त्याचा बाज मराठी असावा, इतकेच नव्हे तर प्रकाशकदेखील मराठी असावा, असा माझा आग्रह होता. या कार्यक्रमात लतादीदींसह आशा भोसले, अभिनेत्री रेखा, रंगकर्मी विजया मेहता, काजोल, पद्मिनी कोल्हापुरे, जया बच्चन, हेमामालिनी आदी मान्यवर उपस्थित होते.

लतादीदींनी राजाध्यक्षांसोबतच्या आठवणींना उजाळा दिला. मला छायाचित्रे काढण्याचा छंद होता. तेव्हा आपल्यासारखी छायाचित्रे कोणास काढता येत नाही, असा माझा समज होता. पण, राजाध्यक्ष यांनी काढलेली छायाचित्रे पाहून माझा चेहरा पडला आणि त्यानंतर पुढे मी छायाचित्रणासाठी कॅमेरा बाहेर काढलाच नाही, असे मनोगत व्यक्त केले. राजाध्यक्ष यांच्या या पुस्तकातील चेहरे अजरामर झाले आहेत. नव्या पिढीला ते प्रेरणा देत राहतील, असे गौरवोद्गार जया बच्चन यांनी काढले. निवेदन अजित भुरे, मृदुला वेलणकर, पुष्कर श्रोती यांनी केले.

*** 'कॅलिडोस्कोप' पुस्तकाचे प्रकाशन**

''कायमस्वरूपी आनंदासाठी श्रद्धा हीच मोठी गोष्ट आहे. सध्या समाजामध्ये श्रद्धा म्हणजे काय आणि अंधश्रद्धा म्हणजे काय हेच समजेनासे झाले आहे. श्रद्धास्थान निवडण्यामध्ये डोळेझाक केली, तर ती अंधश्रद्धा आहे. बुद्धिमत्ता, अधिकार, पैसा, प्रतिष्ठा, लोकप्रियता यामुळे नाही, तर केवळ श्रद्धेनेच माणसाचे मन शांत राहते,'' असे विचार डॉ. ह. वि. सरदेसाई यांनी व्यक्त केले.

डॉ. निलिमा घैसासलिखित 'कॅलिडोस्कोप' या पुस्तकाचे प्रकाशन 'सकाळ'चे संपादक सुरेशचंद्र पाध्ये यांच्या हस्ते झाले. त्याप्रसंगी डॉ. सरदेसाई बोलत होते. प्रसिद्ध कान-नाक-घसा तज्ज्ञ डॉ. सुरेश घैसास, ज्येष्ठ सराफी व्यावसायिक दाजीकाका गाडगीळ आणि डॉ. दिलीप घैसास या वेळी उपस्थित होते.

डॉ. सरदेसाई म्हणाले, ''मन हे मेंदूच्या विशिष्ट कार्यपद्धतीला दिलेले नाव आहे. संवेदना, जाण, स्मृती, भावना, निर्णय आणि कार्यपद्धती त्याद्वारे होते. भावनांची ठिणगी विझविण्यासाठी सद्‌विचारांची फुंकर मारावी लागते. राग धुमसत राहिला; तर अनेक गोष्टींचा, गुणांचा नाश करतो. रागावर ताबा ठेवण्यासाठी तपश्चर्या करावी लागते. माणसाचे अस्तित्व हे केवळ असते. त्या असण्याला गुणधर्म चिकटवले जातात आणि त्यातून अस्मिता मिळते. त्यापासून आनंद झाला, तर त्याला अभिमान म्हणायचे. अहंकार ही आपणच बनविलेली प्रतिमा आहे. ज्ञान आणि कर्म याच्या जोडीला आध्यात्मिक प्रकृती चांगली ठेवण्यासाठी श्रद्धा आवश्यक आहे.''

पाध्ये म्हणाले, ''थोडक्या शब्दांत नेमका आशय पोचविण्याची आणि मनाला साद घालण्याची ताकद घैसास यांच्या लेखनात आहे. हे लेखन समाजाच्या निरीक्षणातून आलेले आहे. त्यामध्ये मनाला समजावण्याचे, सावधगिरीच्या सूचना आणि चांगुलपणाचा विवेक या बाबी सामावल्या आहेत.''

डॉ. घैसास म्हणाले, ''डॉक्टर मंडळींनी साहित्य, कला क्षेत्रात योगदान दिले आहे. घैसास यांनी अनुभवावर आधारित केलेल्या या लेखनातून केवळ मनोरंजन नाही, तर प्रबोधनात्मक उपदेशदेखील आहेत.''

गाडगीळ म्हणाले, ''घैसास हे दांपत्य आमच्या घराच्या वरच्या मजल्यावर राहते. त्यामुळे मला गेली पन्नास वर्षे आरोग्याचे छत मिळाले आहे. या पुस्तकाच्या वाचनाने जीवनाचा प्रवास सुखाचा होईल.''

डॉ. घैसास म्हणाल्या, ''रुग्णाची मानसिकता समजून घेण्यासाठी भावनिक चष्मा हवा. सध्याच्या मुलींच्या करिअरचा अतिरेक, एकत्र कुटुंबातील ज्येष्ठांची घुसमट, असे वास्तवदर्शी विषय घेऊन मानवी मनात डोकवायचे आणि त्याचे सुंदर चित्र हृदयातून उमटवायचे, हा प्रयत्न मी या लेखनातून केला आहे.''

डॉ. विक्रम केळकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. घैसास यांनी आभार मानले.

### * डॉ. प्र. ल. गावडे यांच्या 'भटकंती' पुस्तकाचे प्रकाशन

कोणतीही अपेक्षा न ठेवता ज्ञानदान करणारे... स्वत: जगलेले मूल्यभान विद्यार्थ्यांमध्ये रुजवून आदर्श नागरिक घडविणारे... आपल्या संवेदनशील वृत्तीने आळंदी ते अमेरिका हा प्रवास लेखनातून अभिव्यक्त करणारे... अमेरिकेतील विद्यार्थ्यांसाठी ज्ञानेश्वरीचा तास घेणारे... असे ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. प्र. ल. गावडे यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू उलगडले आणि उत्कट मनोगतातून डॉ. गावडे यांच्या 'भटकंती' या पुस्तकाचे प्रकाशन झाले.

डॉ. गावडे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून उत्कर्ष प्रकाशनतर्फे त्यांच्या

'भटकंती' या पुस्तकाचे प्रकाशन टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दीपक टिळक यांच्या हस्ते झाले. डेक्कन कॉलेजचे अध्यक्ष डॉ. गो. बं. देगलूरकर, ज्येष्ठ साहित्यिक प्रा. द. मा. मिरासदार, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ-साहित्यिक डॉ. न. म. जोशी आणि प्रकाशक सु. वा. जोशी या वेळी उपस्थित होते. प्रा. मिरासदार म्हणाले, ''शाळकरी वयात गावडे अभ्यासू. तर मी नुसताच विद्यार्थी त्यांचे मार्गदर्शन मला होत असे. तेव्हापासूनची आमची मैत्री. शिक्षण क्षेत्रात योगायोगाने एकत्र आलो. त्यापूर्वी दोघेही दैनिक 'भारत'मध्ये काम करीत होतो. आम्ही दोघेही राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक आहोत.'' मी त्या गावचा असूनही पंढरपूरचे मोठेपण आणि भक्तिभाव हा मला गावडेंच्या लेखनाचे वाचन करूनच जाणवला, असेही ते म्हणाले.

डॉ. जोशी म्हणाले, ''आळंदी ते अमेरिका असा गावडे यांच्या लेखनाचा पैस असून त्यातून व्यक्तिदर्शन, स्थलदर्शन, समाजदर्शन आणि आत्मदर्शन अशी चतु:सूत्री जाणवते. हे लेखन म्हणजे शिक्षण, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील भटकंतीचा समाजाचा सहा दशकांचा दस्तावेज आहे.'' डॉ. देगलूरकर म्हणाले, ''सोपी भाषा हे वैशिष्ट्य असलेल्या या पुस्तकातून भावुक आणि उत्कट अशा गावडेसरांच्या मनाचे पापुद्रे उलगडले आहेत.'' डॉ. टिळक म्हणाले, ''सध्या शिक्षण क्षेत्र भरकटत असताना गावडेसरांच्या मार्गदर्शनामुळे आपण चूक की बरोबर याची योग्य दिशा मिळते.''

डॉ. गावडे म्हणाले, ''कोणतीही अपेक्षा न ठेवता ज्ञानदान केले, तर विद्यार्थी भरभरून देतात याची प्रचिती मला पदोपदी येत आहे. विद्यार्थ्यांकडून मिळणाऱ्या या प्रतिसादामुळे माझी काम करण्याची ऊर्जा वाढते. उंच पर्वतांबरोबरच मोठ्या उंचीची माणसे पाहण्याचे भाग्य मला लाभले. तेच मी या लेखनातून मांडले आहे.'' या वेळी डॉ. वि. भा. देशपांडे यांनी मनोगत व्यक्त केले. जोशी यांनी स्वागत केले.

### * मंगेश तेंडुलकर यांच्या व्यंगचित्राचे प्रदर्शन

ज्येष्ठ चित्रकार मंगेश तेंडुलकर यांनी काढलेल्या व्यंगचित्रांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन प्रसिद्ध संगीतकार डॉ. सलील कुलकर्णी आणि संदीप खरे यांच्या हस्ते झाले.

''शब्द नसलेली कविता हे प्रत्येक कवीचे ध्येय असते. तेंडुलकर यांनी हे ध्येय पूर्ण करून दाखविले आहे. त्यांच्या चित्रांमध्ये भाषा नसली, तरी प्रेक्षकाची संवेदनशीलता जागृत करण्याची ताकद आहे. त्यांनी रेखाटलेली चित्रे म्हणजे आयुष्यावर बोलणाऱ्या चित्रांची मैफल आहे,'' अशी भावना प्रसिद्ध कवी संदीप खरे यांनी व्यक्त केली.

खरे म्हणाले, ''व्यक्त होण्याचे खूप प्रकार आपण पाहतो. काही लेखनाच्या माध्यमातून व्यक्त होतात, तर काही चित्रकलेतून! व्यंगचित्र हेदेखील व्यक्त होण्याचे

एक माध्यम आहे. या माध्यमात कविता हे श्रेष्ठ माध्यम आहे असे काही जण मानतात, पण एक कवी म्हणून मला शब्दांच्या मर्यादा जाणवतात. तेंडुलकर यांच्या चित्रांमध्ये मात्र भाषेचा वापरही नसताना डोळे ओले करण्याची ताकद आहे.''

डॉ. कुलकर्णी म्हणाले, ''व्यंगचित्रांच्या माध्यमातून केवळ विनोदी आणि सामाजिक विषयांवर चिमटे काढणारी चित्रे देतानाच तेंडुलकर नेहमी संवेदनशील, मनाचा ठाव घेणारी चित्रे प्रेक्षकांसमोर मांडतात. आपल्या सभोवतालीही या घटना घडत असतात. आपणही त्या अनुभवतो; पण आपल्याला ती दृष्टी नाही. वयाच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षीदेखील सातत्याने नाविन्याच्या शोधात असलेले तेंडुलकर यांचा आदर्श तरुण कलाकारांनी घेतला पाहिजे.''

तेंडुलकर यांनीही या वेळी मनोगत व्यक्त केले. प्रदर्शनामध्ये दैनंदिन जीवनात घडणारे विविध गमतीदार प्रसंग, राजकीय नेत्यांच्या भावमुद्रा; तसेच वैविध्यपूर्ण सामाजिक प्रश्न तेंडुलकर यांनी व्यंगचित्रांच्या माध्यमातून मांडले आहेत.

*** 'सुख येता तुमच्या दारी'मध्ये जीवनाचे शहाणपण**

मधुकर काकडे लिखित आणि दिलीपराज प्रकाशनाने प्रसिद्ध केलेल्या 'सुख येता तुमच्या दारी' या पुस्तकाचे 'सकाळ'चे संपादक सुरेशचंद्र पाध्ये यांच्या हस्ते प्रकाशन झाले.

'सुख येता तुमच्या दारी' हे पुस्तक वाचकाला शहाणे करणारे, जीवनाचे शहाणपण शिकवणारे आहे. आयुष्यातला कृत्रिमपणा सोडत सहज जगायला आणि सुख वेचायला हे पुस्तक शिकवते, अशा शब्दांत कवयित्री अरुणा ढेरे यांनी या पुस्तकाविषयी आपले मनोगत व्यक्त केले.

या पुस्तकाचा इंग्रजी अनुवाद केलेले अरविंद परांजपे, 'म्हाडा'चे अध्यक्ष अंकुश काकडे, कृषी परिषद उपाध्यक्ष विजय कोलते, 'दिलीपराज प्रकाशना'चे राजीव बर्वे या वेळी उपस्थित होते. मधुकर काकडे यांच्या संकेतस्थळाचे ढेरे यांच्या हस्ते कार्यक्रमात उद्घाटन झाले.

जगण्यातला सुखाचा मूलमंत्र सांगताना आयुष्याला सकारात्मकपणे सामोरे जाण्याचा आणि आपल्या मनाची चावी स्वत:कडेच ठेवण्याचा सल्ला पुस्तकाचे लेखक काकडे यांनी दिला.

श्री. पाध्ये म्हणाले, ''या पुस्तकाने वाचकांना सुखी जीवनाची गुरुकिल्ली दिली आहे. नेहमी बोलताना आपण सुख, दु:ख या शब्दांचा वापर करतो. पण, याचा खोलात जाऊन विचार केल्यावर आपल्याला जाणवते की, दु:ख अफाट सागरासारखे आहे. अशा वेळी जाणीवपूर्वक सुखाकडे पाहण्याचा सल्ला हे पुस्तक देते. दु:खाचा अथांग सागर ओलांडत सुखाच्या किनाऱ्यावर पोचण्याची जादू पुस्तकातून लेखकाने मांडली आहे.''

### * विज्ञान व तंत्रज्ञान चरित्र कोशाचे प्रकाशन

शिक्षण, संशोधनाबरोबरच युवकांमधील राष्ट्रभावना वाढविण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत, असे मत अणुऊर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर यांनी व्यक्त केले.

विज्ञान भारती व साप्ताहिक विवेकने केलेल्या विज्ञान व तंत्रज्ञान आणि शिक्षण या विषयावरील चरित्र कोशाचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले. शालेय शिक्षणमंत्री बाळासाहेब थोरात, पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रघुनाथ शेवगावकर, डॉ. अरविंद संगमनेरकर, डॉ. आर. व्ही. कुलकर्णी, डॉ. विश्वनाथ कराड, वसंतराव रोकडे, अजित मराठे, गजेंद्र पवार, सूर्यकांत पाठक, मकरंद मुळे, दिलीप करंबेळकर हे या वेळी व्यासपीठावर उपस्थित होते.


डॉ. काकोडकर म्हणाले, ''शिक्षण, संशोधन व विज्ञान या एकाच नाण्याच्या बाजू आहेत. त्या वेगवेगळ्या मानल्याने नुकसान होत आहे. या तीन प्रवाहांचा एकत्रित विचार करून वाटचाल केल्यास या क्षेत्रात आपण मोठा पल्ला गाठू शकणार आहोत.''

बाळासाहेब थोरात म्हणाले, ''शिक्षण, विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात महाराष्ट्राच्या सर्व भागात काम केलेल्या व्यक्तीच्या कामाची दखल घेण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेला चरित्र कोशाचा उपक्रम चांगला आहे.'' राहुल सोलापूरकर यांनी सूत्रसंचालन केले.

### * अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेतर्फे संगीत नाटक महोत्सव

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मराठी संगीत नाटक महोत्सवाला ज्येष्ठ संगीतकार पं. प्रभाकर जोग यांनी दीपप्रज्वलन करून या महोत्सवाचे उद्घाटन केले.

टिळक स्मारक मंदिरामध्ये झालेल्या या महोत्सवामध्ये पहिल्या दिवशी 'संगीत मानापमान'चा प्रयोग पार पडला. एका नाटकाचा प्रयोग होणार असून अधिकाधिक संगीत नाटकप्रेमींनी त्याचा लाभ घेतला. या नाटकांसाठी ४० रुपये तिकीट दर


**आपण आपले**
**ताणतणाव** - एक चिंतन

३री आवृत्ती

**अंजनी नरवणे**

मानसिक ताणतणावांपासून मुक्त होण्यासाठी...

**१००रु. पोस्टेज २०रु.**

ठेवण्यात आला होता. या महोत्सवामध्ये संगीत स्वरविभ्रम, संगी धाडिला राम तिने का वनी, ययाती देवयानी, कट्यार काळजात घुसली ही नाटके सादर झाली.

या महोत्सवाच्या उद्घाटन समारंभप्रसंगी ज्येष्ठ अभिनेत्री जयमाला शिलेदार, 'सकाळ'चे संपादक सुरेशचंद्र पाध्ये उपस्थित होते. या प्रसंगी नाट्य क्षेत्रातील सातत्यपूर्ण कामगिरीबद्दल श्यामराव मेहेंदळे, सदाशिव गुप्ते, वीरेंद्र जाधव, तुषार कऱ्हाडकर यांचा सत्कार पुणे शाखेचे अध्यक्ष डॉ. सतीश देसाई व सुशील स्नेह परिवाराचे विपिन गुपचूप यांच्या हस्ते करण्यात आला. शिरीष रायरीकर यांनी सूत्रसंचालन केले.

या महोत्सवाचा समारोप ज्येष्ठ संगीत अभिनेते प्रसाद सावकार यांच्या उपस्थितीत झाला. त्या वेळी (कै.) यशवंत भगवंत कुलकर्णी पुरस्कार चारुदत्त आफळे यांना देण्यात आला.

### * मराठी नाटकांचे 'हर्बेरिअम'

विस्मृतीत गेलेल्या दर्जेदार मराठी नाटकांची लज्जत पुन्हा एकदा प्रेक्षकांना चाखता यावी; यासाठी कलाकार सुनील बर्वे याने 'हर्बेरिअम' नावाचा अनोखा उपक्रम सुरू केला आहे. पाच जुनी नाटके सध्याच्या लोकप्रिय कलाकारांना घेऊन व्यावसायिक रंगभूमीवर आणत आहेत. 'सुबक' या त्याच्या नव्या संस्थेद्वारे १० जुलैला 'सूर्याची पिल्ले' या नाटक या उपक्रमाची सुरुवात झाली. त्याच्या पाच नाटकांचे प्रत्येकी पंचवीसच प्रयोग होणार आहेत. त्यातील मुंबईत १३ आणि मुंबईबाहेर राज्यात १२ प्रयोग होणार आहेत.

'हर्बेरिअम' म्हणजे सुकलेल्या पानांचा योजनाबद्ध संच. यात निरनिराळ्या झाडांची, रोपांची पाने चिकटवलेली असतात आणि बाजूला त्यांची माहिती दिलेली असते. कालांतराने जेव्हा आपण ती पाने पाहतो, तेव्हा नकळत जुन्या स्मृती जाग्या होतात आणि आपण त्या काळात रमतो. मराठी नाटकांचेही तसेच आहे. मराठी रंगभूमीला तेजोमय करणाऱ्या जुन्या जमान्यातील आणि सध्याच्या पिढीला माहीत नसलेल्या नाटकांच्या स्मृतींना उजाळा देणारा हा उपक्रम आहे. या उपक्रमाच्या पहिल्या वर्षी प्रतिमा कुलकर्णी, चंद्रकांत कुलकर्णी, विजय केंकरे, मंगेश कदम आणि गिरीश जोशी हे पाच दिग्दर्शक यांना हवी असलेली नाटके रंगभूमीवर आणणार आहेत. त्यातले पहिले नाटक 'सूर्याची पिल्ले' हे प्रतिमा कुलकर्णी दिग्दर्शित करीत आहेत. यात वैभव मांगले, अनिकेत विश्वासराव, उदय सबनीस, आनंद इंगळे, उज्ज्वला जोग, पुष्कर श्रोत्री, अतिशा नाईक यांच्या भूमिका आहेत.

### * स्वातंत्र्यवीर सावरकर या चित्रमय चरित्राचे प्रकाशन

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जीवनातील ठळक घटनांवर

आधारित 'स्वातंत्र्यवीर सावरकर' या चित्रमय चरित्राचे प्रकाशन इतिहास संशोधन निनाद बेडेकर यांच्या हस्ते झाले. पुस्तकाची निर्मिती स्वा. सावरकर सेवा केंद्राने केली आहे. सावरकरांच्या आयुष्यातील घटनांचे चित्रांकन अनीश दाते यांनी केले असून शब्दांकन ज्येष्ठ विधीतज्ज्ञ गोविलकर आणि प्राध्यापक येवलेकर यांनी केले आहे.

सावरकरांच्या जन्माच्या वेळची भारतीय जनतेची स्थिती, ब्रिटिशांकडून भारतीयांना मिळणारी वागणूक, सावरकरांच्या बालमनावर झालेला परिणाम, सावरकरांनी घेतलेली शपथ, स्वातंत्र्यासाठी त्यांनी स्वत:ला कसे झोकून दिले, इत्यादी माहिती या पुस्तकात सचित्र देण्यात आली आहे. सावरकरांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे दर्शन या पुस्तकातून घडते. संकल्पना माजी आमदार डॉ. रमेश प्रभू आणि केंद्राचे सहकार्यवाह सुरेश बर्वे यांची आहे.

### * बालक-पालक वार्ता प्रकाशन

गेल्या बावीस वर्षांपासून पार्ल्याच्या लोकमान्य सेवा संघात सुरू असलेल्या बालक-पालक मार्गदर्शन केद्रांच्या कार्याचा परिचय करून देण्याच्या उद्देशाने 'बालक-पालक वार्ता' मासिक काढण्यात आले आहे.

मुलांचे शैक्षणिक प्रश्न, विकासाचे टप्पे, पौगंडावस्था, बालक-पालक नातं इत्यादी विषयांवर चाचण्या, उपचार, समुपदेशन असे उपक्रम या केंद्रात चालवले जातात.

सुप्रसिद्ध शल्यविशारद डॉ. स्नेहलता देशमुख यांच्या हस्ते मासिकाचे प्रकाशन झाले. मुलांची निरोगी मानसिकता, सुजाण पालकत्त्व अशा विषयांवरील लेख, पुस्तक परीक्षणे, मुलांसाठी शब्दकोडी इ. प्रकारचे साहित्य या मासिकातून दर महिन्याला प्रसिद्ध होईल. वार्षिक वर्गणीदार होण्यासाठी संपर्क साधा - कृष्णाबाई खंबतकोण, बालक-पालक मार्गदर्शन केंद्र - २६११७१९५.

### * 'मराठवाडा सारस्वत खंड - २'चे प्रकाशन

प्रा. भगवान काळे संकलित मराठवाड्यातील साहित्यिकांचा मराठवाडा सारस्वत खंड-२ या परिचय कोशाचे प्रकाशन प्रसिद्ध जलतज्ज्ञ डॉ. माधव चितळे यांच्या हस्ते झाले.

प्रमुख पाहुणे म्हणून नाट्यसमीक्षक डॉ. चंद्रकांत धांडे हे होते. साहित्याची समीक्षा करणारे आणि संशोधन करणाऱ्यांसाठी या परिचय कोशाचा फायदा होईल, असे मत डॉ. माधव चितळे यांनी व्यक्त केले. लोकव्यवहारात सहजपणे परिचयात येणाऱ्या साहित्यिक क्षेत्रातील व्यक्तींची पुरेशी ओळख पुष्कळदा झाली नसते. ती उणीव या चरित्रकोशाने पूर्ण केली आहे, असे डॉ. चितळे यांनी सांगितले.

*** महापुरुषांच्या वेशभूषेत चरित्रकथन!**

ज्ञानदानाचे पवित्र कार्य करणारे प्रा. सुनील करपे 'जागर महापुरुषांचा' या कार्यक्रमाद्वारे महान राष्ट्रपुरुषांची वेशभूषा परिधान करून, त्यांची चरित्रे विद्यार्थ्यांपर्यंत पोचवण्याचे काम करीत आहेत. वाघोली येथील विष्णूजी शेकूजी सातव विद्यालय येथे त्यांनी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांची वेशभूषा परिधान करून त्यांचे चरित्र विद्यार्थ्यांना सांगितले.

सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून राष्ट्रपुरुषांचे विचार नव्या पिढीपर्यंत नेण्यासाठी त्यांनी 'जागर महापुरुषांचा' या कार्यक्रमाचे माध्यम निवडले. त्यासाठी ज्यांचे चरित्र सांगायचे, त्याच राष्ट्रपुरुषाचा पेहराव हे त्यांच्या व्याख्यानाचे वेगळे वैशिष्ट्य असते. ही वेशभूषा करण्यासाठी प्रसिद्ध नेपथ्यकार प्रभाकर भावे यांचे त्यांना सहकार्य लाभले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज, संतशिरोमणी तुकाराम महाराज, संत गाडगेबाबा, महात्मा गांधी, कर्मवीर भाऊराव पाटील, महात्मा फुले, महर्षी धोंडो केशव कर्वे, राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वामी विवेकानंद, नेताजी सुभाषचंद्र बोस, साने गुरुजी, नेल्सन मंडेला आणि माजी पंतप्रधान राजीव गांधी अशी पंधरा व्यक्तिमत्त्वे त्यांच्या व्याख्यानातून उलगडतात.

सातव विद्यालयात झालेल्या कार्यक्रमात प्रा. करपे यांनी ज्ञानेश्वर महाराज यांच्या वेशभूषेमध्ये विद्यार्थ्यांशी संवाद साधला. माऊलींनी जीवनामध्ये सहन केलेली उपेक्षा, भगवद्गीता सर्वसामान्यांना समजण्यासाठी मराठीतून अनुवाद केलेली ज्ञानेश्वरी ते संजीवन समाधी असा ज्ञानेश्वर महाराजांच्या जीवनाचा वेध त्यांनी आपल्या व्याख्यानातून घेतला. विद्यालयाच्या ग्रंथालयास ज्ञानेश्वरी आणि महापुरुषांची चरित्रे असलेल्या पुस्तकांची भेट त्यांनी या वेळी दिली.

*** साहित्याच्या संस्कारातूनच जीवनाची वाटचाल असावी**

व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीमध्ये वाचन संस्कृतीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. साहित्याच्या संस्कारातूनच जीवनाची वाटचाल राहिली पाहिजे. मुलांनी पुस्तकाचे वाचन करून ज्ञानयज्ञ साकारला पाहिजे, अशी अपेक्षा प्रसिद्ध अभिनेत्री निशिगंधा वाड यांनी व्यक्त केली. सध्या वृत्तपत्रे बालकांच्या संस्कारासाठी करीत असलेले कार्य मोलाचे असल्याचे त्या म्हणाल्या.

बालमित्र विभागीय मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन मोठ्या उत्साहात व दिमाखात झाले. या प्रसंगी संमेलनाच्या उद्घाटक म्हणून त्या बोलत होत्या. संमेलनाध्यक्ष सुभाष कवडे, संमेलन समितीचे अध्यक्ष सुरेशचंद्र पाध्ये, सहअध्यक्ष

डॉ. न. म. जोशी, डॉ. रा. गो. प्रभुणे, आमदार विलासराव पाटील-उंडाळकर, शिक्षण मंडळाचे चेअरमन मुकुंदराव कुलकर्णी, डॉ. श्रीकांत सबनीस यांच्यासह हजारोंच्या संख्येने बालगोपाळ उपस्थित होते. आपल्या संस्कृतीची पाळेमुळे खोलवर रूजण्यासाठी भरपूर पुस्तकांचे वाचन केले पाहिजे, असे आवाहन निशिगंधा वाड यांनी केले.


अध्यक्षस्थानावरून बोलताना सुभाष कवडे यांनी बालसाहित्याची चळवळ अधिक प्रभावी होण्यासाठी पालक, शिक्षक, समाज आणि शासन या घटकांनी समन्वयाने काम करण्याची गरज व्यक्त केली.

ग्रंथदिंडीने पहिल्या बालमित्र विभागीय साहित्य संमेलनात उत्साहात प्रारंभ झाला. ग्रंथदिंडीमध्ये संमेलनाध्यक्ष सुभाष कवडे, सुरेशचंद्र पाध्ये, डॉ. न. म. जोशी, माजी खासदास श्रीनिवास पाटील, डॉ. रा. गो. प्रभुणे यांच्यासह शहरातील १३ शाळांचा हजारांवर विद्यार्थ्यांचा सहभाग होता. चित्ररथातील ग्रंथदिंडीमध्ये बालचमूंनी दिलेल्या घोषणांनी सारा परिसर दणाणून गेला होता.

*** निळूभाऊंची नक्कल अशक्य**

''आफ्रिकेहून भारतात परतल्यावर मी वैद्यकीय व्यवसाय सोडून अभिनयामध्ये कारकीर्द करण्याचे ठरवले, तेव्हा निळू फुले आणि दादा कोंडके ही दोन माणसे रंगभूमीवर 'धिंगाणा' घालत होती. 'एकापासून सावध राहा', असा इशारा त्या वेळी मला देण्यात आला होता. निळूभाऊंबरोबर काम करताना समोरच्याला कच्चा खाणारा एक 'हिंस्र' महान नट ही प्रतिमा पुसली गेली. समजुतदार, शांत आणि इतके यशस्वी झाल्यावरही 'नट'पणाचा गर्व नसलेला, अशीच त्यांची प्रतिमा माझ्या मनात ठसली. त्यांची नक्कल करणे तर केवळ अशक्यच आहे; पण त्यांना लवून सलाम करणे एवढेच माझ्या हाती उरले आहे,'' अशी भावना ज्येष्ठ अभिनेते डॉ. श्रीराम लागू यांनी व्यक्त केली.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पुणे शाखा, कॉंटिनेन्टल प्रकाशन आणि राष्ट्र सेवा दल यांच्यातर्फे ज्येष्ठ अभिनेते निळू फुले यांच्या जीवनकार्याचा वेध



**कीनोट : जे.आर.डी. टाटा**

३री आवृत्ती

अनु. सुप्रिया वकील

अद्वितीय द्रष्टे, उद्योग विश्वाचे महर्षी यांचे विचार त्यांच्याच विविध भाषणांमधून संकलित

**२२०रु. पोस्टेज ३०रु.**

घेणाऱ्या 'निळू फुले : व्यक्ती, कलाकार आणि कार्यकर्ता' या स्मृतिग्रंथाचे प्रकाशन डॉ. लागू यांच्या हस्ते झाले. प्रसिद्ध अभिनेते-दिग्दर्शक अमोल पालेकर, महापौर मोहनसिंग राजपाल, आमदार उल्हास पवार, स्मृतिग्रंथाचे संपादक डॉ. वि. भा. देशपांडे, नाट्य परिषदेचे शाखाध्यक्ष डॉ. सतीश देसाई, उपाध्यक्ष शशिकांत कुलकर्णी, प्रकाशक देवयानी कुलकर्णी-अभ्यंकर आणि राष्ट्र सेवा दलाचे सुरेश देशमुख या वेळी उपस्थित होते.

डॉ. लागू म्हणाले, ''निळूभाऊंविषयीची माहिती मिळाल्यावर त्यांच्याबरोबर काम करताना मजा येईल, अशी माझी भावना होती. 'कथा अकलेच्या कांद्याची' नाटकातील निळूभाऊंचा अभिनय पाहून मी थक्क झालो. ही ताकद असेल, तर आपण आफ्रिकेलाच गेलेले बरे असा विचारही माझ्या मनात आला. मी त्यांचा 'चमचा' नव्हे, तर 'फॅन' झालो. पुढे आमची जोडी इतकी जमली, की नाटक असो किंवा चित्रपट प्रत्येक निर्मात्याला आम्ही दोघेही हवे असायचो. ते लोहियावादी आणि मी गांधीवादी. आमच्या चर्चा चार-चार तास चालायच्या. राजकारणाचा अभ्यास असलेले निळूभाऊ तर्कशुद्ध विचार मांडायचे. राजकारणात तर ते नक्कीच यशस्वी झाले असते.''

पालेकर म्हणाले, ''त्रिपट महामंडळाच्या निधी संकलनासाठी गावोगावी जाऊन कार्यक्रम करतानाच्या दौऱ्यात निळूभाऊंनी माझा आवर्जून समावेश केला होता. त्या वेळी खऱ्या अर्थाने पाठराखण करणारा मोठा भाऊ हे नाते आमच्यामध्ये प्रस्थापित झाले. त्यांना प्रायोगिक नाटकात काम करायचे होते. म्हणून महेश एलकुंचवारांच्या 'रक्तपुष्प' या दीर्घांकाच्या निळूभाऊ आणि शांता जोग यांना घेऊन मी तालमी सुरू केल्या होत्या. हे नाटक उभे राहिले नाही, तरी या दोन महान कलाकारांकडून मला खूप शिकता आले. आवाजाची पट्टी न वाढवता, आक्रस्ताळेपणा न करतादेखील संयत पद्धतीने उत्तुंग अभिनय करता येतो, हे निळूभाऊंनी समर्थपणे सिद्ध केले. सामाजिक भान असलेला आणि निष्ठा जपणारा त्यांच्यासारखा माणूस विरळाच.'' या वेळी उल्हास पवार, राजपाल, देशमुख, अभ्यंकर, डॉ. देशपांडे, देशमुख यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. देसाई यांनी प्रास्ताविक केले. सुधीर गाडगीळ यांनी सूत्रसंचालन केले. कीर्ती शिलेदार यांनी आभार मानले.

*** 'सिंपली स्टायलिश इन्टरटेनिंग ॲट होम' पुस्तकाचे प्रकाशन**

थोड्या थोड्या गोष्टीने पदार्थांची चव बदलते. त्यामुळे मूळ पदार्थांच्या चवीत, आकारात, वाढण्याच्या पद्धतीत थोडासा बदल करून पदार्थ बनवण्याचा आणि खाण्याचा आनंद घ्या आणि स्वत:च्या कौशल्याने नवनवीन पदार्थ तयार करा, असे मत पाककलातज्ज्ञ आणि लेखक संजीव कपूर यांनी व्यक्त केले.

क्रॉसवर्ड बुकस्टोअर्स आणि पॉप्युलर प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'सिंपली स्टायलिश इन्टरटेनिंग ॲट होम' या संजीव कपूर लिखित पुस्तकाचे प्रकाशन झाले. या वेळी ते बोलत होते. या वेळी पॉप्युलरचे हर्ष भटकल, क्रॉसवर्डचे दिनेश गुप्ता, व्यवस्थापक शरण बिरादर उपस्थित होते. कपूर म्हणाले, ''पदार्थ बनवायला अवघड नसावेत, तर खाताना आणि पाहताना मजा आणणारे असावेत. यासाठी प्रचलित पदार्थ बदलण्याचा धोका स्वीकारावा लागतो. वेगळेपण काय करता येईल हे शोधायला हवे. नव्या नव्या तंत्राचा वापर करून रोजच्या जेवणात नवी चव आणण्याचा प्रयत्न करायला पाहिजे.''

*** 'सांजिन'मुळे सांगलीतील जुन्या आठवणींना उजाळा**

सांगलीच्या साहित्य विश्वातील स्मृती अविनाश टिळक यांच्या 'सांजिन' (सांगली जिल्हा नगरवाचनालय) या पुस्तकामुळे जागविल्या गेल्या आहेत, त्यामुळे सांगलीतील जुन्या आठवणींना उजाळा मिळाला असल्याचे मत दै. 'लोकसत्ता'चे सहायक संपादक अरविंद व्यं. गोखले यांनी व्यक्त केले.

सांगली जिल्हा नगर वाचनालयास १४० वर्षे पूर्ण झाली. या कालावधीतील ३५० छायाचित्रांचा आढावा अविनाश टिळक यांनी 'सांजिन' या पुस्तकाद्वारे घेतला आहे. या पुस्तकाचे प्रकाशन श्री. गोखले यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या या नात्याने ज्येष्ठ लेखिका विनिता ऐनापुरे उपस्थित होत्या. जिल्हा नगर वाचनालयाचे अध्यक्ष भास्कर डोंगरे अध्यक्षस्थानी होते.

एक काळ असा होता की, सांगली शहरात असणाऱ्या व्यक्तींची उंची मोजायला कोणतेच मापदंड पुरे पडत नसत. आज परिस्थिती बदलली आहे आणि मापदंडांचे आकारमानही बदलले आहेत, हे आपल्याला मान्य करावे लागेल, असेही गोखले म्हणाले.

सांगलीच्या सांस्कृतिक चळवळीतील एका महत्त्वाच्या धाग्याने नव्या पिढीला स्मरण करून देण्यात 'सांजिन' हे पुस्तक महत्त्वाचा दुवा ठरणार आहे. या पुस्तकाची मांडणी अतिशय सुंदर व देखणी झाली असून रचनाही चांगली आहे, असे मत व्यक्त करून गोखले म्हणाले, की आई-वडिलांच्या संस्काराबरोबरच सांगली नगर वाचनालयासारख्या संस्थांचेही पाठबळ मोठे आणि ज्ञानाचे असते.

श्री. डोंगरे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वामन काळे यांनी केले. या कार्यक्रमास माजी आमदार नितीन शिंदे, श्रीनिवास शिंदगी, डॉ. अनिल मडके, सुमनताई गाडगीळ, यशोधरा घारपुरे, शिरीष माणगावकर, अरुण दांडेकर, माजी नगरसेविका अनुराधा मोडक, डॉ. दिलीप शिंदे व अशोक तेलंग आदी उपस्थित होते. म. वि. भाटे यांनी आभार मानले.

*** बोरकर जन्मशताब्दीनिमित्त 'घन बरसे रे' कार्यक्रम**

कविवर्य बा. भ. बोरकर यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त कवी बोरकर स्मृती समिती आणि आर्य कम्युनिकेशन अँड व्हिडिओज यांच्या संयुक्त विद्यमाने 'घन बरसे रे' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात बोरकरांच्या कविता त्यांच्याच शैलीत व चालीत सादर केल्या.

डॉ. बोरकर म्हणाले की, या उपक्रमाद्वारे शब्द आणि स्वर या दोहोंच्या प्रभावी माध्यमातून बोरकरांच्या कविता रसिकांसमोर मांडण्यात आल्या. त्यांच्या निसर्गकविता आणि प्रेमकविता ज्याप्रमाणे सर्वसामान्य रसिकांपर्यंत पोहोचल्या आहेत, त्याचप्रमाणे बोरकरांच्या काव्यसाधनेतील अध्यात्मसुद्धा या कार्यक्रमाच्या माध्यमातून प्रथमच रसिकांसमोर मांडण्यात आले आहे. पंडिता आशा खाडिलकर, डॉ. राजा काळे, डॉ. माधवी वैद्य व डॉ. बोरकर यांनी कार्यक्रमात कविता सादर केल्या.

यावेळी कविवर्य बोरकरांच्या कन्या पद्मा वज्रम, जावई अप्पासाहेब वज्रम, नात लिना भट, नातू शैलेश भट, डॉ. माधवी वैद्य उपस्थित होत्या.

*** पाऊले चालणार 'माउली मशिन'ने ओव्या, अभंग ऐकत**

संत तुकाराम महाराजांची गाथा, ज्ञानेश्वरीतल्या ओवी, अभंग, भजन, काकडा आरती वारकऱ्यांना वारी दरम्यान ऐकता यावी, यासाठी आषाढी-कार्तिकी माउली ट्रस्टच्या वतीने 'माउली मशिन' विकसित करण्यात आली आहे. या मशिनसाठी आळंदीतील उत्तममहाराज कदम आणि पंढरपूरचे सोपानकाका टेंभूकर यांनी गायन केले आहे.

या मशिनमध्ये तुकाराम महाराजांच्या गाथा ग्रंथातील ४०९२ अभंग, ज्ञानेश्वरीच्या १८, अध्यायातील ९०६५ ओव्या आणि ७०० श्लोकांचे पठण करण्यात आले आहे. ट्रस्टचे अध्यक्ष बाळासाहेब सानप यांची कल्पना असलेली ही मशिन बंगळुरुच्या एसएनआर इलेक्ट्रॉनिक्स या कंपनीने तयार केले आहे. तसेच तुकाराम महाराजांचे





**नाथ हा माझा**

८वी आवृत्ती

**कांचन घाणेकर**

एका कलंदर कलावंताचे त्याच्या पत्नीने रेखाटलेले पारदर्शी व्यक्तीचित्र

**२५०रु. पोस्टेज ३०रु.**

अभंग जागतिक स्तरावर www.ashadhiwari.com आणि www.maulitrust.com या दोन वेबसाइट सुरू केल्या आहेत. या वेबसाइट विकसित करण्यासाठी ट्रस्टला www.myvishwa.com चे तांत्रिक साह्य मिळाले आहे. दिंडीत सहभागी न होता वैयक्तिकरित्या वारीमध्ये जाणारे अनेक वारकरी असतात. त्यांची वारी आणि भक्तीमय करण्यासाठी हे मशिन कामी येईल. तसेच संत वाङ्मयावर संशोधन करण्यासाठी अनेक परदेशी अभ्यासक वारींमध्ये असतात. त्यांना संत तुकाराम महाराजांच्या गाथा, ज्ञानेश्वरीतल्या ओव्या, अभंग यांचे एकत्रित संकलन पाहिजे असते. लिखित स्वरूपातील हे साहित्य त्यांना समजतेच असे नाही. त्यामुळे ऐकून या साहित्याची माहिती आणि आनंद घेण्यासाठी हे मशीन उपयोगी पडेल, असे सानप यांनी सांगितले.

या मशिनवर आकडे प्रिंट केले असून, पाहिजे ती ओवी किंवा अभंग ऐकण्यासाठी मूळ ग्रंथातील ओवींचा आकडा दाबायचा आहे, असे सानप म्हणाले.

*** 'प्रसिद्धिमाध्यमे आणि शिक्षण व्यवस्थे'वरील परिषद**

आर्ट ऑफ लिव्हिंग फाउंडेशन, इंटरनॅशनल असोसिएशन फॉर ह्यूमन व्हॅल्यूज आणि युनेस्को यांच्यातर्फे आयोजित दोन दिवसीय 'प्रसिद्धिमाध्यमे आणि शिक्षण व्यवस्था' या विषयावरील परिषदेचे उद्‌घाटन डॉ. राम ताकवले यांच्या हस्ते झाले. राज्य शिक्षण तंत्रज्ञान संस्थेचे व्ही. डी. सेवेकर, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. अनिल अवचट, ज्येष्ठ पत्रकार यमाजी मालकर, विनिता देशमुख, परिषदेचे संयोजक मुरलीधर कोटेश्वर या वेळी उपस्थित होते.

काळानुसार बदलत गेलेल्या शिक्षण पद्धतीचा प्रवास डॉ. ताकवले यांनी उलगडला. परदेशात याबाबत सुरू असलेल्या विविध उपक्रमांचीही माहिती त्यांनी दिली.

ते म्हणाले, ''पूर्वी गुरुकुल पद्धतीत 'प्रिंटिंग टेक्नॉलॉजी' नव्हती. त्यामुळे पाठांतराला खूप महत्त्व होते. पुस्तक आल्यानंतर या पारंपरिक पद्धतीत काही बदल झाले. आता तंत्रज्ञानानुसार पुन्हा एकदा बदलण्याची वेळ आली आहे. पारंपरिक शैक्षणिक मूल्य जपत असतानाच शिक्षण पद्धतीला तंत्रज्ञानाची जोड दिली पाहिजे.''

''महात्मा गांधी यांनी त्या काळात 'नई तालीम' हा समाजाला दिलेला संदेश आजही आपल्याला लागू आहे. बदलत्या आव्हानांनुसार आपण नवनवीन गोष्टी आत्मसात करून घेतल्या पाहिजेत. शिक्षकांनीही साचेबद्ध पद्धतीतून शिकविण्याऐवजी विद्यार्थ्यांच्या कलात्मकतेला वाव मिळेल, अशा पद्धतीने मार्गदर्शन केले पाहिजे. 'परीक्षा' घेणे हेच केवळ शिक्षणाचे ध्येय नसून, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हा उद्देश असला पाहिजे,'' असेही त्यांनी नमूद केले.

### * मराठी विश्वात पहिला ऑनलाइन विश्वकोश

सध्याच्या माहिती-तंत्रज्ञानाच्या युगात तरुण पिढीला इंटरनेटने भुरळ घातली आहे. मराठीपेक्षा इंग्रजी भाषेचा वापर करण्याला ती प्राधान्य देते. पुस्तकांमध्येही ही पिढी जास्त रमत नाही. अशा परिस्थितीत मराठी टिकवून ठेवण्यासाठी इंटरनेटचा वापर करण्याला पर्याय नाही. यासाठी 'मायविश्व डॉट कॉम'ने पुढाकार घेतला असून, 'ग्लोबल मराठी' या वेबसाइटअंतर्गत मराठी विश्वकोशाची निर्मिती केली आहे. मराठी विश्वात तयार केलेला हा पहिला ऑनलाइन विश्वकोश आहे.

या विश्वकोशामध्ये मराठीशी संबंधित सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय, भौगोलिक, ऐतिहासिक माहिती अपलोड करण्यात आली आहे. बाराखडीनुसार या माहितीची विभागणी करण्यात आली असून, आंतरराष्ट्रीय स्तरावर हा विश्वकोश पोचावा, यासाठी इंग्रजी भाषेतही माहिती देण्यात आली आहे, असे मायविश्व डॉट कॉमचे धनंजय दातार यांनी सांगितले.

### * सोलापुरात होणार 'श्यामची आई' पुनर्जन्म

साने गुरुजींच्या 'श्यामची आई' या पुस्तकाचा विविध भाषांत अनुवाद झाल्याने सातासमुद्रापारही या साहित्यकृतीने लौकिक वाढवला. 'श्यामची आई'ने राज्यातील शाळा-शाळांमध्ये, घरा-घरांमध्ये मातृसंस्काराचे व्यासपीठच उभे केले आहे. म्हणूनच या साहित्यकृतीचे मराठी साहित्य प्रांतातील योगदान मोलाचे ठरले. सोलापूरच्या सुविद्या प्रकाशन संस्थेमार्फत 'श्यामची आई' पुस्तकाचे पुर्नप्रकाशन झाले.

स्वामित्व हक्काचा उपयोग - साने गुरुजी यांच्या 'श्यामची आई' पुस्तकाचे स्वामित्व हक्क ११ जून २०१० पर्यंत पुणे विद्यार्थिगृह प्रकाशन संस्थेकडे होते. संहिता स्वामित्व हक्क कायद्यान्वये (कॉपीराइट ॲक्ट) संबंधित लेखकाच्या मृत्यूनंतर साठ वर्षांनी स्वामित्व हक्क संपुष्टात येतो. साने गुरुजी यांच्या निधनाला ११ जून रोजी साठ वर्षे पूर्ण झाली. त्या पार्श्वभूमीवर 'श्यामची आई' या मूळ पुस्तकात कोणताही बदल न करता नव्या मुखपृष्ठाच्या रूपात सुविद्या प्रकाशन संस्थेमार्फत ऑगस्टमध्ये या पुस्तकाचे समारंभपूर्वक प्रकाशन करण्यात येईल. या १३० पृष्ठांच्या पुस्तकाची किंमत केवळ पन्नास रुपये ठेवण्यात आली. पुस्तकाचे मुखपृष्ठ सोलापुरातील प्रख्यात चित्रकार हेमंत कपुरे यांनी साकारले.''

'साने गुरुजींच्या गोड गोष्टी' या पुस्तक शृंखलेतील साने गुरुजींनी लिहिलेल्या पंधरा पुस्तकांचा संच आहे. ही कथामालादेखील हिंदी भाषेत अनुवाद करून सुविद्या प्रकाशन संस्थेमार्फत प्रकाशित केली जाणार आहे. त्या संदर्भात अखिल भारतीय साने गुरूजी कथामालेचे संस्थापक अध्यक्ष प्रकाशभाई मोहाडीकर आणि सुविद्या प्रकाशन संस्थेदरम्यान करार झाला आहे. कथामालेतील पंधरा पुस्तकांपैकी 'मेरे

देवता', 'हिम शिखरों का आनंद' आणि 'भारतीय नारी' या तीन पुस्तकांच्या हिंदी आवृत्तीची छपाई पूर्णत्वास आली आहे. हिंदीमध्ये अनुवादित साने गुरुजींचे साहित्य प्रकाशित होणार असल्यामुळे राष्ट्रीय स्तरावर कथामालेच्या साहित्य विचार प्रसाराला गती मिळेल, याच उद्देशाने कथामालेची पुस्तके हिंदीत अनुवादित करण्याचा संकल्प केल्याचे श्री. बाबूराव मैंदर्गीकर यांनी सांगितले.

अखिल भारतीय साने गुरुजी कथामाला मुंबई संचालित सोलापूर जिल्हा साने गुरुजी कथामाला गेल्या चाळीस वर्षांपासून कार्यरत आहे. विद्यमान अध्यक्ष अवधूत म्हमाणे म्हणाले, ''साने गुरुजींच्या साहित्य प्रचार व प्रसारासाठी १९ जुलै २००४ पासून सोलापूर शाखेतर्फे विविध उपक्रम राबविण्यात आले. त्या अंतर्गत ३ हजार ३०० शिक्षकांना कथाकथन प्रशिक्षण, सुमारे दोनशे शाळांमध्ये मंगल यात्रा उपक्रमाद्वारा सव्वादोन लाख विद्यार्थ्यांच्या सहभागातून नऊ लाख रुपयांच्या पुस्तकांची विक्री झाली. या पुस्तकाच्या साडे अकरा हजार प्रती घरोघरी पोचल्या असून, त्यासाठी नूतन मराठी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका अनुराधा लिमये यांचे मोलाचे सहकार्य मिळाले.''

### * 'आई' पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन

नामवंतांनी आपल्या आईविषयी अथवा आईने आपल्या कीर्तिवान मुलाविषयी लिहिलेल्या लेखांचे संकलन असलेल्या 'आई' या पुस्तकाची पहिली आवृत्ती अवघ्या महिनाभरात संपली असून दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन सुप्रसिद्ध लेखक व समाजकार्यकर्ते डॉ. अनिल अवचट यांच्या हस्ते झाले. प्रख्यात मानसशास्त्रज्ञ डॉ. राजेंद्र बर्वे प्रमुख पाहुणे होते.

मुंबई विद्यापीठाच्या माजी कुलगुरू डॉ. स्नेहलता देशमुख व पुण्यातील ललित लेखिका प्रतिभा देशपांडे यांनी हे पुस्तक लिहिले आहे. डॉ. जयंत नारळीकर, साधनाताई आमटे, कुमार केतकर, विजया वाड, डॉ. संजय ओक, शरयू घाडी, सुशीलाताई साबळे आदींविषयी लेख या पुस्तकात समाविष्ट करण्यात आले आहेत. मुंबई, गोरेगावच्या 'अक्षर व्यवस्थापन'ने हे पुस्तक प्रकाशित केले आहे. या पुस्तकाला मुंबई, पुण्यासारख्या महानगरांप्रमाणेच कोल्हापूर, जळगाव, अमरावती, चिखली, नांदेड तसेच बेळगाव, पणजी, बडोदा आदी ठिकाणीही चांगला प्रतिसाद मिळाला. आईच्या पहिल्या आवृत्तीचे प्रकाशन १७ एप्रिल रोजी मुंबईत झाले. त्यानंतर अवघ्या महिन्याभरात पहिली आवृत्ती संपली.

### * आत्मचरित्रातून अनुभवावे समाधान

पूर्वी आत्मचरित्र हा इतिहास प्रकार मानला जायचा. गेल्या काही पिढ्यांची माहिती देऊन, आपण कसे घडलो, याचे त्यात वर्णन दिले जायचे. सुदैवाने आता

वाचकांची अभिरूची बदलल्यामुळे आत्मचरित्राच्या लेखनात ललित प्रकार आला आहे. आत्मचरित्राचा वाचक स्वत: ते चरित्र जगत असतो. ते वाचताना मिळणारे समाधान अनुभवावे, असे विचार अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष द. भि. कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

समकालीन प्रकाशनातर्फे प्रकाशित संजय भास्कर जोशी लिखित 'आहे कॉर्पोरेट तरी...' या पुस्तकाचे प्रकाशन कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. यावेळी समकालीन प्रकाशनचे आनंद अवधानी, शाम देशपांडे, डॉ. सुहास कुलकर्णी उपस्थित होते.

आपण जेव्हा आत्मचरित्र वाचतो, तेव्हा परिस्थिती द्विधा असते. आत्मचरित्र वाचताना स्वविलेपन होत नाही. आत्मचरित्रात जे सांगायचे ते सत्य सांगायचे असते. आत्मचरित्रातून मनोविश्लेषण प्रकट झाले पाहिजे. त्यातून पूर्वग्रह आणि अज्ञान दूर होणे आवश्यक आहे. तसेच प्रत्येक व्यक्ती स्वतंत्र राहिली पाहिजे, तरच असे चरित्र समाधान देते.

''कॉर्पोरेट जगताचे अंतरंग उलगडून दाखविणारे हे पुस्तक असले, तरी ते लेखकाच्या आत्मचरित्राचा एक अध्याय असून, त्यात त्यांचे जीवनविषयक चिंतन व्यक्त झाले आहे. बालपणी झालेल्या संस्कारांमुळे जोशी यांनी लठ्ठ पगाराची नोकरी सोडली. याचा अर्थ ते निवृत्तिवादी आहेत, असा नाही. त्याचबरोबर ते प्रवृत्तिवादीही नाहीत, तर ते आनंदयात्री आहेत.'' असे कुलकर्णी म्हणाले.

आयुष्यात सुखी होणे ही गोष्ट अवघड नाही. त्यासाठी प्रत्येकाने स्वत:ला आनंदी राहण्याचे वचन दिले पाहिजे. प्रत्येकाला आनंदी होता येते. समोर येणाऱ्या पेचांमुळे प्रश्न निर्माण होत असतात. ''जीवनात आनंद मिळवताना मनाच्या पाठीमागे जे घडते, ते मांडण्याचा प्रयत्न या पुस्तकात केला आहे.'' असे जोशी म्हणाले.

पूर्वी मांडले गेलेले सिद्धांत या युगाला लागू होत नाहीत. या युगाची उपनिषदे आपणच लिहिली पाहिजेत. प्रत्येकाने स्वत:चा मार्ग शोधायचा असतो. त्याचे अन्वयार्थ शोधता येऊ शकतात आणि ते वेगवेगळ्या स्वरुपात मांडता येतात. प्रत्येकजण स्वत:चे पसायदान लिहित असतो. क्षणांची स्मारके करत जगल्यास आयुष्य सुंदर होते, असे जोशी यांनी पुस्तकाबद्दल विचार मांडताना नमूद केले.

*** अस्तित्व टिकविण्यासाठी उत्तम ग्रंथनिर्मितीची गरज**

''जागतिक स्पर्धेतील अस्तित्व टिकविण्यासाठी उत्तम ग्रंथनिर्मितीची आवश्यका आहे,'' असे मत मुद्रण व्यावसायिक आनंद लाटकर यांनी व्यक्त केले.

मराठी प्रकाशक परिषदेने 'मुद्रण व्यवसायातील नवे बदल आणि प्रकाशन व्यवसाय' या विषयावर आयोजित केलेल्या कार्यक्रमात लाटकर बोलत होते. अध्यक्षस्थानी मराठी प्रकाशक परिषदेचे अध्यक्ष रमेश कुंदूर होते.

लाटकर म्हणाले, ''जागतिकीकरणाच्या स्पर्धेत मराठी माणसाने आपली प्रगती साधताना जुन्या तंत्रज्ञानाचा अथवा कमी गुणवत्तेचा विचार न करता आधुनिक तंत्रज्ञान आपलेसे केले पाहिजे. व्यवसायात प्रगती करताना इंग्रजी पुस्तकांच्या प्रकाशनाकडे दुर्लक्ष करू नये. तसेच छपाई, व्यवहार, व्यवस्थापन आणि नवीन तंत्रज्ञानाचे भान ठेवून आजच्या बदलत्या परिस्थितीला सामोरे जाणे आवश्यक आहे.'' कार्यक्रमानंतरच्या चर्चेत मिलिंद परांजपे, शरद गोगटे, अभिजित वाळिंबे, अरुण पारगावकर आदींनी सहभाग घेतला.

*** परुळेकरांच्या पुस्तकांचे प्रकाशन**

तामिळनाडूमधील तमिळींना भाषेचा अभिमान आहे. तेथे झालेल्या तमीळ संमेलनासाठी ३१५ कोटी रुपयांचा खर्च करून ते भव्य व यशस्वी केले जाते; तर महाराष्ट्रात मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी नव्याने तयार केलेल्या मराठी खात्यासाठी फक्त दहा कोटी रुपये दिले. या पैशांमध्ये 'कोनशिला' तरी बसेल काय, असा सवाल करीत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी राज्य सरकारवर टीकेचे झोड उठविली.

पत्रकार राजू परुळेकर लिखित 'होय हा महाराष्ट्र धर्म आहे', 'मंजिरी' (काव्यसंग्रह) व 'माणसं भेटलेली न भेटलेली' (दुसरी आवृत्ती) या पुस्तकांचे प्रकाशन राज ठाकरे यांच्या हस्ते झाले.

राज म्हणाले की, मराठीबद्दल आपल्या सरकारलाच काही पडलेली नाही. प्रत्येक प्रांतातील राज्यकर्त्यांना तेथील भाषेचा अभिमान आहे; पण आपलेच लोक मराठीबद्दल काही भूमिका घेत नाहीत. अशोक चव्हाणांकडून तरी काय अपेक्षा करणार? कर्तृत्व नाही, म्हणूनच दिल्लीच्या कृपेने ते मुख्यमंत्रीपदावर बसले आहेत. सर्व इथे पिकवायचे व दिल्लीला पाठवायचे, असा त्यांचा उद्योग असल्याची टीका त्यांनी केली.

तमीळ संमेलनाला मोठे यश मिळाले हे निदर्शनास आणून देताना ते म्हणाले, ''आमच्याकडे मराठी साहित्य संमेलन असो वा मराठी नाट्यसंमेलन तेथे नेहमीच




**कर्णपिशाच्च**

**डॉ. बाळ फोंडके**

कौशिक आणि अमृतराव या पोलिसांच्या मिश्कील जुगलबंदीतून आणि वैज्ञानिक तंत्रज्ञानाच्या मदतीने उलगडत जाणाऱ्या गुन्ह्यांच्या आगळ्यावेगळ्या शोधकथा

**२२०रु. पोस्टेज ३०रु.**

भांडणे होतात. अध्यक्षपदावरून तर नेहमीच भांडणे होतात. हे वाद कोर्टात जातात. संमेलन होण्यापूर्वी वाद, संमेलनात वाद व संमेलन झाल्यानंतरही वाद सुरूच असतात.''

*** डॉ. वि. य. कुलकर्णी यांच्या चार पुस्तकांचे प्रकाशन**

वेदस्वरूप प्रकाशनतर्फे डॉ. वि. य. कुलकर्णी लिखित 'आपलं घरटं', 'कथारूप गीता', 'येणे कारणे भगवंत' व 'गीता आणि कला तत्त्वज्ञान' या चार पुस्तकांचे प्रकाशन डी. एस. कुलकर्णी यांच्या हस्ते झाले.

प्रकाशिका लीना कुलकर्णी, अरविंद कुलकर्णी आणि रवींद्र खरे या वेळी उपस्थित होते. कुलकर्णी म्हणाले, ''ही पुस्तके सर्वसामान्य वाचकाला आवडतील अशीच आहेत. रानातला झरा ज्याप्रमाणे कोणत्याही अडथळ्याला न जुमानता वाट काढत पुढेच जातो आणि सागराला जाऊन मिळतो, त्याचप्रमाणे व्यवसायात येणाऱ्या अडचणींना पार करीत जावे लागते. प्रकाशिकेने केवळ मराठीवरच न थांबता हिंदी, इंग्रजी, फ्रेंच अशा विविध भाषांतून पुस्तके प्रकाशित करावीत.'' लीना कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. खरे आणि कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले.

*** सातारकर तरुणांचा झेंडा अटकेपार**

पर्यावरण संवर्धनाचा विषय घेऊन निघालेल्या साताऱ्यातील युवकाने या संदेशाचा झेंडा सातासमुद्रापार लावला आहे. सातारा येथील संयोग मोहिते यांच्या 'डू यू' हा अवघ्या एक मिनिटाचा लघुपट आंतरराष्ट्रीय स्तरावर अनोखे यश मिळवत आहे. ग्रीस येथील रोडोज आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात हा लघुपट नुकताच प्रदर्शित झाला आणि तेथील शाळांमध्ये दाखवण्यात आला.

या लघुपटाचे दिग्दर्शन संयोग मोहिते सातारा येथील यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स आणि कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी आहेत. पदवीचे शिक्षण झाल्यानंतर खाजगी कंपनीत नोकरी करत असताना निसर्गाविषयी प्रेम त्यांना गप्प बसू देत नव्हते. त्यांच्या शेजारी राहणाऱ्या गुलाटी कुटुंबातील मितीशा आणि युवल ही बहीण-भावंडे दर महिन्याला पैसे साठवून त्यातून एक झाड लावत असत.

या चिमुकल्यांची धडपड पाहून, लहान मुले निसर्गाच्या प्रेमातून वृक्षारोपणाचे काम करीत आहेत, तर मग आपण का नाही, असा विचार त्यांच्या मनात आला. वृक्ष संवर्धनाला संदेश देणारा लघुपट या मुलांवर करायचा, असे त्यांनी ठरवले. त्यासाठी मित्र केतन हेंद्रे यांची मदत घेतली. दोघांनी साध्या हँडीकॅमच्या आधारे चित्रीकरण करूनच अवघ्या दीडशे रुपयांत लघुपट तयार केला.

त्यानंतर दिल्ली येथे झालेल्या सीएमएस वातावरण आंतरराष्ट्रीय चित्रपट

महोत्सव, पुण्यातील वसुंधरा चित्रपट महोत्सव आणि तसेच लंडन येथे झालेल्या 'वन मिनिट टू सेव्ह द वर्ल्ड' या लघुपट महोत्सवात सादर झालेल्या अनेक चित्रपटांपैकी पहिल्या पाच लघुपटांत 'डू यू'चा समावेश झाला. विशेष म्हणजे 'डू यू' नुकताच ग्रीस येथील रोडोज आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात प्रदर्शित झाला. बहुतांशी संस्थांनी त्यांच्या शाळेत हा लघुपट दाखवल्याचे मोहितेंनी सांगितले.

*** गीत गजानन काव्यसंग्रह प्रकाशित**

गजानन महाराजांचे भक्त असलेल्या प्रकाश शंकर दांडेकर यांनी गजानन महाराजांचे जीवनसार सांगणाऱ्या दोनशेंहून अधिक गीतांची रचना केली आहे. त्याचे 'गीत गजानन' या काव्यसंग्रहात रूपांतर करण्यात आले असून, त्याचे कोकण मराठी साहित्य परिषदेतर्फे प्रकाशन करण्यात आले आहे.

८ नाव्हेंबर २००९ मध्ये प्रकाशित झालेल्या पुस्तकांच्या विक्रीतून उपलब्ध होणारा निधी गजानन महाराजांच्या चरणी अर्पण करण्यात येणार आहे. दांडेकर या गीतांच्या सादरीकरणाचेही कार्यक्रम करतात. त्याचे पंचाहत्तरहून अधिक कार्यक्रम झाले आहेत. हे काव्य पुस्तक दोन भागात विभागले आहे. पहिल्या भागात त्यांच्या जीवनात आलेल्या प्रत्यक्ष प्रचितींची काव्यरचना आहे, तर दुसऱ्या भागात दासगू विरचित गजानन विजय या ग्रंथातील प्रत्येक अध्यायाचे, त्या अध्यायातील विविध प्रसंगाचे वर्णन आणि प्रसंगागणिक ७८ काव्यात त्याची रचना केली आहे.

गीत-गजानन हे पुस्तक एकूण ३१६ पानांचे असून त्याचे स्वागतमूल्य १०१ रुपये आहे. हे पुस्तक प्रकाश शंकर दांडेकर, ई-५०, यशोमंगल को.ऑप. हौ.सो., टिळक रोड, पनवेल येथे उपलब्ध होईल. संपर्क ९६८९८८७४९४.

*** इतिहास जपणे हे प्रत्येकाचे कर्तव्य**

पाश्चात्त्यांच्या तुलनेत इतिहासाबद्दल आपल्याकडे फारच अनास्था आहे. वास्तविक इतिहास जपणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे, केवळ पैशाअभावी हे काम मागे पडू नये, अशी अपेक्षा 'सकाळ'चे अध्यक्ष व भारत इतिहास संशोधक मंडळाच्या शताब्दी समितीचे उपाध्यक्ष प्रतापराव पवार यांनी व्यक्त केले.

भारत इतिहास संशोधन मंडळाच्या शतकपूर्ती समारंभात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. मंडळाचे चिटणीस डॉ. श्री. मा. भावे, सदस्य डॉ. राजा दीक्षित या वेळी व्यासपीठावर उपस्थित होते. पवार म्हणाले, ''पाश्चात्त्यांमध्ये इतिहासाविषयी अभिमान व आस्था जाणवते. इतिहासाचे जतन करून ठेवण्याची परंपरा त्यांच्याकडे आहे. ती परंपरा आपल्याकडे अधिक चांगल्या प्रकारे निर्माण होण्याची गरज आहे.'' भारत इतिहास संशोधन मंडळाविषयी बोलताना प्रतापराव पवार म्हणाले, ''आयुष्य समर्पित करणाऱ्या त्यागी लोकांमुळेच भारत इतिहास संशोधन मंडळासारख्या संस्था मोठी

परंपरा निर्माण करू शकल्या आहेत. ध्येयवादी लोकांमुळेच अशा संस्थांचे काम पुढे गेले आहे. अशा काही मोजक्याच संस्था पुण्यात आहेत.''

डॉ. भाव यांनी शताब्दी वर्षात मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. मासिक व्याख्यानमाला, मोडी लिपी वर्ग तसेच निबंधवाचनाचे कार्यक्रम घेण्यात आले. डॉ. राजा दीक्षित यांनी प्रास्ताविक भाषण केले व सूत्रसंचालन केले.

### * मराठी तरुणाने केली हिंदी चित्रपटनिर्मिती

हडपसर येथील अत्यंत सामान्य कुटुंबातील गणेश कदम या मराठी तरुणाने पदार्पणातच हिंदी व तोही मोठा सामाजिक संदेश देणारा चित्रपट बनविल्याबद्दल होले म्हणाले, की या आशयप्रधान सिनेमाच्या निर्मितीतून कदम यांनी दाखविले आहे, की फक्त सधन व्यक्तीच हिंदी चित्रपटानिर्मिती करू शकतात असे नाही, तर योग्य नियोजनाने सामान्य मराठी माणूसही चांगला हिंदी चित्रपट बनवू शकतो.

जीवनात निश्चित केलेल्या ध्येयासाठी अपार कष्टांची तयारी असेल आणि ध्येयपूर्ततेसाठी समाजाने मदतीचा हात दिला, तर सामान्य माणूसही इच्छित ध्येय साध्य करू शकतो, असा सामाजिक संदेश देणाऱ्या 'फिनिक्स एक उडान' या हिंदी सिनेमाचा प्रिमियर शो नुकताच राष्ट्रीय फिल्म संग्रहालयाच्या नाट्यगृहात मोठ्या उत्साहात पार पडला.

विनोद नायर यांनी सिनेमात मुख्य अभिनेता म्हणून, तर दूरदर्शवरील 'सीआयडी' मालिकेतील हर्षाली जीने हिने मुख्य अभिनेत्री म्हणून काम केले आहे. मास्टर सुयश कदम याने बालकलाकाराची भूमिका केली आहे.

### * 'असा हा महाराष्ट्र' सहलीचे आयोजन

महाराष्ट्राच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ व ऑफ बिट डेस्टिनेशन्सच्या संयुक्त विद्यमाने 'असा हा महाराष्ट्र' या सहलीचे आयोजन केले आहे.



## सुखद बालसंगोपन

**डॉ. रत्नावली दातार**

बाललीलांतून बाळाचे मनोगत जाणून घ्या. बाळाची भाषा समजून घेऊन शिका. बाळाचे संगोपन सुखद करा, बाळासाठीही आणि तुमच्यासाठीही!

**६०रु. पोस्टेज २०रु.**

‘असा हा महाराष्ट्र’ या सहलीत महाराष्ट्रातील विविध सामाजिक, शैक्षणिक संस्था आणि पर्यटन स्थळांना भेटी देण्यात येणार असल्याची माहिती ‘ऑफ बिट डेस्टिनेशन’चे नितीन शास्त्री यांनी दिली. मराठी साहित्य, कला, इतिहास व संस्कृती यांचे दर्शन घडविण्यासाठी प्रत्येक दिवशी विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती त्यांनी दिली.

या कार्यक्रमांमध्ये सुधीर मोघे, अरुणा ढेरे, इतिहासकार निनाद बेडेकर, प्रसिद्ध कीर्तनकार चारुदत्त आफळे, डॉ. कुमार सप्तर्षी आदींचा सहभाग आहे. सहलीमध्ये आळंदी, महाड, रायगड, औरंगाबाद, जळगाव, चिखलदरा, आनंदवन, वर्धा, सेवाग्राम, नांदेड, उद्‌गीर, तुळजापूर या ठिकाणांना तसेच लोकमान्य टिळकांच्या जन्मगावी चिखलगाव येथील राजा दांडेकर यांनी सुरू केलेल्या प्राथमिक विद्यालयाला भेट देण्यात येणार आहे.

ही सहल दोन भागांमध्ये विभागली गेली असून ११ नोव्हेंबर ते २३ नोव्हेंबर आणि २३ नोव्हेंबर ते ४ डिसेंबर या दरम्यान होणार आहे. या संपूर्ण सहलीचा खर्च प्रत्येकी पंचावन्न हजार तर प्रथम भागाचे साडेअठ्ठावीस आणि दुसऱ्या भागाचा खर्च साडेसव्वीस हजार असल्याचे या वेळी सांगण्यात आले. या सहलीच्या नोंदणीकरिता नितीश शास्त्री यांना ९३७०१४४९२१ या क्रमांकावर संपर्क साधावा.

### * सुनीता विल्यम्स पुन्हा जाणार अंतराळ सफरीवर

भारतीय वंशाची अंतराळयात्री सुनीता विल्यम्स जून २०१२ मध्ये पुन्हा एकदा अंतराळ प्रवासाला जाईल, असे ‘नासा’ने जाहीर केले.

सुनीताचे आई-वडील हे गुजराती असून तिचा जन्म ओहिओतील युक्लिड येथे झाला. ४४ वर्षांची सुनीता हिने आतापर्यंत सर्वाधिक काळ अंतराळ प्रवास करणारी महिला म्हणून मान पटकावला आहे. तिने १९५ दिवस अंतराळात वास्तव्य केले होते.

विल्यम हिच्याबरोबर नंतर फ्लाईट इंजिनियर रशियन अंतराळवीर युरी मालेनचेन्को आणि जपानी अंतराळवीर अकिहिको होशिदे हे नंतर सहभागी होणार आहेत. अंतराळ स्थानाकडे जाणाऱ्या सोयूझ-३१ उड्डाणात जून २०१२ मध्ये सुनीता अंतराळात जाणार आहे. नासा व त्यांच्या आंतरराष्ट्रीय भागीदार असलेल्या रशियन फेडरल स्पेस एजन्सी व जपान एरोस्पेस एक्स्प्लोरेशन एजन्सी या संस्थांनी मिळून चारजणांची निवड केली असून त्यात सुनीताचा समावेश आहे.

नासाने सांगितले की, सुनीता विल्यम्स ही ऑक्टोबर २०१२ मध्ये आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाची कमांडर असणार आहे.

‘नासा’ने जून १९९८ मध्ये सुनीताची आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाची फ्लाईट

इंजिनियर म्हणून निवड केली होती. एसटीएस ११६ च्या ९ डिसेंबर २००६ च्या उड्डाणाबरोबर ती अंतराळात गेली होती. त्यावेळी तिने अंतराळात २९ तास १७ मिनिटांचे स्पेस वॉक केले होते. २२ जून २००७ रोजी ती पृथ्वीवर सुखरूपपणे परत आली होती. तिने शॅनन ल्युसिड या महिलेचा अंतराळ वास्तव्याचा विक्रम मोडून १९५ दिवस वास्तव्य केले होते. २००८ मध्ये पेगी व्हिटसन हिने पाच स्पेस वॉक करून स्पेस वॉकचा सुनीताचा विक्रम मोडला होता.

*** माध्यमांच्या अतिक्रमणानंतरही 'वाचन संस्कृती' टिकून असल्याचे चित्र**

जुलैमध्ये झालेल्या साहित्यदर्शनच्या ग्रंथ प्रदर्शनात सर्वाधिक मागणी असलेल्या पुस्तकांची यादी पाहिल्यास अनुवाद, व्यायाम, पाककला, अर्थविषयक पुस्तके, तसेच काही आत्मचरित्रांना विशेष मागणी आहे. 'हंग्री फुलिश', 'ए बेटर इंडिया ए बेटर वर्ल्ड', 'द सेकंड सेक्स', 'द मॅजिक ऑफ थिंकिंग बिग', 'मी इझाडोरा', 'श्रीमंत होण्याचे नियम' ही पुस्तके वाचकांच्या पसंतीस उतरली आहेत. 'लूज युवर वेट' हे ऋतुजा दिवेकर यांचे पुस्तक, 'अर्थात' हे अच्युत गोडबोले यांचे पुस्तक, 'नापास मुलांचे प्रगतिपुस्तक' हे अरुणा शेवते यांचे पुस्तक, उषा पुरोहित यांचे 'संपूर्ण पाककला', डॉ. प्रकाश आमटे यांचे 'प्रकाशवाटा', डॉ. श्री. बालाजी तांबे यांचे 'गर्भसंस्कार' ही पुस्तके मागणीत आघाडीवर आहेत.

अन्य पुस्तकांत पु. ल. देशपांडे, व. पु. काळे, आचार्य अत्रे, शंकर पाटील, शिवाजी सावंत, ना. सं. इनामदार, रणजित देसाई, विश्वास पाटील, सुधा मूर्ती, सानिया, गौरी देशपांडे, सुनीता देशपांडे, प्राचार्य शिवाजीराव भोसले यांच्या पुस्तकांनाही वाचकांची पसंती आहे.

ज्येष्ठ लेखक भालचंद्र नेमाडे यांची 'कोसला' ही साहित्यकृती आजही वाचकपित्र आहे. सुमारे तीस वर्षांनंतरही 'कोसला'चा आशय वाचकांच्या पुढच्या पिढ्यांपर्यंत समर्थपणे पोचतो आहे. विशेषत: युवा पिढीतील अनेक वाचकांची 'कोसला'ला मागणी आहे. गेल्या पाच-सहा दिवसांत 'कोसला'च्या पन्नास प्रती विकल्या गेल्या आहेत. त्याचप्रमाणे नेमाडे यांच्या बहुचर्चित आणि बहुप्रतीक्षित 'हिंदू' या साहित्यकृती विषयीची उत्सुकताही मोठ्या प्रमाणावर आहे.

*** भारतातील विद्यार्थ्यांना होणार अमेरिकी संस्कृतीची ओळख**

भारतातील विद्यार्थ्यांना अमेरिकेतील कला, संस्कृती आणि शैक्षणिक संधींची माहिती व्हावी, या उद्देशाने अमेरिकेच्या भारतीय वाणिज्य दूतावासातर्फे विशेष मेळाव्याचे उद्घाटन अमेरिकन सेंटरच्या संचालिका लिन गॅडकाउस्कीन यांच्या हस्ते झाले.

पुणे विद्यापीठाचे महासंचालक डॉ. राजेंद्र जगदाळे, मराठवाडा मित्रमंडळ वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. डी. लॉरेन्स, 'अमेय प्रकाशन'चे उल्हास

लाटकर या वेळी उपस्थित होते. दोन दिवसांच्या या मेळाव्यात अमेरिकेत उच्च शिक्षणाच्या संधी, व्हिसाची कार्यपद्धती, तेथील महाविद्यालयीन जीवन, शैक्षणिक अभ्यासक्रम आदींवर विशेष चर्चासत्रांचे आयोजन करण्यात येणार असून, या क्षेत्रातील तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. एलिझाबेथ गिल्बर्टलिखित 'इट, प्रे, लव' आणि 'कमिटेड' व झुम्पा लाहिरीलिखित 'अनअकस्टम्ड' या इंग्रजी पुस्तकांच्या अनुवादाचे प्रकाशन झाले. यापैकी झुम्पा लाहिरी यांच्या पुस्तकाचा अनुवाद शुभदा पटवर्धन यांनी केला असून 'कमिटेड'चा अनुवाद डॉ. मीना शेटे-संभू यांनी केला आहे.

गॅडकाउस्कीन म्हणाल्या, ''अमेरिकेतील साहित्याचा मराठीत अनुवाद ही स्वागतार्ह बाब आहे. शैक्षणिक आणि सांस्कृतिक देवाणघेवाणीतून जवळ येण्याच्या दृष्टिकोनातून अनुवाद प्रक्रिया हा महत्त्वाचा घटक ठरणार आहे.''

*** 'आम्ही मंजूळ' या पुस्तकाचे प्रकाशन**

भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेचे माजी ग्रंथपाल आणि हस्तलिखितांचे संग्राहक-अभ्यासक वा. ल. मंजूळ यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त उत्कर्ष प्रकाशनतर्फे 'आम्ही मंजूळ : पाच पिढ्यांची कथा' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. ह. वि. सरदेसाई यांच्या हस्ते झाले. संतसाहित्याचे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे, ॲन फेल्डहाऊस, प्रकाशक सु. वा. जोशी, सविता जोशी, अनुराधा मंजूळ या प्रसंगी उपस्थित होते.

डॉ. सरदेसाई म्हणाले, ''लेखकाने खडतर जीवन व्यतीत करताना अडचणींवर मात करून देश-परदेशात नाव मिळविले. हे पुस्तक नव्या पिढीला प्रेरणा देणारे आणि त्यांच्या आशा पल्लवित करणारे आहे.''

डॉ. मोरे म्हणाले, ''अभ्यासू, कष्टाळू आणि अहंकाराचा वारा न लागलेले मंजूळ यांचे व्यक्तिमत्त्व या पुस्तकातून उलगडले आहे.''

मंजूळ म्हणाले, ''माझ्यासारख्या पुण्याला नशीब काढण्यासाठी आलेल्यांचे हे प्रतिनिधिक चरित्र आहे. जीवनात ज्ञानार्जन झाल्याने मी सुखी आणि समाधानी आहे.'' पल्लवी जकातदार यांनी सूत्रसंचालन केले.

❐



## आपले सौंदर्य आणि त्याची निगा

**कोच्चर ब्लॉसम** **अनु.** मीना टाकळकर

सौंदर्याबाबतच्या सर्व प्रकट अप्रकट समस्यांवरील उपाय व उपचार

**१००रु. पोस्टेज २०रु.**

नवे कोरे

# केक्स

**अपर्णा अरूण परचुरे**




**१५०रु. पोस्टेज २५रु.**

परमेश्वराकडे माणसं बनवण्याचा साचा नाही. तो प्रत्येक माणूस वेगळा बनवतो. त्यासाठी तो कशात कायकाय घालतो हे त्यालाच माहीत (देवाच्या बाबतीत 'देवालाच माहीत' कसं म्हणणार म्हणून) माझ्या बहिणीकडे केक बनवायचा कुठलाही साचा नाहीये. ती प्रत्येक केक वेगळा बनवते. त्यासाठी ती कशात कायकाय घालते ते तिचं तिलाच माहीत (इथे मात्र देवालाही माहीत नसणार, मग 'देवालाच माहीत' कसं म्हणणार म्हणून) ती प्रत्येक केक अक्षरश: घडवते.

मूर्तिकार एखादी मूर्ती घडवतो, चित्रकार एखादे चित्र चितारतो, मी एखादी भूमिका साकार करतो, त्याप्रमाणे ते एक क्रिएशन असतं 'A Unique Creation' आणि मग ती त्यात प्राण ओतते म्हणून तिनं केलेल्या केकच्या म्हातारीच्या बुटाच्या गॅलरीत तुम्हाला हवा खात उभं राहावसं वाटतं, गार्डनच्या केकमध्ये फेरफेटका मारावासा वाटतो, कुत्र्याच्या पिल्लाला फिरवून आणावसं वाटतं. केकचं फुलपाखरू तर कधी कापूच नये, असं वाटतं आणि ह्या सगळ्या केकसाठी वापरलेले सर्व पदार्थ चक्क खाण्याजोगे असतात.

तुम्ही म्हणाल मी माझ्या बहिणीचं जरा जास्तच कौतुक करतोय, पण हे पुस्तक वाचा. त्यानंतर जर तुम्हीही कौतुक केलं नाहीत ना, तर मी माझं नाव बदलून तुम्ही म्हणाल ते ठेवीन, जे सध्या आहे डॉ. गिरीश रत्नाकर ओक.

- डॉ. गिरीश ओक

# विशेषवार्ता

*** पहिले कोल्हापूर जिल्हा साहित्य संमेलन उत्साहात संपन्न**

राजर्षी शाहू छत्रपती मेमोरियल ट्रस्ट, कोल्हापूरच्या वतीने दि. १० व ११ जुलै, २०१० रोजी पहिले 'कोल्हापूर जिल्हा साहित्य संमेलन' मोठ्या उत्साहात पार पडले. या साहित्य संमेलनाची मूळ संकल्पना जिल्हाधिकारी व साहित्यिक लक्ष्मीकांत देशमुख यांची. सुविख्यात साहित्यिक व समीक्षक असलेल्या डॉ. सुनीलकुमार लवटे यांच्या एकहाती संयोजनामुळे यशस्वी झाली. संमेलनाचे उद्‌घाटक साहित्य, संगीत, कला समाजसेवेचं चतुरस्र व्यक्तिमत्त्व लाभलेले साहित्यिक डॉ. अनिल अवचट होते. ग्रामीण कथाकार व समीक्षक प्रा. चंद्रकुमार नलगे हे संमेलनाध्यक्ष होते.

संमेलनात 'नवी पालवी' अंतर्गत अभिव्यक्ती व आस्वाद असं आगळं सत्र होतं. प्रा. एकनाथ पाटील, आशुतोष पोतदार, डॉ. धम्मपाल रत्नाकर, अशोक पाटील यांनी क्रमश: आपल्या 'खुंट्यांवर टांगलेली दु:खे' (कविता), 'आनंद भोग मॉल' (नाटक), 'विसकट' (कादंबरी), 'कावळटेक' (कादंबरी) रचनांवर भाष्य केलं, तर त्यांची आस्वादक समीक्षा क्रमश: डॉ. रणधीर शिंदे, प्रा. राजाभाऊ शिरगुप्पे, डॉ. रफीक सूरज, डॉ. हिमांशू स्मार्त यांनी केली. या सत्राचे अध्यक्ष सुविख्यात कादंबरीकार व समीक्षक डॉ. रवींद्र ठाकूर हे होते. दुसऱ्या सत्रात स्त्री आत्मकथा शतकाचं विहंगमावलोकन करण्यात आलं. याचं नेतृत्व प्रा. मंदा कदम यांनी केलं. तर त्यात आत्मकथाकार विमल मोरे, निलम माणगावे, प्रा. आशा अपराद यांनी सहभाग घेतला. डॉ. राजेखान शानेदिवाण यांनी स्त्री आत्मकथेची समीक्षा केली. रात्री 'कला रजनी'चं आयोजन होतं. त्यात प्रा. राजाभाऊ शिरगुप्पे यांचं 'निर्णायक क्षणी' (नाटक), प्रा. आप्पासाहेब खोत यांचं 'मरणदारी' (कथाकथन) तर प्रा. सुरेश शुक्ल यांचा 'शब्द सुरांच्या झुल्यावर' (निवडक काव्यरचना) इ. कार्यक्रम सादर करण्यात आले. सर्वांना श्रोत्यांनी उत्साही उपस्थितीनी रसिक प्रतिसाद दिला.

दुसऱ्या दिवशी 'मी काय वाचतो?' विषयावर विलास माळी (कवी), कृष्णात खोत (कादंबरीकार), मारुती मांगोरे (कथाकार), आपली वाचन साधना स्पष्ट केली,

तर सत्राध्यक्ष समीक्षक संपादक चंद्रकांत पोतदार यांनी का व कसं वाचावं हे स्पष्ट केलं. संमेलनात बालसाहित्या पुढील आव्हानांवर विशेषत्त्वाने विचार करण्यात आला. मुकुंद निगवेकर यांच्या मार्गदर्शनाखाली रजनी हिरळीकर, प्रा. टी. आर. गुरव, श्याम कुरळे यांनी आपले विचार मांडले. नव्या काव्यरचनांचं आगळे, पण गंभीर असं कवी संमेलन हे या संमेलनाचं आकर्षण ठरलं. ज्येष्ठ कवी, संपादक विजय चोरमारे नियंत्रित या काव्य मैफिलीत सतीश सोळांकुरकर, गोविंद पाटील, प्रा. प्रसन्नकुमार पाटील, डॉ. प्रिया आमोद, डॉ. चंद्रकांत पोतदार, श्रीराम पचिंद्रे, सुहास एकसंबेकर, प्रा. विनोद कांबळे, पाटलोबा पाटील, निलांबरी कुलकर्णी प्रभृती कवींनी आपल्या बहारदार कविता सादर केल्या.

समारोप समारंभाचे प्रमुख पाहुणे साहित्य अकादमी विजेते कादंबरीकार डॉ. राजन गवस होते. त्यांनी आपल्या भाषणात राजर्षी शाहूंच्या स्वप्नातील उद्ध्वस्त कोल्हापूर चित्रित करून ते सावरण्याचं आवाहन उपस्थित साहित्यिकांना केलं. या प्रसंगी 'कुसुमताई चव्हाण उत्कृष्ट - प्रशासक पुरस्कार' मिळाल्याबद्दल लक्ष्मीकांत देशमुख यांचा गौरव करण्यात आला. मेहता ग्रंथ जगत पुरस्कार नवोदित साहित्यिक कृष्णात खोत, उपक्रमशील ग्रंथपाल संभाजीराव मोरे आणि मुक्ता पब्लिशिंग हाऊस यांना प्रदान करण्यात आला.

या पहिल्या जिल्हा साहित्य संमेलनास ट्रस्टचे विश्वस्त रा. कृ. कणबरकर (स्वागताध्यक्ष), इतिहासतज्ज्ञ डॉ. जयसिंगराव पवार, राज्यशास्त्रज्ञ डॉ. अशोक चौसाळकर, उपजिल्हाधिकारी सुभाष बोरकर, रमेश चव्हाण, मेहता पब्लिशिंग हाऊसचे अनिल मेहता, प्रा. चंद्रकांत पाटगावकर यांच्यासह जिल्ह्यातील साहित्यिक व साहित्यप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### * 'खाली जमीन, वर आकाश' पुस्तकाच्या ब्रेल आवृत्तीचे प्रकाशन

डॉ. सुनीलकुमार लवटे लिखित 'खाली जमीन, वर आकाश' या पुस्तकाच्या ब्रेल आवृत्तीचे प्रकाशन उत्तम कांबळे यांच्या हस्ते झाले. तसेच 'सकाळ'चे मुख्य संपादक उत्तम कांबळे यांच्या 'आई समजून घेताना' या पुस्तकाच्या ब्रेल लिपीतील आवृत्तीचे प्रकाशन लवटे यांच्या हस्ते झाले. यावेळी निवांत संस्थेच्या संस्थापिका मीरा बडवे, आनंद बडवे उपस्थित होते.

लवटे यांनी अपंगांसाठी काम करणाऱ्या देशविदेशातील संस्थांच्या भेटीदरम्यान आलेले अनुभव यावेळी सांगितले. पुस्तकाविषयी गप्पा मारताना लवटे म्हणाले, ''अपंगांन स्वावलंबी करायचे म्हणजे त्यांना सुविधा नव्हे, तर त्यांच्या मनात जीवनाशी लढा लढण्याची ईर्षा निर्माण करून त्यांच्यातील आत्मविश्वास वाढवणे



**'खाली जमीन वर आकाश'चे ब्रेललिपीत प्रकाशन**

म्हणजे खरे स्वावलंबन आहे.''

निवांतच्या कार्याचे कौतुक करून ते विद्यार्थ्यांना म्हणाले, ''भविष्यात तुमच्या जीवनात दृष्टी येईल अथवा नाही; पण या विद्यालयातून तुम्हाला जे पंख मिळाले आहेत, त्यांच्या बळावर तुम्ही स्वावलंबी नक्कीच होणार आहात.''

''अपंग विद्यार्थ्यांची संख्या वाढणे ही गौरवाची बाब नसून खऱ्याअर्थी ती शोकांतिका आहे,'' अशी खंत प्रसिद्ध लेखक डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी व्यक्त केली. अपंगांच्या संस्था एखाद्या कारखान्याप्रमाणे चालतात. संस्था अपंगांना घराप्रमाणे वागणूक देतील, तेव्हा भारतात मोठी क्रांती होईल, असेही ते म्हणाले.

कांबळे यांनी 'आई समजून घेताना' हे पुस्तक लिहिण्यामागची भूमिका सांगून मुलांशी मनमोकळा संवाद साधला. मैथिली चव्हाण आणि नवीना परंडवाल या विद्यार्थ्यांनी दोन्ही पुस्तकातील निवडक भागाचे वाचन केले. नितीन धावडे याने पुस्तकांच्या विषयाशी निगडीत कवी संदीप खरे यांच्या कविता सादर केल्या. सदानंद जन्नू याने आभार मानले.

*** 'द रोड ऑफ लॉस्ट इनोसन्स'वर आयोजित चर्चासत्र**

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या 'नवं कोरं' या कार्यक्रमातंर्गत १७ जुलै २०१० भारती पांडे यांनी अनुवाद केलेल्या 'द रोड ऑफ लॉस्ट इनोसन्स' या सोमाली माम लिखित आत्मकथनावर चर्चा आयोजित करण्यात आली होती.

परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ. वि. भा. देशपांडे यांनी प्रास्ताविक केले. त्यामध्ये त्यांनी परिषदेच्या या कार्यक्रमाची तसेच इतर कार्यक्रमांचीही माहिती सांगितली.

श्रीमती भारती पांडे यांनी अनुवादासंबंधी आणि 'द रोड ऑफ लॉस्ट इनोसन्स'

या पुस्तकाविषयीचे त्यांचे विचार मांडले. अनुवाद हा दुय्यम दर्जाचा साहित्यप्रकार नाही तर तोही एक सर्जनशील प्रतिभेचा अविष्कारच आहे, केवळ मूळ पुस्तकाची भाषा आणि अनुवाद ज्या भाषेमध्ये करावयाचा आहे ती भाषा अवगत असून चालत नाही तर मूळ लेखकाच्या संस्कृतीचा व पार्श्वभूमीचाही विचार करणे आवश्यक असते, असे मत त्यांनी मांडले. अनुवाद करताना त्यांना आलेल्या अनेक अनुभवांविषयीही त्यांनी सविस्तर सांगितले. अनुवाद हे फावल्या वेळी करण्याचे काम नाही तर त्यासाठी संपूर्ण कमिटमेंट लागते असेही मत त्यांनी यावेळी मांडले.

प्रा. रंजना फडके यांनी 'द रोड ऑफ लॉस्ट इनोसन्स' या कादंबरीचा पूर्ण आलेख श्रोत्यांसमोर ठेवला. प्रचंड वेदना पचवून जीवनाला सामोरे जाताना सोमाली माम यांचा सकारात्मक दृष्टीकोन फार चांगल्या रितीने या आत्मकथनात मांडला आहे. जीवनातील भयानक अनुभवांनी उध्वस्त होऊन न जाता त्यातून स्वत: तर बाहेर पडायचेच पण इतरांनाही त्यामधून बाहेर काढण्यासाठी मदतीचा हात पुढे करायचा हे सोमाली माम चे वेगळे सामर्थ्य आहे असे प्रा. फडके म्हणाल्या. १९७०-७१ च्या नंतरच्या दशकामधील कंबोडियाची आर्थिक, राजकीय आणि सामाजिक परिस्थितीचे स्थितीगतीचे सुस्पष्ट वर्णन करणारे असे हे आत्मकथन आहे. सोमाली माम यांनी २००० सालचा 'द ग्लॅमर वुमन' हा किताब देण्यात आला आहे तो त्यांच्या स्वरूपाकडे बघून नव्हे तर त्यांच्या या प्रचंड कार्याचे ग्लॅमर ओळखून असेही प्रा. फडके म्हणाल्या. कंबोडियामधील वेश्या व्यवसायाविषयीचे हे आत्मकथन असल्याने सवंग लोकप्रियता मिळवण्यासाठी किंवा पुस्तकाचा खप वाढवण्यासाठी लेखिकेला अनेक बाबी खुलवून रंगवून सांगता आल्या असत्या परंतु अतिशय संयत भाषेमध्ये लिहिलेले हे आत्मकथन आतिशय आवश्यक अशा तटस्थेने लिहिले गेले आहे आणि भारती पांडे यांनी त्याचा अनुवादही अतिशय उत्तम रितीने केला आहे, 'मेहता पब्लिशिंग हाऊस'ने त्यांच्या प्रथेप्रमाणेच एक उत्तम अनुवाद वाचकांच्या हाती दिला आहे असे प्रा. फडके म्हणाल्या.

सुप्रसिद्ध लेखिका मृणालिनी चितळे यांनी आपले विचार मांडले. जिला आपला जन्म कधी झाला किंवा आपलं नाव ठेवलं गेलं होतं का नाही हेही माहित नाही अशा सोमाली मामचे हे आत्मकथन आहे. या भीषण दारिद्र्यात जन्मलेल्या आणि जगलेल्या आणि त्यामधूनही प्रचंड धीराने बाहेर पडलेल्या मुलीविषयी अधिक जाणीवा व्यक्त केल्या या खातेऱ्यामधून बाहेर पडण्याचा एकच मार्ग सोमालीला दिसत होता आणि तो म्हणजे एखाद्या श्रीमंत परदेशी माणसाशी लग्न करणे हा होता. इतक्या व्यावहारिक विचाराने सोमालीने पिएर या फ्रेंच माणसाची लग्न केले आणि त्याच्याच मदतीने या व्यवसायातील इतर मुलींना बाहेर काढण्यासाठी अपार कष्ट केले. अनेक राजकीय, आर्थिक हितसंबंध गुंतलेले असल्याने हा धंदा बंद करणे शक्य नाही हेही तिला कळून

आले होते त्यामुळे तिने शक्य तेवढ्या मुलींना यातून बाहेर काढून आपल्या पायावर उभे करण्याचा प्रयत्न करायचा एवढेच ध्येय ठेवले. आणि त्या ध्येयामध्ये तिने मिळवलेले यशही जगभराच्या लोकांच्या नजरेत भरले. या मुली संपूर्णपणे अशिक्षित असल्याने त्यांच्यासाठी व्यवसाय निवडतानाही सोमालीच्या व्यावहारिक चातुर्याचे दर्शन घडते. त्या मुलींसाठी केशरचनाकार, सौंदर्यप्रसाधनकार, स्वयंपाक करणे, कपडे शिवणे असेच व्यवसाय तिने निवडले आहेत. मृणालिनी चितळे या स्वत: एक समुपदेशक असल्याने त्यांनी आणखी एक महत्त्वाची बाबही श्रोत्यांसमोर मांडली. अनेक श्रोत्यांनी प्रश्न विचारले. वक्त्यांनी त्याची योग्य अशी उत्तरे दिली.

कार्यक्रमाला डॉ. वि. भा. देशपांडे, डॉ. माधवी वैद्य, डॉ. लीला अर्जुनवाडकर, श्री. ह. ल. निपुणगे, डॉ. संगमनेरकर, डॉ. सतीश देसाई, 'मेहता पब्लिशिंग हाऊस'चे सुनील मेहता इत्यादी मान्यवर उपस्थित होते. परिषदेच्या प्रमुख कार्यवाह डॉ. माधवी वैद्य यांनी आभार मानले.

*** 'मना सर्जना' दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन**

डॉ. अनिल गांधी यांनी लिहिलेली मना सर्जना ही आत्मकथा लक्षवेधी असून सृजनशीलतेचा एक उत्तम नमुना आहे, असे गौरवोद्गार केंद्रिय उर्जामंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी काढले.

डॉ. गांधी यांच्या या साहित्यकृतीचे प्रकाशन हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या किर्लोस्कर सभागृहात शिंदे यांच्या हस्ते झाले, यावेळी मंचावर माजी कुलगुरू डॉ. इरेश स्वामी, विद्याधर दोशी, डॉ. सुहास पुजारी, आमदार प्रणिती शिंदे, डॉ. गांधी, ज्येष्ठ लेखिका सुरेखा शहा, मेहता पब्लिशिंग हाऊसचे सुनील मेहता, चित्रलेखा पुरंदरे, वर्षा गांधी, आमदार शोभा बच्छाव आदी होते.

शिंदे म्हणाले की, डॉ. गांधी यांनी अंत:करणापासून लेखन केले आहे. या आत्मकथेत त्यांनी अनेक विषय हाताळले आहेत. वैद्यकिय क्षेत्रातील नितिमत्ता कशी असावी, याबद्दल त्यांनी विवेचन केले आहे. ही नितिमत्ता या क्षेत्रातील मंडळींनी पाळली तर या व्यवसायावर टिका होणार नाही.

डॉ. पुजारी म्हणाले की, मना सर्जना ही एक सामान्य माणसाची, एका डॉक्टरची आणि शिक्षणासाठी धडपडणाऱ्या तरुणाची आत्मकथा आहे. यातील निवेदन नितळ आणि प्रांजळ आहे. हे पुस्तक संस्कारांची एक पोथी आहे.

यावेळी डॉ. गांधी, मेहता, पुरंदरे, शहा यांनी मनोगत व्यक्त केले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कौस्तुभ गोडबोले यांनी केले.

❒

# पुस्तक परिचय

**वैद्यकीय सेवा आणि सामाजिक कार्य
यांचा मेळ घालणाऱ्या डॉक्टरांचे
प्रांजल आत्मकथन**

# मना सर्जना




**डॉ. अनिल गांधी**

'मना सर्जना सत्य पंथेचि जावे' अशी मनोमन भावना ठेवून वैद्यकीय व्यवसायाची साडेचार दशके अविरत साधना करणाऱ्या पुण्यातील डॉ. अनिल गांधी यांनी आपल्या आत्मकथनाला दिलेले 'मना सर्जना' हे नाव निश्चितच अर्थपूर्ण आहे.

सामान्य परिस्थितीत वाढलेल्या तरुणाने डॉक्टर होण्याचे ठरवून, आर्थिक आणि अन्य अडचणींशी सामना करीत आपले ध्येय गाठणे– ही गोष्ट सरसहा आढळते. डॉ. गांधींच्या बाबतीतही ती लागू पडते. परंतु त्यांनी डॉक्टर झाल्यावर जे कार्य केले, त्यामुळे त्यांचे वेगळेपण उजळून निघते.

'माढा' येथे एका माध्यमिक शिक्षकाच्या कुटुंबात १९३९ मध्ये जन्म झालेल्या अनिल गांधी यांनी प्राथमिक शाळेत भूगोलाच्या दातार सरांनी सांगितलेल्या रसाळ कथांमुळे आपल्या जीवनातल्या सर्वसामान्य अनुभवांनाही खुलवून शैलीदार भाषेत मांडण्याची सिद्धी गवसली आहे आणि वाचनाची गोडी लागली. वडील सोलापूरच्या काडादी हायस्कूलमध्ये शिक्षक. त्यामुळे पाचवी ते सातवी त्या शाळेत अध्ययन. या शाळेत असताना सातवीत पहिला नंबर आल्याने स्वत:बद्दल, स्वत:च्या हुशारीबद्दल खात्री पटली आणि नंबर टिकवण्याची जिद्द निर्माण झाली. नॉर्थकोट टेक्निकल हायस्कूलमध्ये आठवीतही पहिला नंबर आला. इंग्रजीच्या पेपरमध्ये वर्गातील हुशार पारशी विद्यार्थ्यापेक्षाही जास्त गुण मिळाल्याने कुलकर्णी सरांनाही आश्चर्य वाटले. टेक्निकल स्कॉलरशिप दरमहा चार रुपये मिळाली.

अकरावीच्या वर्गात असताना 'माय एम इन लाइफ' या विषयावर निबंध लिहिताना मला डॉक्टर व्हायचे आहे, असे लिहिल्याने रावतेकर सर त्याला विचारतात, ''फक्त निबंधात लिहिण्यापुरतं हे आहे की खरोखरच तुला डॉक्टर व्हायचंय? मग या टेक्निकल शाळेत कशाला आलास?'', ''मला वडिलांनी जबरदस्तीने या शाळेत घातलंय.'' तेव्हा रावतेकर सर त्यांच्या वडिलांना अकरावीनंतर डीएव्ही कॉलेजात शास्त्र शाखेला प्रवेश घेण्याबाबत आवर्जून सांगतात. 'आपल्या स्वप्नांना पंख मिळाले.' असे अनिल गांधी यांना वाटते. पुण्याला फर्ग्युसन कॉलेजमध्ये ॲडमिशन मिळाली. जवळच्याच जैन बोर्डिंगमध्ये मोफत राहण्याची सोय झाली. इंटर सायन्सला चांगले गुण मिळाले. १९५८ मध्ये पुण्याच्या बी. जे. मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. शिष्यवृत्ती मिळाली. कोयाजी क्लिनिक आणि डॉ. प्रयाग यांच्याकडे दररोज दोन-दोन तास काम करून महिना २० रुपयांची प्राप्ती होऊ लागली. मेसचे सेक्रेटरीपद मिळाल्यावर जेवणाचे बिल ९० पैशांवरून ४८ पैशापर्यंत खाली आले, तेव्हा सर्वांनाच आश्चर्य वाटले. डॉ. मुतालिक यांनी कौतुक करून सर्जरीचे एक महागडे पुस्तक भेटीदाखल दिले. गॅदरिंगच्या निवडणुकीत असिस्टंट जनरल सेक्रेटरी म्हणून निवडून येऊन विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या आपल्या लोकप्रियतेचा अनुभव घेतला. एम.बी.बी.एस.च्या शेवटच्या वर्षाला असताना, औरंगाबादला इंटर्नशिपची

मुदत ६ महिने असल्याने पुढचे ६ महिने वाचतील असे कळल्याने, औरंगाबादला ट्रान्सफर मागितली. परीक्षेला फक्त ४ महिने असताना ट्रान्स्फर मिळाली. परीक्षेत ७५ टक्के मार्क मिळाले. पहिला नंबर आला. डॉक्टर होण्याचे स्वप्न पूर्ण झाले. औरंगाबादमध्येच ६ महिने इंटर्नशिप केली. औरंगाबादमध्ये जो लोकांचा दिलदारपणा, भावनिक ओलावा मिळाला तो अजिंठा-वेरुळ लेण्यांसारखा आपल्या हृदयावर कायमचा कोरला गेला आहे, असे डॉ. गांधी कृतज्ञतापूर्वक नमूद करतात. ९ डिसेंबर १९६३ पासून डॉ. अनिल गांधी यांना बी.जे.मध्ये ज्युनियर लेक्चररची पोस्ट मिळाली. ॲनाटॉमी शिकवण्याची संधी मिळाली. सर्जरी विभागात डॉ. पाटील यांच्या रजेच्या काळात विनामोबदला काम करून सर्जरीचा व्यापक अनुभव मिळवला. डॉ. मनोहर जोशी, डॉ. पी. के. भरुचा यांच्या मार्गदर्शनाचा लाभ झाला. डॉ. भरुचांची सर्जरी अफलातून असे, असे डॉ. गांधी म्हणतात. ते सर्जरीक्षेत्रातले एक कलावंतच होते. त्यांची सर्जरी जलद, नेटकी आणि नयनरम्य असे.

१ ऑगस्ट १९६४ पासून वर्षभर हाऊसमनशिप केल्यावर, डॉ. अनिल गांधी यांनी १ ऑगस्ट १९६५ रोजी स्वत:चा दवाखाना तुळशीबागेत जिलब्या मारुतीजवळ 'डिस्पेन्सरी ॲन्ड सर्जिकल होम' असा बोर्ड लावून सुरू केला.

डॉ. अनिल गांधी यांनी स्वत:चा दवाखाना सुरू केल्यावरही ससूनमध्ये ड्रेसिंग सुपरवायझर आणि टिळक आयुर्वेद महाविद्यालयात ॲनाटॉमीचा डेमॉन्स्ट्रेटर म्हणून रोज तीन-तीन तासांच्या अर्धवेळ नोकऱ्याही चालू ठेवल्या. दवाखाना सकाळी ७॥ ते ८॥, दुपारी १ ते २ आणि संध्याकाळी ६ ते ९ या वेळात चालू असे. एम.बी.बी.एस. डॉक्टरला कायद्याने आणि एथिक्सच्या निकषांवरही सर्जरी करण्यास मज्जाव नाही. ससूनमध्ये बऱ्याच शस्त्रक्रिया केल्याने डॉ. अनिल गांधी यांना त्याबद्दल आत्मविश्वास होता. 'आपल्या अनुभवाच्या संचितावर, आपल्या मर्यादा लक्षात घेऊन काम करतोय, तोवर त्यातून पेशंटचे नुकसान करत नाहीय, तोवर हा गुन्हा नाही अशी माझी धारणा होती. त्यानुसार मी माझ्या कक्षेत राहूनच दवाखाना चालवत होतो... असे ते म्हणतात.' (५९) वाढत्या प्रतिसादामुळे पुढे स्वत:च्या गांधी हॉस्पिटलची सुसज्ज इमारतही त्यांनी उभी केली.

त्यांनी केलेल्या काही अवघड शस्त्रक्रियांची माहिती 'चालला... लमाणांचा तांडा' या प्रकरणात आली आहे. गाडी घेतल्यावर पुण्याच्या १०० किलोमीटर परिसरातील डॉक्टर्सना भेटून यवत, दौंड, वरवंड, वाल्हे, नीरा, वडगाव, माळेगाव, बारामती, लोणंद, फलटण, जुन्नर, बेल्हा, पिंपरी-चिंचवड वगैरे गावांना आठवड्यातून तीन दिवस ते डॉ. अरविंद पाटणकर, डॉ. दिलीप पुराणिक या भूलतज्ज्ञ सहकाऱ्यांबरोबर १९६५ ते १९८५ या वीस वर्षांच्या कालावधीत ते भेटी देत आणि सकाळी निघून त्यात्या गावात शस्त्रक्रिया करून संध्याकाळपर्यंत पुण्याला परत येत. वाल्हे येथे

एका दिवसात एका शस्त्रक्रिया शिबिरात सत्तर शस्त्रक्रिया करून त्यांनी आपल्या 'वन डे'चा उच्चांक गाठला.

१९६५ ते १९७१ या काळात डॉ. गांधी जनरल प्रॅक्टिस करीत. फॅमिली डॉक्टरही त्यावेळी समाजात लोकमान्य संकल्पना होती. पेशंटच्या आजारावर उपचार करणे, एवढ्यापुरती ती मर्यादित नव्हती. पेशंटच्या कुटुंबाचा विश्वासू सल्लागार आणि मागदर्शक अशी भूमिकाही करावी लागे. १९७१ मध्ये डॉ. अनिल गांधी एम.एस. उत्तीर्ण झाले. जनरल सर्जन म्हणून आपण काही विशेष नाही; असे त्यावेळच्या स्पेशलायझेशनच्या काळात वाटू लागले. तेव्हा त्यांनी कोलोरेक्टरल सर्जरीमध्ये स्पेशलायझेशन करण्याचे ठरवले. लंडनमधील सेंट मार्क्स हॉस्पिटल हे दीडशे वर्षांहून अधिक काळ याच सर्जरीसाठी प्रसिद्ध असल्याची माहिती मिळाली. तेथे तीन महिन्यांचा डिप्लोमा कोर्स होता. डॉ. गांधींनी त्यासाठी प्रवेश घेतला. रिझर्व्ह बँकेकडून एक्स्चेंजचे परमिट मिळवले. १ जानेवारी ते ३१ मार्च १९७४ या दरम्यान हा कोर्स करण्यासाठी ते लंडनला होते. परतीचा प्रवास करण्याआधी पत्नीसह सोळा दिवसांचा युरोप दौरा केला.

१९७५ मध्ये न्यूयॉर्कला कोलोनोस्कोपीच्या प्रशिक्षणासाठी जाण्याचा बेत केला. माँट्रियल (कॅनडा) येथे होणाऱ्या कॉन्फरन्ससाठी डॉ. गांधी यांचा एक पेपर स्वीकारला गेला होता. त्या कॉन्फरन्सनंतर न्यूयॉर्कच्या स्लोन केटरिंग मेमोरियल हॉस्पिटलला भेट देण्याचा विचारही होता. न्यूयॉर्कला गेल्यावर ते डॉ. अशोक शहा यांच्याकडे उतरले. डॉ. शहा 'स्लोन'मध्येच काम करीत होते. कोलोनोस्कोपीचे एका महिन्याचे प्रशिक्षण संपल्यावर स्लोनमध्ये १५ दिवस निरीक्षक म्हणून डॉ. अनिल गांधी यांना प्रवेश मिळाला. त्यांनी तेथे एक जुना कोलोनोस्कोप विकत घेतला. कस्टमने तो बघून विचारले, 'मोठ्या आतड्याची तपासणी करण्याची दुर्बीण' असे सांगितल्यावर, भारतात येणारा हा पहिलाच कोलोनोस्कोप असावा, असे म्हटल्यावर कस्टमने 'आपल्याच लोकांसाठी नवी सोय होतेय.' म्हणून ड्युटी न घेता त्यांना सोडले.

१९७७ मध्ये डॉ. अनिल गांधी यांनी जपानमधील डॉ. कुनिओ ताकागी यांच्याशी संपर्क साधून टोकियोतील कॅन्सर हॉस्पिटलचा अभ्यास दौरा केला. कॅन्सरच्या वेगवेगळ्या प्रकारच्या शस्त्रक्रिया पाहिल्या. जपानमध्ये त्यांना जठराच्या कर्करोगाचे प्रमाण सर्वात जास्त आढळले. जपानमध्ये लोक दूध फार कमी घेतात. गॅस्ट्रोस्कोपी तपासणी केल्यावर तीन मिमिचा कॅन्सरही त्यांना ओळखता येतो. प्राथमिक अवस्थेत जठराच्या कॅन्सरचे निदान झाल्यामुळे, वेळीच उपचार होऊ शकत असत. डॉ. गांधी यांना आम्लपित्ताचा आणि त्यामुळे पोटदुखीचा त्रास होत असे. त्यांची गॅस्ट्रोस्कोपी करून डॉ. ताकागींनी त्यांचे जठर तुलनेने लहान असल्याची

माहिती दिली. तेथे असलेल्या इलेक्ट्रॉन मायक्रोस्कोपचा वापर करून डॉ. गांधी यांनी पायलोनायडल सायनस या विषयावर संशोधन करून एक पेपर लिहिला. जपानहून परत येताना क्वालालंपूरला 'इंटरनॅशनल ॲकॅडमी ऑफ प्रोक्टॉलॉजी'च्या कॉन्फरन्समध्ये प्रबंध सादर केला. १९७९ मध्ये डॉ. गांधींनी 'गॅस्ट्रो इनटेस्टिनल एन्डोस्कोपी' या विषयावर पहिला अखिल भारतीय परिषद बीजे मेडिकल कॉलेजमध्ये आयोजित केली. त्यावेळी डॉ. ताकागी यांनाही आमंत्रित केले होते.

आपले वैद्यकीय ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी परदेशी वरचेवर जात राहणे आवश्यक आहे, हे लक्षात आल्यावर डॉ. गांधींचे परदेशाचे दौरे सातत्याने होत राहिले. बर्लिनला त्यांना डॅमलर बेंझच्या शोरुममध्ये एक मर्सिडिज कारवर १८ हजार मार्क्सचा (७२ हजार रुपये) टॅग दिसला. ती गाडी त्यांनी घेण्याचे ठरवले. त्यांचे मित्र जी. आर. भरितकर यांनी ती कार घेऊन दुबईला आपल्याबरोबर नेली. तेथून ती १९८२ साली डॉ. गांधींकडे आली. सोळा वर्षे ती कार गांधींनी वापरली. या कारमधून नानी पालखीवाला, किरण बेदी, अरुण शौरी प्रभृतींना पुण्यात फिरवण्याची संधी मेहता पब्लिशिंग हाऊसच्या अनिल मेहतांमुळे डॉ. गांधींना लाभली.

डॉ. अनिल गांधी यांनी मैत्र जीवाचे या प्रकरणात आपल्या आयुष्यात आलेल्या काही मित्र सुहृदांबद्दल लिहिले आहे. सोलापूरचा बालमित्र सूर्यकांत बिराजदार, वासू तरळगट्टी, रवींद्र व्होरा, प्रकाशक अनिल मेहता, रमण गांधी, डॉ. अरविंद पाटणकर, फर्निचरचे काम करणारे राजिंदरसिंग कंडा, लंडनला भेटलेले रमेश रेगे, जीआरबी (गणपतराव भरितकर), इन्कमटॅक्स कमिशनर टी.डी.कुमार, लेखिका मीना प्रभू, के. आर. शहा, डॉ. सुनीलदत्त चौधरी (विद्यार्थी व हाऊसमन), प्रदीप गांधी, डॉ. दिनेश व सौ. शोभा बच्छाव, डॉ. संजय देवधर, अविनाश धर्माधिकारी, विकास आमटे यांच्याविषयी डॉक्टरांनी भरभरून लिहिले आहे.

पोलाद उत्पादनात जगात अग्रभागी असलेले उद्योगपती लक्ष्मीनिवास मित्तल यांच्या परिचयाचा लाभही डॉ. गांधी यांना झाला. डॉ. गांधी यांचा मुलगा अजय हा बॅडमिंटनमध्ये स्लॅझेंजर विंबल्डन बॅडमिंटन स्पर्धेत अजिंक्यपद मिळवणारा, पहिला खेळाडू ठरला. इंडोनेशियातील जाकार्ता येथील बॅडमिंटन शाळा आणि तिचे प्रमुख रुडी हार्टोनो (यांना बॅडमिंटनचे ब्रॅडमन मानले जाते) यांच्याकडे चांगले कोचिंग मिळेल, असे डॉ. गांधींना समजले. त्यांनी रुडी हार्टोनी यांना अनेक पत्रे पाठवली, पण उत्तर आले नाही. एका परिचिताने इंडोनेशियातील 'सुराबाया' येथील एका भारतीय उद्योगपतीशी संपर्क साधून बघा असे सुचवले. त्याप्रमाणे डॉ. गांधींनी त्यांना पत्र पाठवले. 'आपला प्रत्यक्ष परिचय नाही. परंतु एका कामासंदर्भात आपल्याला तसदी देत आहे. माझा मुलगा बॅडमिंटन उत्तम खेळतो. त्याला रुडी हार्टीनो स्कूलमध्ये कोचिंगसाठी पाठविण्याची माझी इच्छा आहे. मी त्यांच्याशी गेले ६ महिने

पत्रव्यवहार करतोय. पण तिकडून काहीच प्रतिसाद नाही. आपण कृपया चौकशी करून काही कळवाल का?'

या पत्राचे उत्तर लगेच आले. 'भारतीय लोक उच्चशिक्षणासाठी मुलांना परदेशात पाठवतात, परंतु खेळाच्या प्रशिक्षणासाठी पाठवण्याचा विचार करणारे आपल्यासारखे अपवादात्मकच! मला त्यामुळे आपले कौतुक वाटते. रुडी हार्टोनी आमच्याच सुराबायातील शाळेत तयार झाला, त्या बॅडमिंटन शाळेत आपल्या मुलाला पाठवा. त्याचे प्रशिक्षण, निवास, भोजन वगैरे सगळी व्यवस्था मी करीन. तुमचं नक्की झाल्यावर फ्लाइट नंबर वगैरे कळवा.' लक्ष्मीनिवास मित्तल यांचे हे पत्र वाचून सुराबसायाचे बॅडमिंटन स्कूल बघण्यासाठी डॉ. गांधी सुराबायाला जातात. विमानतळावर मित्तल यांचा माणूस त्यांना घ्यायला येतो. हॉटेलवर सोडतो. दुसऱ्या दिवशी सकाळी मित्तल यांच्या घरी पाहुणचार होतो. शाळेची अवस्था मात्र दयनीय वाटते. त्यामुळे तेथे अजयला पाठवण्यात काही अर्थ नाही, असे त्यांना वाटते. तेथून डॉ. गांधी जाकार्ताला जातात. रुडी हार्टीनोला भेटतात. त्यांची शाळा मात्र उत्तम असते. तेथे अजयबरोबरच नितीन आणि गीता या आपल्या मुलांनाही बॅडमिंटनच्या प्रगत शिक्षणासाठी पाठवण्याचे ते ठरवतात. उन्हाळ्याच्या सुटीत तीन महिन्यांच्या वर्गासाठी फी भरतात. मित्तल यांच्या सेक्रेटरीला फोन करून ही माहिती देतात. नंतर मित्तल यांचा फोन येतो, 'मुलं जाकार्ताला केव्हा येणार ते कळवा. त्यांना स्कूलवर पोचवण्याची व्यवस्था मी करीन.' मुले जाकार्ताला येतात; तेव्हा मित्तल यांचा माणूस त्यांच्या स्वागतासाठी हजर असतो. अजयची एक बॅग सिंगापूरलाच राहिल्याचे लक्षात येते. मित्तल यांचा माणूस त्याला तेथील बाजारात नेऊन आवश्यक ते सामान घेऊन शाळेवर पोचवतो. मित्तल जाकार्ताला येत; तेव्हा मुलांना हॉटेलवर बोलावून घेत. गप्पा मारत, खाऊपिऊ घालत, त्यांची चांगलीच दोस्ती झाली.

पुढे मित्तल डॉ. गांधींकडे पुण्याला जेवण्यासाठी आले. पांगळोली (लोणावळा) येथील त्यांच्या आदिवासी आश्रम शाळेलाही त्यांनी भेट दिली. गावात पाण्याची सोय नव्हती हे बघून दोन कूपनलिका खोदून, त्यावर सबमर्सिबल पंप बसवून गावातील लोकांची पिण्याच्या पाण्याची उत्तम सोय करून दिली. सणसवाडी येथे मित्तल यांनी पोलादप्रकल्प सुरू करण्याचे ठरवले, तेव्हा डॉ. गांधी यांनी आपल्या परीने त्याला मदत केली.

मित्तल यांच्या औदार्याची आणि दिलदारपणाची हकीकत भारावून टाकते. हे पुस्तक त्यांनाच अर्पण करण्यात आले आहे.

डॉ. अनिल गांधी यांनी आदिशक्ती ट्रस्टतर्फे पांगळोली (लोणावळा) येथे आदिवासी मुलांसाठी आश्रमशाळा चालवली. ती आश्रमशाळा पुढे कामशेतला हलवली. हिंगणे स्त्री शिक्षण संस्थेला चालवायला दिली. या शाळेत शिकलेला

अर्जुन पिरकड हा मुलगा डॉक्टर झाला.

महाराष्ट्र टेक्निकल एज्युकेशन सोसायटीच्या कामातही डॉ. गांधींनी लक्ष घातले. १९७९ मध्ये सर्जरीचा प्राध्यापक म्हणून गांधी डॉ. रानडे हॉस्पिटलमध्ये अध्यापन करू लागले. ॲलोपथीचा विभाग डॉ. गांधींनी विकसित केला. मार्च २००८ मध्ये संस्थेचे ते अध्यक्ष झाले.

कै. धोंडूमामा साठे होमिओपॅथी कॉलेजची प्रतिमा उंचावण्यासाठी आणि प्रवेशसंस्था वाढविण्यासाठी प्रयत्न केले. त्याचबरोबर होमिओपॅथिक संशोधनकेंद्र सुरू केले. त्याला पद्मश्री एस. एम. बेहेरे रिसर्च सेंटर इन होमिओपॅथी असे नाव दिले. ९ नोव्हेंबर २००८ रोजी त्याचा शुभारंभ झाला.

याच संस्थेचा संजीवन हॉस्पिटलचा ज्ञानप्रबोधिनीशी झालेला करार नोव्हेंबर २००९ मध्ये संपणार होता. ज्ञानप्रबोधिनीने किरकोळ वाढीचा प्रस्ताव मांडला. तेव्हा कराराचे नूतनीकरण न करण्याचा निर्णय यासाठी नेमलेल्या समितीने घेतला. ज्ञानप्रबोधिनीने ताबा देण्याला खूप विलंब लावला आणि हॉस्पिटल बंद करूनच ताबा दिला. त्यामुळे महाराष्ट्र टेक्निकल एज्युकेशन संस्थेचे दीड कोटीचे नुकसान झाले. नंतर शाश्वत ग्रुपकडे या हॉस्पिटलची जबाबदारी देण्याचे ठरले.

वैद्यकीय क्षेत्रात चाळीस-पंचेचाळीस वर्षे घालवल्यावर डॉक्टरांना त्याबद्दलची आपली मतेही मांडावीशी वाटतात. डॉक्टर औषधे देतात आणि पेशंट बरे होतात, हा समज काही प्रमाणातच खरा आहे. बरेचसे आजार खरे तर पेशंटच्या प्रतिकारशक्तीमुळे बरे होतात. काही आजारांची वाढ आपोआप थांबते. काही आजार रेंगाळत राहतात. काही कधीच बरे होत नाहीत. काही आजार औषधाने नक्कीच बरे होतात. काही आजारात औषधाचा वा डॉक्टरचा उपयोग आजाराची तीव्रता कमी करण्यासाठी आणि रोग्याची प्रतिकारक्षमता वाढवण्यासाठी होतो. प्रतिकारशक्ती नसेल, क्षीण असेल तर स्ट्रॉंग अँटिबायोटिक्सही कुचकामी ठरते. एड्सग्रस्त रुग्ण हे याचे उदाहरण होय.

गोवर, कांजिण्या, कावीळ, सर्दी पडसे यावर गुणकारी औषधे नाहीत. विषाणुजन्य आजारावर औषधे नाहीत.

हर्निया, आतड्याचे काही आजार, करोनरी आर्टरीतील ब्लॉकेजेस, शारीरिक व्यंगे, अस्थिभंग, अल्पकाळासाठी बरा होणारा कॅन्सर यासारख्या दुखण्यात डॉक्टर्सना श्रेय नक्कीच देता येईल. प्लासिबो इफेक्टही अनेकदा जाणवतो. फॅमिली डॉक्टरवरील श्रद्धेमुळे काहीजणांना बरे वाटते. पुष्कळसे आजार केवळ प्रतिकारशक्तीमुळे बरे होतात. ॲलोपॅथीमध्ये संशोधनावर कटाक्ष असतो. होमिओपॅथी किंवा युनानी या प्रणालीत संशोधनाला आता कुठे चालना मिळत आहे. वैद्यकीय क्षेत्रातील कट प्रॅक्टिसमुळे डॉक्टर या संस्थेची जनमानसातील प्रतिमा व विश्वासार्हता खालावत आहे. मोठमोठ्या ट्रस्टनी चालविलेल्या हॉस्पिटलमध्ये चॅरिटी औषधापुरतीही दिसत नाही.

हॉस्पिटलला देणगी दिल्याने आयकरात सूट मिळते. अनेक दलाल अशा देणग्यांचे व्यवहार घडवून आणतात. भ्रष्टाचाराचा बंदोबस्त व्हायला हवा, असे डॉक्टरांना वाटते.

मनुष्यप्राणी, विश्वनिर्माता, निसर्गाची किमया, नर-वानर साखळी, भारतीय संस्कृती, श्रद्धा-अंधश्रद्धा, देव कल्पना, अतींद्रिय शक्ती, ज्योतिषपत्रिका, भूतपिशाच्च वगैरे विषयांवरील मतेही चिंतन या प्रकरणात संकलित केली गेली आहेत. आपले कुटुंब, पत्नी, मुले, नातलग, वास्तू, हॉस्पिटलची उभारणी, गुंतवणूक या सर्वांबद्दल डॉ. गांधींनी मोकळेपणाने लिहिले आहे. दीर्घोद्योगी, अखंड परिश्रम, साक्षेप, चांगलं करण्यावरची श्रद्धा यांच्या बळावर त्यांची झालेली वाटचाल एकूण समाधानकारक आणि संतोषदायक झाली असे त्यांच्याप्रमाणेच वाचकांनाही वाटेल. डॉक्टर होऊन वैद्यकीय प्रॅक्टिस करणे, हे गृहीतच असते. त्या जोडीने सामाजिक आणि सार्वजनिक कार्य करण्याची तळमळ दाखवणे आणि आपले सामाजिक उत्तरदायित्व पार पाडणे यात डॉ. अनिल गांधी यांचे वेगळेपण दिसते. ते त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला तेजोवलय देते. समाजसेवी डॉक्टरांची एक वाचनीय आणि प्रांजल आत्मकथा म्हणून 'मना सर्जना' वाचकांना प्रेरणादायक ठरेल यात शंका नाही.

**किंमत : २००रु. सभासदांना : सवलतीत पोस्टेज : २५रु.**


## आत्मकथन


| | | |
|---|---|---|
| चाकाची खुर्ची | नसीमा हुरजूक | १८० |
| खाली जमीन वर आकाश | डॉ. सुनीलकुमार लवटे | १५० |
| जिहाद | हुसेन जमादार | २२० |
| भोगले जे दुःख त्याला... | आशा आपराद | २२० |
| बारबाला | वैशाली हळदणकर | २०० |
| मी भरून पावले आहे | मेहरुन्निसा दलवाई | १६० |
| विमुक्ती | दिपा महानवर | २२० |

**मेहता पब्लिशिंग हाऊस** पोस्टेज प्रत्येकी २५रु.

## पुस्तक परिचय

**माणसांना उत्तम समजून घेणाऱ्या
कुशल व्यवस्थापकाची
समृद्ध कारकीर्द**

# रुसी मोदी : द मॅन हू ऑल्सो मेड स्टील




**पार्थ मुखर्जी । ज्योती सबरवाल** अनु. अंजनी नरवणे

भारताच्या औद्योगिक संपन्नतेत भर घालणारी अनेक घराणी प्रसिद्ध आहेत. टाटा, बिर्ला, मित्तल, अंबानी, वालचंद हिराचंद, किर्लोस्कर, पोद्दार, धूत, बांगड, बजाज. या सर्वांनी वेगवेगळ्या कारखान्यांची उभारणी केली. नवनवी उत्पादने करून भारतीय जनतेच्या गरजांची पूर्तता केली. परदेशातून येणाऱ्या उत्पादनांना पर्याय निर्माण केले. भारताचे इतर देशांबरोबर असलेले परावलंबित्व काही प्रमाणात का होईना, कमी करून भारताला आत्मनिर्भर होण्याची अनुकूलता निर्माण केली.

यापैकी अनेक घराण्यांमध्ये कौटुंबिक व्यवस्थापनावर भर राहिला. पुढे व्यावसायिक व्यवस्थापनाची जोड गरजेप्रमाणे देण्यात आली. त्यामुळे व्यवस्थापकांचाही एक वर्ग निर्माण होत गेला. पिढ्यान्‌पिढ्या व्यवस्थापनाची जबाबदारी या वर्गाने अग्रहक्काने आणि कौशल्याने निभावून नेली. अर्थात वेगवेगळ्या वर्गातून नवे कारखानदार आणि नवे व्यवस्थापन तज्ज्ञ यांचीही भर पडत राहिली. भारतात आज अब्जाधीश घराण्यांची आणि प्रशिक्षित व्यवस्थापकांची संख्या वाढत आहे आणि त्यांची दृष्टी आता जागतिक स्पर्धेत उतरण्याच्या दिशेने झेपावत आहे. भारतीय लोकल कंपन्या आता ग्लोबल व्हायची, आकांक्षा उरी बाळगत वाटचाल करायला सिद्ध होत आहेत.

सर जमशेद्‌जी टाटा यांनी टाटा उद्योगसमूहाचा पाया घातला. १८६८ साली नवसारीहून मुंबईला आलेल्या जमशेदजींनी व्यापारी पेढी सुरू केली. कापड उद्योगापासून आरंभ करून कापड गिरण्या काढल्या. पोलाद कारखाना काढण्याचे ठरवून १९०२ साली दोराबजी टाटा या आपल्या पुत्राला त्या दृष्टीने तयारी करण्यास सांगितले. १९०४ मध्ये जमशेदजींचे जर्मनीत निधन झाले. दोराबजींनी वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी झोकून दिले. टाटानगर (जमशेदपूर) हे नवे गाव खरकाई व सुवर्णरेखा या दोन नद्यांच्या संगमाच्या ठिकाणी वसवून तेथे पोलाद कारखाना उभा केला. १९१० मध्ये दोराबजींना सर ही पदवी देण्यात आली. १९२४ पर्यंत कारखान्याला बऱ्याच अडचणींना तोंड द्यावे लागले. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी मात्र कंपनीला खूप ऑर्डर्स मिळाल्या. उत्पादन वाढले. आर्थिक स्थिती सुधारली.

टाटांनीही आपल्या या वेगवेगळ्या व्यवसायांच्या आणि कारखान्यांच्या संचालनासाठी हुशार, कर्तबगार व्यवस्थापन तज्ज्ञांची मदत घेतली. त्या व्यवस्थापकांचीही निष्ठावंत घराणी घडत गेली.

अशा व्यवस्थापन तज्ज्ञांपैकी मोदी हे टाटांच्या विश्वासातले एक घराणे.

फिरोजशहा मोदी हे गुजरातेतील सुरत शहर सोडून, अठराव्या शतकात मुंबईला नशीब अजमावण्यासाठी आले. कापड गिरणीत कामाला लागले. त्या गिरणीचे मॅनेजर झाले.

त्यांचे चिरंजीव बरजोरजीही मुंबईला येऊन स्थायिक झाले.

बरजोरजींचे सुपुत्र होमी मोदी.

होमी मोदी यांनी एक उत्तम कायदेपंडित म्हणून लौकिक मिळवला. त्यांच्या पत्नीचे नाव लेडी जेरबाई. त्यांना ब्रिटिश सरकारने अनेक महत्त्वाच्या पदांवर नेमले. व्हाइसरॉयच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलचे सदस्यत्व दिले. नंतर लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचे सदस्य म्हणून निवडले. नाइटहूड देऊन 'सर' बनवले. मुंबई इलाख्याचे तसेच युनायटेड प्रॉव्हिन्सेसचे गव्हर्नर म्हणून नेमले. सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे चेअरमन, वेस्टर्न इंडिया टर्फ क्लबचे चेअरमन वगैरे पदेही त्यांनी भूषविली. सर होमींचा त्यामुळे त्या काळात खूपच दबदबा होता. टाटा उद्योगसमूहाने सर होमी मोदी यांना संचालक मंडळावर घेतले. सर दोराबजी टाटा यांच्याशी त्यांचे संबंध फारच जवळचे होते.

भारत स्वतंत्र झाल्यावर पंतप्रधान जवाहरलाल नेहरूंनी सर होमींना खासदार म्हणून नेमले. उत्तर प्रदेशचे गव्हर्नर केले.

सर होमी मोदी यांना तीन मुले.

थोरला मुलगा रुस्तुम. १७ जानेवारी १९१८ रोजी जन्म. ज्योतिषाने त्याचे भविष्य सांगितले, 'हा मुलगा एखाद्या राजासारखे आयुष्य जगेल. खूप संपत्ती मिळवेल. आसपासच्या लोकांची मने जिंकून घेण्याचे कौशल्य त्याच्यात असेल.' लेडी जेरबाई आणि सर होमी मोदी यांनी रुसीचे खूप लाड केले; पण त्याला सर्वसामान्य मुलांमध्ये सहजपणे मिसळू दिले. त्याला चारित्र्य, विश्वासार्हता आणि अनुकंपा यांचे धडे दिले. शिस्त आणि प्रामाणिकपणा यांचे संस्कार केले.

दुसरा मुलगा काली.

तिसरा मुलगा पिलू. पिलू मोदी हे राजकारणात पडले. विनोदी शैलीमुळे ते गाजत राहिले.

या तिघांच्या जडणघडणीकडे सर होमी मोदी आणि लेडी जेरबाई मनापासून लक्ष देत. त्यासाठी भरपूर वेळ देत.

मुंबईच्या भद्र न्यू हायस्कूलमध्ये गुजराती माध्यमातून रुसींचे शिक्षण झाले. लेडी जेरबाईंना मुलाला शिक्षणासाठी परदेशी पाठवण्याची इच्छा होती. त्यांच्या बहिणीची मुले इंग्लंडच्या शाळेत शिकली. ती सुटीत परत आल्यावर त्यांच्या चटपटीतपणामुळे लक्ष वेधून घेत. परंतु सर होमी मोदी यांना कोवळ्या वयात मुलांना परदेशी पाठवण्याचा विचार रुचत नव्हता. त्यामुळे पतिपत्नीत अनेकदा वाद होई. शेवटी होमी मोदी यांनी रुसीला इंग्लंडमध्ये पाठवण्याचे ठरवले. १९२७ साली रुसींना घेऊन आई-वडील बोटीने इंग्लंडला (त्यावेळी विमानसेवा नव्हती) हॅरोला जाण्यासाठी रुसींना सेंटसायप्रियन्स या प्रिपरेटरी स्कूलमध्ये घालण्यात आले.

पुढे रुसी १२ वर्षे इंग्लंडमध्ये होते. १९३९ मध्ये शिक्षण संपवून रुसी मोदी भारतात परतले. हॅरो येथे पब्लिक स्कूलच्या कडक शिस्तीत रुसींचे शिक्षण झाले.

१९३५ मध्ये ऑक्सफर्डला ख्राइस्ट चर्च कॉलेजमध्ये रुसींच्या नव्या आयुष्याची खरी सुरुवात झाली. स्वर्गात असल्यासारखा तो काळ वाटत असे. रुसी अभ्यासापेक्षा इतर गोष्टीतच जास्त रस घ्यायचे.

'ते पियानो वाजवायचे. नाईट क्लब्जमध्ये गाणी म्हणायचे. मित्रमैत्रिणींबरोबर डान्स करायचे. पत्त्यांची जादू दाखवायचे. फुटबॉल सामने खेळायचे. आयुष्य म्हणजे नुसती मौजमजा होती.' अभ्यासात त्यांचे लक्ष नसे. इतिहास हा सोपा विषय त्यांनी घेतला. ऐतिहासिक व्यक्तींच्या यशापयशाचे मूल्यमापन करण्यात मात्र त्यांना स्वारस्य वाटे. त्यामुळे नेपोलियन बोनापार्टबद्दल त्यांना खूपच आदर वाटे. तो त्यांचा आदर्श होता. प्रोफेसर जेसी मास्टरसन हे रुसींचे ट्युटर होते. त्यांचाही रुसींवर मोठा प्रभाव पडला. त्यांच्याशी रुसींचे छान जमे.

ऑक्सफर्डच्या या वास्तव्यात रुसी मोदी यांची आणि शास्त्रज्ञ आइनस्टाइन यांची चांगली दोस्ती झाली. सहा महिने हे दोघे शेजार शेजारच्या खोलीत राहत होते. रुसी पियानो वाजवत. आइनस्टाइन व्हायोलिन वाजवत. ते दोघे एकत्र वाद्ये वाजवत. आइनस्टाइनच्या साधेपणाने रुसी मोदी थक्क होत. या दोघांच्या वाद्यवादनाचे काही सार्वजनिक कार्यक्रमही झाले.

वर्षातून एकदा तरी सर होमी मोदी आणि जेरबाई मुलाला भेटायला इंग्लंडमध्ये जात. रुसी, काली आणि पिलू तिन्ही भावंडांना युरोपमध्ये उत्तमोत्तम ठिकाणी घेऊन जात. प्रेक्षणीय स्थळे दाखवत. चांगल्या हॉटेलमध्ये उत्तमोत्तम पदार्थांचा आस्वाद घेत. युरोपियन संस्कृतीशी रुसी मोदी यांची जी जवळीक झाली, ती अखेरपर्यंत टिकली. दरवर्षी ते इंग्लंडला भेट देत.

वेगवेगळ्या क्षेत्रातील बुद्धिमान माणसे ऑक्सफर्डला ज्ञानार्जनासाठी आणि अध्यापनासाठी येत. फ्रेंच, जर्मन, स्पॅनिश अशा भिन्नभिन्न वंशाच्या लोकांशी त्यांचा संबंध आला. त्यामुळे त्यांचा दृष्टिकोनही विशाल आणि विश्वात्मक झाला. कोणाही व्यक्तीशी संबंध प्रस्थापित करणे आणि मित्र जोडणे या कलेत रुसी मोदी पारंगत झाले. त्यांचे ब्रिटिश मित्र राइट ऑनरेबल अर्ल जेलिको यांनी 'रुसी हे कुठल्याही देशात गेले, तरी घरच्यासारखे मोकळेपणाने वागू शकतात. इंग्लंडबद्दल तर त्यांना इंग्लिश माणसापेक्षाही जास्त माहिती आहे.' असे म्हटले आहे. 'माणसांशी उत्तम संबंध ठेवता येणे, या क्षेत्राइतकी अन्य कुठल्याही क्षेत्रात विशेष काही मी मिळवण्याची बढाई मला मारता येणार नाही.' असे स्वत: रुसीच वेळोवेळी अभिमानाने सांगत.

इंग्लंडमध्ये पदवीसाठी त्यांनी इतिहास विषय घेतला, परंतु अभ्यासाकडे फारसे लक्ष त्यांनी कधी दिले नाही. शेवटच्या परीक्षेच्या वेळी प्रश्नपत्रिकेतील एकाही प्रश्नाचे उत्तर आपल्याला देता येणार नाही, असे त्यांना जाणवले; तेव्हा स्वत:च काही प्रश्न काढून त्यांची उत्तर लिहून ती उत्तरपत्रिका म्हणून त्यांनी दिली. परीक्षकांनी

या कृतीबद्दल स्पष्टीकरण मागितले, तेव्हा त्यांनी वस्तुस्थिती स्पष्ट केली. त्यांचा खुलासा ऐकून आणि त्यांनीच काढलेल्या प्रश्नपत्रिकेतील उत्तराचा आवाका लक्षात घेऊन ऑक्सफर्डने त्यांना हिस्टरी ऑनर्समध्ये उत्तीर्ण केले. ऑक्सफर्डच्या इतिहासात असे दुसरे उदाहरण नसेल.

१९३५ मध्ये ख्राइस्ट चर्चमध्ये शिकत असताना जेआरडी (जहांगीर रतन दादाभॉय) टाटा रुसी मोदींना प्रथम भेटले. रुसींच्या प्रसन्न व्यक्तिमत्त्वाने आणि वागण्याबोलण्यातील आत्मविश्वासाने जेआरडी प्रभावित झाले. रुसी इतिहासाचा अभ्यास करीत आहेत, हे ऐकून त्यांना आश्चर्य वाटले. 'अरे, आज इंजिनिअरिंग क्षेत्रात उत्तम संधी आहेत. तू इतिहास हा विषय कसा घेतलास?' त्यांनी विचारले. रुसींनी इतिहासातल्या अनेक आश्चर्यकारक तपशीलांनी त्यांना चकित केले असणार. त्यामुळे १९३९ साली शिक्षण संपवून भारतात परतल्यावर जेआरडींनी रुसींना जमशेदपूरला टाटा स्टीलमध्ये काम करण्यास पाठवले. सर होमी मोदी त्यासाठी शब्द टाकला नाही. जेरबाईंना मात्र मुलाला मुंबई सोडून इतक्या दूर पाठवल्याबद्दल खूप काळजी वाटली. रुसींना जमशेदपूर गाव पाहताक्षणीच आवडले.

त्या कारखान्यातले सुरुवातीचे दिवस मात्र रुसींची परीक्षा पाहणारे होते.

कारखान्याचे जनरल मॅनेजर सर जहांगीर गांधी हे होते. अमेरिकेतील केमिकल इंजिनिअरिंगची पदवी घेऊन ते आलेले होते. त्यांनी रुसींना पहिलाच प्रश्न केला, 'इथं तू काय होशील असं तुला वाटतं?' रुसींनी उत्तर दिलं, 'एक दिवस या खोलीत मी बसलेला असेन.' गांधींना हे बाणेदारपणाचे उत्तर आवडले नाही. त्यांनी रुसींच्या मार्गात पुढे दीर्घकाळ अडथळे आणण्याचे जारी ठेवले.

रुसींना टाटा स्टीलचे डायरेक्टर सर अर्देशिर दलाल यांनी ऑफिस असिस्टंट म्हणून काम देऊ केले, पण रुसींनी स्टील प्लँटच्या कोक ओव्हन विभागात शिकाऊ खलाशी म्हणून शारीरिक काम करण्याचा आग्रह धरला. भट्टीमधून गरम लोखंडाचा पट्टा काढून तो फरशीवरून ओढत नेऊन रोलिंगसाठी द्यायचा असे काम करावे लागे; पण त्यांनी माघार घेतली नाही. या कामाबद्दल रोज आठ आणे मजुरी मिळे. पुढे ती बारा आणे झाली. अर्थात तेवढ्यात रुसींचे भागणे शक्यच नव्हते. घरून पैसे मागवावे लागत.

पोलाद बनवण्याच्या प्रक्रियेचे ज्ञान प्रत्यक्ष काम करून रुसींनी मिळवले.

पहिल्या दीड वर्षात रुसी मोदी यांनी उत्पादन विभाग, जनरल मॅनेजरचे ऑफिस, गावचे प्रशासन, कोळशाच्या खाणी, सेल्स ऑफिस अशा वेगवेगळ्या विभागात काम केले. सर अर्देशिर दलाल यांनी या काळात त्यांना संपूर्ण सामान्य ज्ञानाचे अनुभवाचे धडे दिले. पुढे तीन वर्षे कलकत्त्याला कंपनीच्या एजंटचे असिस्टंट म्हणून त्यांना पाठवण्यात आले. त्यानंतर डेप्युटी कोल सुपरिंटेंडंट कमर्शियल म्हणून

कंपनीच्या ऑफिसमध्ये काही काळ काढला. पुढे डेप्युटी आयर्न अँड स्टील कंट्रोलर आणि डेप्युटी कोल सुपरिंटेंडंट अशा नेमणुका होत गेल्या. १९४७ साली ते ॲडिशनल लेबर ऑफिसर झाले. सर गांधी यांचा त्यांच्यावर राग होताच. त्यांनी रुसींना कोळशाच्या व इतर खाणींचे काम बघायला सांगून जमशेदपूरपासून दूर पाठवण्याचा आदेश काढला. रुसींनी जमशेदपूरमध्येच वास्तव्य ठेवून खाणींना भेटी देणे सुरू ठेवले.

याच सुमाराला रुसी मोदी यांची भावी कारकीर्द घडवणारी एक घटना घडली आणि मानवसंसाधनासाठी योग्य व्यक्ती, माणसे हाताळण्यात कुशल असणारी व्यक्ती म्हणून रुसी मोदींची प्रतिमा तयार झाली.

कामगारांचा एक जमाव बोनससाठी निदर्शने करीत होता, समोर येणाऱ्या सुपरवायझर्सना पिटून काढत होता. 'मारो साले को, मारो' ओरडत तोडफोड करीत होता. खादीच्या हाफ शर्ट- हाफ पँटमध्ये रुसी मोदी त्या जमावापुढे गेले आणि एका स्टुलावर उभे राहून ओठात सिगार ठेवून घोषणा देणाऱ्या माणसाला म्हणाले, 'माचीस है?' त्या माणसाने खिशातून आगपेटी काढून दिली. रुसींनी शांतपणे, संथपणे सिगार पेटवली आणि एक झुरका घेत विचारले, 'क्या है? क्या तकलीफ है?' ते लोक घोषणा थांबवून बोलू लागले. रुसींनी त्यांना म्हटले, 'बैठो ना! बैठकर बोलो.' ते खाली बसले. रुसींनी त्यांना म्हटले, 'आता जा. मी तुम्हाला उद्या भेटेन.' आश्चर्य म्हणजे, ते सर्वजण शांतपणे निघून गेले. रुसींनी नंतर चार दिवस सगळ्या खातेप्रमुखांना भेटून कामगारांच्या अपेक्षा समजावून घेतल्या. एका आठवड्यात कामगारांची समजूत काढण्यात त्यांना यश आले. मुंबईहून जेआरडी तातडीने आले. अर्देशिर दलाल आले. करारावर सह्या झाल्या. जेआरडींनी रुसींना १९५३ साली डायरेक्टर ऑफ पर्सोनेल केले. कामगारांबरोबर निकटचे संबंध प्रस्थापित करणे, कामगारांकडून जास्तीत जास्त काम करून घेणे, यात रुसींचा हातखंडा होता. पुढे पन्नास वर्षांमध्ये कारखान्यात एकदाही संप झाला नाही किंवा काम बंद पडले नाही. व्यवस्थापन आणि कामगार या दोघांचीही एकमेकांबद्दलची जबाबदारीची जाणीव भक्कम असायला हवी. 'इतरांनी आपल्याशी जसं वागावं, असं आपल्याला वाटतं, तसं आपण इतरांशी वागायला हवं.' हे बायबलमधले वचन रुसी मोदी यांना प्रिय आहे. रुसींनी कामगारांना कधी असंतुष्ट वाटण्याची संधीच दिली नाही.

कोळशाच्या खाणींचे डेप्युटी एजंट-कलकत्ता (१९५५), कच्चा मालाचे संचालक (१९६५), डायरेक्टर-ऑपरेशन (१९६६), डायरेक्टर टाटा इंडस्ट्रीज् (१९६६), डायरेक्टर टिस्को (१९६८), जॉइंट मॅनेजिंग डायरेक्टर (१९७२), मॅनेजिंग डायरेक्टर (१९७४), व्हाइस चेअरमन (१९७९), चेअरमन अँड मॅनेजिंग डायरेक्टर अशी रुसी मोदींची एका हुद्यावरून दुसऱ्या उच्च पदावर होत राहिली. 'माणसांना कार्यप्रवण

करणारा सर्वोत्तम प्रभावी अधिकारी म्हणूनी रुसींची प्रतिमा उद्योगविश्वात तयार झाली.'

रुसी मोदी यांनी टाटा उद्योगसमूहात केलेल्या कामाचे मोल व महत्त्व या पुस्तकात विविध तपशिलांसह सविस्तर नोंदवण्यात आले आहे. कलकत्त्याला जामादोबा कोळसा खाणीचे प्रमुख म्हणून त्यांना पाठवण्यात आले. ही खाण नुकसानीत चालत होती. रुसींनी खाणीला भेट दिली. कामगारांची परिस्थिती हलाखीची होती. दिवसभर कष्टांचे काम केल्यावर कुटुंबाबरोबर आराम करायला चांगलं घर हवं हे त्यांना तीव्रपणे जाणवले. त्यांनी असलेली घरं सुधारण्याचा आणि नवी घरं बांधण्याचा कार्यक्रम हाती घेतला. पाण्याची आणि दवाखान्याची सोय केली. खेळांसाठी मैदान तयार केले. व्यायामशाळा काढल्या. पगारात सुधारणा करून चांगलं काम केल्यास बोनस देऊ अशी घोषणा केली. तेथील कामगारांच्या प्रश्नांच्या मुळाशी जात ते सोडवण्याचा प्रयत्न केला. कामगारांच्या मुलांशी ते खेळत. त्यामुळे रुसी मोदी हे कामगारांचे जितेजागते दैवत बनले. खाणीतले उत्पादन वाढले. नफा होऊ लागला. कोणत्याही पदावर असोत, रुसी मोदींचे लक्ष कामगारांच्या जीवनपद्धतीत राहणीमान चांगला बदल घडवून आणण्याकडे असे. कामगार आणि व्यवस्थापन यांचे उत्तम संबंध हे टाटा समूहात अजोड राहिले.

'इंजिनिअर, अर्थशास्त्रज्ञ किंवा कायदेतज्ज्ञ म्हणून माझे शिक्षण झालेले नाही; पण मला माणसं आवडतात. हिंदुस्थानातला कामगार हा मनानं भला माणूस असतो. त्याचा स्वाभिमान सांभाळला गेला, तर तो तुम्हाला हवं तसं काम करून देईल. व्यवस्थापनात उत्पादन आणि नफा यांच्यापेक्षा माणसाचे आणि त्याच्या स्वाभिमानाचे महत्त्व जास्त आहे.' असे ते मानतात. तसे कृतीत आणतात.

तब्बल ५३ वर्षे रुसी मोदी जमशेदपूरच्या पोलाद कारखान्यात कार्यरत होते. त्या जनता राजवटीत उद्योगमंत्री जॉर्ज फर्नांडिस यांनी टिस्कोचे राष्ट्रीयीकरण करण्याचा प्रस्ताव मांडला. (जानेवारी १९७९) कंपनीच्या ७० हजार कामगारांनी केंद्र सरकारला कळवले, 'कंपनी ताब्यात घेतलीत, तर आमचे सर्वांचे मृतदेह बघावे लागतील.'

१९८३ मध्ये बिझनेस इंडियाने 'बिझनेसमन ऑफ दि इयर' म्हणून रुसी मोदी यांची निवड केली. जेआरडी टाटा म्हणाले, 'माझ्या आयुष्यात खूप माणसे मला भेटली. रुसीमध्ये नेतृत्वाची जी क्षमता आहे, ती मला इतर कोणात दिसली नाही.'

१९७४ साली टिस्कोचे मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून रुसी मोदींनी सूत्रे स्वीकारली, तेव्हा टिस्कोची उलाढाल ५०० कोटींची होती. १९९१-९२ मध्ये ती २९०० कोटींपर्यंत पोचली. आधुनिकीकरण आणि विस्तारीकरण याबाबत रुसींनी धडक मारली. सिमेंट प्लान्टचाही पाया घातला.

१९९३ मध्ये मात्र रुसी आणि टाटा यांच्यामधील संबंध बिघडले आणि रुसींना

टिस्कोमधून बाहेर पडावे लागले. त्यावेळी जेआरडींनीही त्यांच्याबाबतीत काही रदबदली करायचे टाळले. त्या बेबनावाबाबत या पुस्तकात बराच तपशील देण्यात आला आहे. हा संपूर्ण प्रकारच सुन्न करणारा आहे. परंतु त्याने खचून न जाता रुसी मोदी यांनी १९९३ मध्ये कलकत्त्यातील उद्योगपती बी. पी. बजोरीया आणि के. के. बिजोरीया, तसेच जर्मन सहकारी कंपनी रोशोक टेक्नालॉजी यांच्या सहकार्याने 'मोबार' नावाची आंतरराष्ट्रीय कंपनी काढली. मालाची ने-आण करण्याच्या क्षेत्रात या कंपनीने चांगली आघाडी घेतली.

पंतप्रधान नरसिंहराव यांनी रुसी मोदी यांची नेमणूक इंडियन एअरलाइन्स आणि एअर इंडिया या दोन्ही विमान कंपन्यांचे प्रमुख म्हणून केली. (७ नोव्हेंबर १९९४) या दोन्ही कंपन्यांचे कामकाज सुधारून त्यांचे एकत्रीकरण करण्याच्या दृष्टीने कार्यक्रम आखावा, अशी पंतप्रधानांची अपेक्षा होती. परंतु विमान वाहतूक मंत्री गुलाब नबी आझाद यांना विश्वासात न घेता ही नेमणूक झाल्यामुळे त्यांनी अडवणुकीचे धोरण स्वीकारले. त्यांच्यातले संबंध कलुषित राहावे, असा प्रयत्न चालू राहिला. मंत्र्यांनी रुसी मोदी यांना एक छापील पत्रक पाठवले. त्यात 'अर्धवेळचा अध्यक्ष हा संचालक मंडळाच्या प्रमुखाला सूचना देऊ शकत नाही' असा स्पष्ट निर्देश होता. पंतप्रधानांनी नियुक्तीच्या वेळा तसा काही उल्लेख केला नव्हता. मंत्रिमंडळाच्या सचिवांनी संबंधितांची मीटिंग घेऊन दोन्ही विमान कंपन्यांच्या संचालनासाठी रुसींना जास्त सत्ता देण्याबाबत निर्णय घेतला. परंतु प्रत्यक्षात तसा आदेश काढला नाही. एकूण मोदी म्हणतात, 'मला आझाद राहायचं होतं आणि मंत्र्यांची इच्छा मी गुलाम व्हावं अशी होती.' त्यामुळे मोदींना आपण हतबल असल्याची जाणीव झाली. त्यांनी ३ डिसेंबर १९९६ रोजी राजीनामा दिला त्यांनी तत्कालीन पंतप्रधान देवेगौडा यांना एक पत्र लिहून सार्वजनिक प्रकल्प चालवण्याबाबतचे आपले विचार कळवले. भांडवलाची पुनर्रचना करणे, आयएएस अधिकारी आणि सरकारी अधिकारी यांना सार्वजनिक प्रकल्पात न घेणे, प्रकल्पाच्या संचालक मंडळाला अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार असणे, व्यवस्थापनाच्या खाजगीकरणावर भर देणे, गुंतवणूक गरजेनुसार वाढवणे वगैरे सूचना त्यांनी केल्या होत्या.

जमशेदपूरहून त्यांनी १९९८ मध्ये लोकसभेची निवडणूक स्वतंत्र उमेदवार म्हणून लढवली. १,९९,२५३ मते त्यांना मिळाली. मतमोजणीत गडबड झाल्याची त्यांची भावना होती. 'व्हिदर इंडिया' नावाचा एक लेख त्यांनी लिहिला. झारखंड राज्याच्या निर्मितीचा मुद्दा त्यांनी निवडणुकीत मांडला होता. पुढे झारखंडची निर्मिती झाली. ते भविष्यवेत्ते ठरले.


'सदैव हसतमुख गुणग्राहक' या प्रकरणात रुसींच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू उलगडून दाखवण्यात आले आहेत.

रुसी मोदी जमशेदपूरच्या टाटांच्या कारखान्यामध्ये ५३ वर्षे कार्यरत होते. सर्वोच्च पदावर ते पोचले. परंतु शेवटी मात्र त्यांना काहीशा नाराजीनेच आणि मानखंडना होऊन तेथून बाहेर पडावे लागले. एखाद्या शोकनाट्याचाच हा विषय म्हणावा लागेल. परंतु धीरोदात्तपणे त्यांनी या अवमानाची पर्वा न करता नवी 'मोबार' ही कंपनी काढून तिलाही उर्जितावस्थेला नेले. जमशेदपूरच्या भूमीशी आपली असलेली तेथे कायमचे घर ठेवून बांधिलकी कायम राखली. नव्वदीतही ते तरुण सुलभ उत्साहाने काम करीत आहेत. त्यांचे हे चरित्र अंतर्मुख करणारे आहे. त्यांच्या समृद्ध व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू स्तिमित करतात. त्यांच्या व्यक्तिमत्त्वामधले अंतर्विरोध त्यांच्यातील माणसाची प्रचीती देतात. एक विलोभनीय माणूस म्हणून त्यांच्याविषयीची आत्मीयता दृढ करतात.

**किंमत : २००रु. सभासदांना : सवलतीत पोस्टेज : २५रु.**


कॅन्सरसारख्या जीवघेण्या आजाराशी लढा देऊन, प्रचंड मेहनत आणि दृढ निश्चयाच्या जोरावर सलग सात वेळा 'तर द फ्रान्स' जिंकलेल्या लान्स आर्मस्ट्राँगचे रोमांचक आत्मकथन!

२री आवृत्ती




**इट्स नॉट अबाउट द बाइक**

**लान्स आर्मस्ट्राँग, सॅली जेनकिन्स**

अनु. अंजनी नरवणे

**२४०रु. पोस्टेज ३०रु.**

नवे कोरे




# अ बेटर इंडिया अ बेटर वर्ल्ड

**एन. आर. नारायण मूर्ती**

अनुवाद
**चित्रा वाळिंबे**

**२५०रु. पोस्टेज ३०रु.**

लाखो भारतीयांच्या दृष्टीने नारायण मूर्ती हे एक आदर्श व्यक्तिमत्त्व आहे. औद्योगिक क्षेत्रातील कर्तृत्व आणि नेतृत्व मूल्याधिष्ठित वागणूक आणि व्यक्तिगत आचरण यामुळे नारायण मूर्ती हे अवघ्या देशासाठी आदर्श ठरले आहेत. ते भारताच्या नव्या, प्रगतिशील पर्वाचे प्रतिनिधित्व करतात. त्यांनी दिलेल्या व्याख्यानांचा हा संग्रह भावी पिढ्यांना प्रेरणादायक आणि मार्गदर्शक ठरेल याची मला खात्री आहे.

**- डॉ. मनमोहन सिंग,** पंतप्रधान, भारत

भारतात जागतिक दर्जाच्या, मूल्याधिष्ठित कंपनीची उभारणी करणं शक्य आहे, हे नारायण मूर्ती यांनी अनेक अडथळे पार करून सिद्ध केले आहे, मूर्तींच्या दूरदृष्टीमुळे आणि नेतृत्वामुळे उद्योजकतेच्या जगात नवी चमक आली आहे, आपली स्वत:कडे पाहण्याची आणि जगाची भारताकडे पाहण्याची दृष्टी बदलली आहे. व्याख्यानांच्या या संग्रहाद्वारे, व्यवसायामधील मूल्ये आणि नेतृत्वगुण यांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले आहे.

**- बिल गेट्स** (अध्यक्ष), संचालक मंडळ, मायक्रोसॉफ्ट कॉर्पोरेशन

# पुस्तक परिचय

राञीचं आकाश तरीही घेऊन येतं
उन्हाची सकाळ...

# उधाण वारा




**तसलिमा नासरिन** अनु. विलास गीते

तसलिमा नासरिनचं सारं बोलणं, लिहिणं नेहमीच नवा उधाण वारा घेऊन येतं. त्यामुळे साक्षात 'उधाण वारा' म्हणून लिहिलेलं लेखन बहुचर्चित झालं नाही तरच आश्चर्य! यापूर्वी तसलिमा नासरिन यांनी सन १९९९ साली 'आमार मेयेबेला' नावानं आपल्या आत्मचरित्राचा पहिला भाग वाचकांना नजर केला आहे. ते आत्मचरित्र म्हणजे तिच्या कौमार्याची कथा होती. जन्मापासून ते ऋतुप्राप्तीपर्यंतच्या (१९६२ ते १९७६) आठवणी, जीवनातील विविध प्रसंग त्यांनी त्यांनी चितारले, तेव्हा विसाव्या शतकाचा सूर्य अस्तंगत होत होता. आता त्यानंतर एक दशक मागे पडलं नि परत त्या आणखी एका दशकाची आपली व्यथा, कथा 'उधाण वारा'मधून मांडत आहेत. हा 'आमार मेयेबेला'चा दुसरा भाग आहे. त्यामुळे 'उधाण वारा' समजून घ्यायचा, तर 'आमार मेयेबेला' वाचणं ही त्यांची आपोआप पूर्वअट होऊन जाते.

'आमार मेयेबेला'मध्ये तसलिमा नासरिन यांनी पूर्वज, परिवार, जन्म, बालपण, शिक्षण, संस्कार, आई-वडिल असं कौटुंबिक जग तर चित्रित केलंच आहे, पण त्यात त्यांनी एक मुलगी म्हणून होणारा आपला कोंडमारा, लैंगिक छळ, धाकदपटशा सांगत आपल्या जीवनात एक मुलगी म्हणून न्यूनगंड, भयगंड कसा निर्माण झाला त्याचं सविस्तर व प्रत्यंकारी वर्णन केलं आहे. बांगलादेशच्या मुक्ती संग्रामाच्या पार्श्वभूमीवर लिहिलेल्या या आत्मकथेच्या पहिल्या भागात आपलं कौमार्य हेही दुसरं मुक्ती युद्धच कसं होतं, ते प्रभावीपणे मांडल्यामुळे जगभरच्या वाचकांनी त्या पहिल्या भागास पहिली पसंती दिली होती. तसलिमा नासरिन यांच्या लेखन शैलीचं है वैशिष्ट्य असतं की त्या जे लिहितात त्यात स्त्रीवादी अस्तित्व संघर्षाची अनिवार्यता येत असते.

'उधाण वारा' या शीर्षकापासूनच ते आपली पकड घेतं. कौमार्य ओलांडून ही मुलगी किशोरी होते... पुढे युवती... हा कालखंड म्हणजे मैत्रीचा न संपणारा वसंत ऋतुच असतो. यात मैना असतात तसे मोरही! चंदना, चकमा, सजनी या आपल्या मैत्रिणींच्या सहवासात तसलिमा किशोरी होते... यातली चंदना म्हणजे तसलिमाची 'फेवरिट'... हे 'फेवरिट' प्रकरण मैत्रिणींत काय असतं, ते समजायला 'आमार मेयेबेला'तून जावं लागतं. ही एक भन्नाट, बिनधास्त मैत्रीण... शिक्षकांवर वात्रटिका लिहायच्या असो वा कावळे ओरडायच्या आधी भावाची सायकल घेऊन मैत्रिणीच्या घरी जाऊन तिच्या अंथरुणात शिरायचं असो... ते करावं चंदनानीच... तिच्या उधाण वाऱ्यात तसलिमा केव्हा सखी, सजनी, प्रियतमा, राजकन्या होऊन जाते, ते कळत ही नाही... चंदनानं केव्हाही मूठ उघडली, की तिच्यातून आषाढातल्या पावसासारखा प्रेमपत्रांचा वर्षाव होत राहायचा. 'अहा ते सुंदर दिन...' वाचणं म्हणजे आपलं किशोरपण पुन्हा जगणं! तसलिमाच्या लेखणीचं लालित्य नि शैलीचा पदन्यास

म्हणजे सारं वर्णन!

तसलिमा मॅट्रिकला जाते, तेव्हा चौदावं लागलं होतं. मॅट्रिक परीक्षेसाठी त्यावेळी पंधरा वर्षाची अट. म्हणून वडिलांनी एक वर्ष वाढवलं. आई उदार, वडिल कंजूष. वाढदिवस साजरा नाही करायचे, का तर खर्च होतो. तसलिमानं तेव्हापासून वयाचा विचारच सोडून दिला. पण वय तिचा पाठलाग सोडत नव्हता. झालं, आयुष्यातलं हाती आलेलं पहिलं प्रेमपत्र! अवघं एक ओळीचं 'डोळे मनातली गोष्ट सांगतात... तुझा लुत्फर' तेही वडिलांना मिळावं, यासारखा धरणीकंप तो दुसरा कोणता? झालं, पहारा बसला. बडोदा (मोठा भावाचा) पहाऱ्यात शाळेत जाणं-येणं. मोठं अपराध्यासारखं वाटायचं. बरेच दिवस दुसरं पत्र न आल्यानं, मग हा पहारा उठतो. आवासिक आदर्श बालिका विद्यालयाच्या चंदना, ममता, संजीदा, फाहमिदा, आसमा, नादिरा, अशरफन्निसा इत्यादी मैत्रिणींत तसलिमा आपल्या घरचा छळ विसरायचा प्रयत्न करायची.

प्रेम, प्रणयाच्या दुनियेतून ती कवितेच्या कलाप्रांतात रममाण झाली ते वाचन वेडामुळे. कुठंही कसलाही मुद्रित, अमुद्रित शब्द दिसल्याबरोबर वाचणारी तसलिमा लिहू लागली. सबिना, रुबिना या आपल्या मैत्रिणींवर लिहिलेला लेख 'चित्राली' मासिकात छापून आला नि तिला लिहिण्याचा छंद जडला. मासिकं, पुस्तकं मिळेल ते वाचू लागली. निहाररंजन गुप्त, फाल्गुनी मुखोपाध्याय, निमाई भट्टाचार्य, माणिक बंदोपाध्याय, रवींद्रनाथ, नजरुल, शमसुर रहमान, अल् महमूद यांच्या वाचनानी प्रगल्भ झालेली तसलिमा कॉलेजमध्ये असतानाच 'सेंजुती' हे काव्यास वाहिलेलं हस्तलिखित प्रकाशित करू लागली. यातून तिला 'रुद्र' भेटला. तो तिचा मित्र, प्रियकर नंतर पती झाला. प्रेम काहींच्या जीवनात पाऊस पाडतो, तर काहींच्या जीवनात दुष्काळ. तसलिमाला मात्र प्रेमानं पश्चात्तापच दिला. ती रुद्रच्या सहवासात फुलत, बहरत होती नि एक दिवस तिच्या लक्षात येतं, की रुद्रच्या अंगाला डेटॉलचा वास येतोय. एव्हाना तिनं मेडिकलला प्रवेश घेतलेला असतो. त्यामुळे हा वास तिच्या परिचयाचा असतो. पाल चुकचुकते नि लक्षात येतं की मधुचंद्राची पुष्पशय्या उपभोगत असताना आपली कूस फुलशय्येनी (बंगालीत 'फुल' म्हणजे 'फोड'.) उजवली जात आहे. नवऱ्याच्या लिंगाच्या (शिश्न) टोकावरचा लाल फोड तिला न सांगताही त्याच्या बाहेरख्यालीपणा समजावतो. अन मग ती कोसळते ती कायमचीच!

'उधाण वारा' वाचत असताना स्त्री जीवनाची घालमेल समजत जाते. हे सारं समजल्यावर एखाद्या स्त्रीनं फारकत घेतली असती, पण ती 'रोद' (रुद्रचं हे प्रेमातलं रूपांतर) ला सुधारायचं ठरवते. बंगाली भाषेत रोद म्हणजे ऊन. तसलिमाला तो सकाळ म्हणायचा. 'रोद' नि 'सकाळ' एकमेंकास पत्र, कविता लिहित राहिले. रोज

येणाऱ्या रात्रीचं आकाश तरीही घेऊन येऊन नव्या ऊनांची सकाळ म्हणून! पण रात्रीच्या गर्भात नेहमी उष:काल असतोच असं नाही. एखाद्याचं जीवन वाट चुकलेल्या रस्त्याचा निबिड जंगलातील न संपणारा जीवघेणा प्रवास असतो, तो तसलिमानी या उधाण वाऱ्यात मांडलाय.

ही आत्मकथा स्त्रीची शोकात्म गाथा होय. ती स्त्रीचा आत्मशोधही आहे. स्त्रीचं हळवं मन इथं आहे नि कठोर संघर्ष ही! वैचारिक द्वंद्वाचा शाप घेऊन येणारं स्त्री जीवन हे आत्मकथन आपणास अनेक अर्थांनी बुचकळ्यात टाकतं; स्त्री समजून उमजून जोखिमांच्या मृगजळामागे का धावते? यातले पुरुष नेहमी शेण का खातात? (नाना, वडिल, नवरा सारे रखेल ठेवणारे एका माळेचे मणी) हा अनादि संघर्ष यात व्यापून आहे, तोच या उधाण वाऱ्यात सर्वत्र घोंगावतोय! ही आत्मकथा एकाच वेळी 'वाचनीय' प्रेमकथा नि दुसरीकडे स्त्रीची शोकगाथा म्हणून 'विचारणीय' ऐवज ठरते, ती लेखिकेच्या कुशल शैलीमुळे. पत्र, कवितांनी तिला ललित मधुर, तरल केलंय आणि त्यातील प्रश्नांनी घन-गंभीरही!

'उधाण वारा' स्त्रीच्या वय:संधीची गाथा आहे. कैशोर्य ते युवावस्थेचा हा प्रवास स्त्रीच्या बिकट वाट-वहिवाटीचा आदिम प्रवास होय. तो वाचत असताना आपण प्रेमाच्या अथांग डोहात बुडून जातो. लेखिकेबरोबर वाचक जीवनाच्या अशा चक्रव्यूहात अडकतो, की त्यातून परतीची वाटच नसते. ही आहे मानवी जीवनाची आदिम कहाणी... 'खाये तो भी' आणि 'न खाये तो भी' पश्चाताप ठरलेलाच! तरी जगण्याची, माणसाच्या मनातली अनिवार आशादायी ओढ, इथं वाढत्या वयाच्या साऱ्या पाऊल खुणा आहेत. आपण उंच झालोच, या अजून छातीला आकार न आल्याची हुरहूर. आपण मोठं झालोय, तरी आपणाला काही कळत कसं नाही याचं कोडं! आपलं कोण नि परकं कोण हे न समजाणारं जग आजूबाजूला... तरी मी चालतेचि वाट... असं का? याचा शोध घेणारी अन् बोध देणारी 'उधाण वारा' कथा सर्वांनी विशेषत: जीवनाचा निर्णय घेण्याच्या वयातील तरुण-तरुणींना अशासाठी वाचायला हवी, की ती धोक्याचा इशारा देतेय... ती तुमची बोट थडकून फुटण्यापूर्वी या आत्मकथेच्या वाचनातून येणाऱ्या प्रगल्भतेमुळे कदाचित तुम्ही वाचवू शकाल त्यासाठी द्वंद्वमुक्तीची शर्त मात्र आहेच!

या आत्मकथेत जीवनातली सर्व द्वंद्व भेटतात. श्रद्धा-अंधश्रद्धा, विश्वास-अविश्वास, आपपरभेद, जीवन-मरण, माणूस की दगड, भीती-अभीती. सारं असल्यानं कालमर्यादितही ही आत्मकथा जीवन सर्वस्व घेऊन येते. जीवनातल्या साऱ्या गोष्टी काही कथा, कादंबऱ्या, सिनेमासारख्या नसतात हे लोकशिक्षण देणारी ही आत्मकथा वाचनीय, विचारणीय बनते; ती तिच्यातील जीवन शिक्षणाच्या मूल्यांमुळे. तसलिमा नासरिनच्या

बंडखोर व्यक्तिमत्त्वाचा शोध या आत्मकथेतून उमजतो. स्त्री स्वप्रज्ञ, स्वयंसिद्धा, स्वयंप्रेरिका होते ती पुरुषाच्या नाकर्त्या, बेजबाबदार वागण्यानं. त्या अर्थानं ‘उधाण वारा’ पुरुषांसाठी अप्रत्यक्षरीत्या एक ‘जागर कथा’ बनते. ‘मी काही खूप चांगला नाही, याचं कारण तुझं चांगलं असणं आहे’ ही यातील रुद्रची तसलिमाबद्दलची कबुली (पृ. २२५) म्हणजे तमाम पुरुषांच्या वतीने रुद्रनं दिलेला कबुलीजबाब होय. ‘उधाण वारा’ ही स्त्री दु:ख भोगाची व पुरुषाच्या सुख उपभोगाची एकाच वेळी परस्पर पूरक व परस्परविरोधी असणारी अगम्य कहाणी आहे.

**किंमत : ४०० रु.  सभासदांना : सवलतीत  पोस्टेज : ३० रु.**

## सभासदांना सूचना

सध्या पोस्टातून अंक न मिळाल्याच्या किंवा उशिरा मिळत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. आमचे पोस्टिंग दर महिन्याच्या ११ तारखेला नियमित होत असते. वाचकांनी कृपया गैरसमज करून घेऊ नये. तरीही अंक न मिळाल्यास फोन किंवा पत्र आल्याबरोबर आम्ही लगेच दुसरा अंक पाठवतो. कृपया वाचकांनी ही वस्तुस्थिती समजून घेऊन सहकार्य करावे ही विनंती. गैरसमज नसावा.

**संपादक**


**‘मेहता पब्लिशिंग हाऊस’**च्या नवीन पुस्तकांची माहिती, नवनवीन योजना आणि ताज्या घडामोडी कळविण्यासाठी आपला E-mail ID आमच्याकडे हवाच!

**Email : info@mehtapublishinghouse.com**

आपले **E-mail ID** ‘मेहता पब्लिशिंग हाऊस’च्या वरील **E-mail ID** वर कळवा.

नवीन आवृत्ती

# मळ्याची माती




**आनंद यादव**

**१००रु. पोस्टेज २०रु.**


उपमा-रूपकांप्रमाणे यादवांची कविता प्रतिमांच्या भाषेत बोलू लागते.
आणि मग 'सपनं पडत्यात' सारखी समर्थ कविता निर्माण होते.
रानातल्या ढेकळांना पाय फुटून ती गुमान पाठमोरी होऊन चालू लागतात.
त्यांनाही बैलाच्या पाण्याने भरलेल्या डोळ्यांसारखे डोळे फुटतात.
त्यात एक कहाणी भरलेली असते.
जिभा फुटत नाहीत म्हणून बापडी ढेकळंही डोळे मिटून पाणी गाळतात.
खडतर दारिद्र्याच्या अनुभवानेही यादवांची कविता जशी विखारलेली नाही,
तशीच सामाजिकतेच्या सहेतुक वाटेने, खेड्यातील दैन्य-दारिद्र्याचं दुखणं
वेशीवर टांगण्यासाठीही ती जन्मलेली नाही.
शेतमळ्यातील तरारून वर आलेल्या
पिकाच्या रसरसत्या सौंदर्याप्रमाणेच, त्यात जगणाऱ्या, राबणाऱ्या
माणसांच्या भावभावना, सुखदु:ख आणि त्याचं दारिद्र्य हेही सारं त्यांच्या
अनुभवाचं अविभाज्य अंग आहे. म्हणून या छोटेखानी संग्रहातही ग्रामीण
जीवनाचं एक अस्सल आणि सम्यक्‌दर्शन घडत आहे.

–अनुराधा पोतदार

# पुस्तक परिचय

**झोपडपट्टीतल्या चिमुरड्या रुबिनाचे स्लमडॉगच्या यशाने बदललेले (आणि न बदललेले) आयुष्य**

# स्लमगर्ल ड्रीमिंग




**रुबिना अली** अनु. मैत्रेयी जोशी

'स्लमडॉग मिलेनियम'मध्ये नायिकेच्या बालवयातील भूमिका करणारी पाच-सहा वर्षांची झोपडपट्टीत राहणारी 'रुबिना अली' ही मुलगी स्लमडॉगच्या यशामुळे ऑस्करपर्यंत मजल मारते आणि मॉडेल म्हणूनही पुढे तिचे कौतुक होत राहते. नऊ वर्षांच्या या मुलीची आत्मकथा एका फ्रेंच प्रकाशकाच्या पुढाकारामुळे ॲनी बर्थाड आणि दिव्या दुगर यांनी लिहून सिद्ध केली. ती आता मराठीतही आली आहे.

'स्लमडॉग मिलेनिअर' या चित्रपटाला आठ ऑस्कर पुरस्कार मिळाले. 'कौन बनेगा करोडपती' या दूरचित्रवाणी मालिकेच्या पार्श्वभूमीवर विकास स्वरूप यांनी लिहिलेला, क्वेश्चन्स अँड ॲन्सर्स या कादंबरीवर ब्रिटिश दिग्दर्शक डॅनी बॉयल याने काढलेला, मुंबईच्या धारावी झोपडपट्टीच्या पार्श्वभूमीवरचे चित्रण असलेला हा चित्रपट. अनेक नवोदित कलाकारांचे तसेच सर्व संबंधितांचे भाग्य उजळवणारा ठरला.

या चित्रपटात झोपडपट्टीत जन्मलेला, वाढलेला, जमाल मलिक हा कधीच शाळेत न गेलेला, पण जीवनाचे वेगवेगळे रंग पाहिलेला सोळा-सतरा वर्षांचा कोवळा तरुण 'कौन बनेगा करोडपती' या गेम-शोमध्ये भाग घेण्यासाठी जातो. तो विचारलेल्या प्रश्नांची आपल्या आयुष्यात घडलेल्या प्रसंगांच्या आधारे उत्तर देतो; कधी उत्तर माहीत नसलेल्या प्रश्नांची अंदाजपंचे उत्तरे देतो. त्या दिवशीचा शो संपतो, तेव्हा एकच खेळी बाकी उरलेली असते. पाच कोटीपर्यंत त्याने मजल मारलेली असते आणि दुसऱ्या दिवशीच्या गेम शोमध्ये बाकी उरलेल्या एका शेवटच्या प्रश्नाचे उत्तर बरोबर दिले, तर दहा कोटींची प्राप्ती त्याला होणार असते. परंतु या शोच्या निर्मात्याला हे बक्षीस देण्याची वेळ इतक्या लवकर येईल, अशी कल्पना नसते. तेवढी त्याची तयारी नसते. त्यामुळे जमालने ही उत्तरे देताना काहीतरी गडबड केलेली आहे, असे दाखवून त्याला खोटे पाडून हे बक्षीस देण्याचे टाळायचे असा विचार करून पोलीस अधिकाऱ्यांची मदत निर्माता घेतो. पोलिस अधिकारी रात्रभर जमालला कोठडीत डांबून, त्याला मारहाण करून धाकदपटशा दाखवून त्याच्याकडून कबुलीजबाब मिळवण्याची शिकस्त करतात; परंतु पोरसवदा जमाल पोलीस अधिकाऱ्यांच्या जाळ्यात फसत नाही. त्याच्यावर फ्रॉडचा आरोप ठेवता येत नाही, त्याला विचारलेल्या प्रत्येक प्रश्नाच्या उत्तराची आपल्या पूर्व आयुष्यातील घटनांची सांगड घालून त्याने उत्तरे दिलेली असतात, हे लक्षात आल्यावर गेम-शोच्या निर्मात्याच्या आमिषांना धुडकावून पोलिस जमालची सुटका करतात आणि दुसऱ्या दिवशीच्या गेम-शोमध्ये जमाल शेवटच्या प्रश्नाचे उत्तर अचूक देऊन दहा कोटींचा विजेता ठरतो. विकास स्वरूप यांनी या कथावस्तूला वास्तवाच्या अनेक पातळ्यांवर फिरवले आहे. त्यामुळे ही कथावस्तू झोपडपट्टीतील जीवन, दारिद्र्य, अस्वच्छता, बकालीपणा यांचे दाहक, उग्र दर्शन घडवते; हिंदू-मुसलमान दंगलीची आणि त्या दंगलीत अनाथ झालेल्या मुला-मुलींची परवड दाखवते, तसेच अशा

अनाथ, पोरक्या मुलांना पळवून नेऊन, त्यांना अपंग करून भीक मागायला लावणाऱ्या टोळ्यांची कार्यप्रणालीही उघडी करते. जमाल आणि त्याचा भाऊ सलीम हे अशा टोळीच्या तावडीतून पळ काढतात. रेल्वेने आग्रा येथे जाऊन उतरतात आणि तेथे गाइडचे काम करू लागतात. जमाल, सलीम हे दंगलीत अनाथ झालेल्या लतिकाला आपल्या खोपटात आश्रय देतात. पुढे तिची ताटातूट होते, तरी जमालला ती कधीतरी भेटेल अशी आशा असते आणि टीव्हीवरील गेम-शोमध्ये भाग घेताना 'ललिता' हा शो बघत असेल आणि ती भेटीला येईल अशी पुसटशी आशाही त्याच्या मनाच्या कुठल्यातरी कोपऱ्यात उसळत असते. (जमाल-सलीम यांना मुलांना अपंग करून भीक मागायला लावणाऱ्या टोळीच्या तावडीतून सुटण्याची संधी मिळते, परंतु ललिताला त्या टोळीचा प्रमुख आपल्या घरीच घेऊन जातो. आता तीही सतरा-अठरा वर्षांची तरुणी झालेली असते आणि त्या टोळीच्या प्रमुखाच्या घरची कामे सांभाळत असते.)

या लतिकाची पाच-सहा वर्षे वयातील बालपणातील भूमिका करण्यासाठी रुबिना अली या बांद्रा स्टेशनजवळ झोपडपट्टीत राहणाऱ्या मुलीची निवड स्लमडॉगचे दिग्दर्शक डॅनी बॉयल यांनी केली. त्याचप्रमाणे जमाल मलिक आणि त्याचा भाऊ सलीम यांच्या बालवयीन भूमिका करण्यासाठी झोपडपट्टीतील मुलांचीच निवड करण्यात आली. त्यापैकी छोट्या सलीमची भूमिका करणारा 'अझर' हा रुबिनाच्याच झोपडपट्टीत राहणारा मुलगा. त्यामुळे दोघांचा थोडा पूर्वपरिचय आहे. अझर तिला सारखे चिडवत असतो. तीही त्याला जमेल तसा जबाब देत असते.

जमालची बालपणाची भूमिका करणारा 'आयुष' हा मुंबईच्या उपनगरातून आलेला असतो. तो झोपडपट्टीतही राहणारा नसतो.

आयुष, रुबिना आणि अझर यांचे त्रिकूट 'स्लमडॉग मिलिनेअर'मधील तीन मुख्य पात्रांच्या बालपणाची महत्त्वाची दृश्ये साकार करते. बांद्राच्या झोपडपट्टीत राहणारा परवेझ हा चित्रपटांसाठी एक्स्ट्रॉ नटनटींचा पुरवठा करणारा ठेकेदार असतो. त्याने रुबिनाला या आधीही एका फिल्ममध्ये संधी दिलेली असते. पाचशे मुला-मुलींच्या मुलाखती घेण्यात येतात, त्यातील पन्नास परवेझने पुरवलेली असतात. त्यात बांद्रा भागातील १५ मुले असतात. रुबिना आणि अझर या दोघांची निवड दिग्दर्शक डॅनी बॉयल करतो. जुहूच्या सन अँड सँड हॉटेलमध्ये ऑडिशनसाठी त्यांना नेण्यात येते. कास्टिंग डायरेक्टर लव्हलीन डॅनी आणि रुबिनामध्ये दुभाष्याचे काम करते. प्रारंभिक ऑडिशनच्या दरम्यान लव्हलीनने अंधेरीतल्या इंडिया टेकवन प्रॉडक्शन स्टुडिओमध्ये या मुलांच्या धावण्याची चाचणी घेतलेली असते. दुसऱ्या दिवशी त्यांच्या खाण्याची चाचणी घेण्यात येते. 'मुलांनो, तुम्हाला प्लेटमध्ये डाळभात वाढण्यात येईल. तुम्ही तो खाणार आहात. खूप दिवसात तुम्हाला खरंखुरं जेवण

मिळालेले नाही अशा तऱ्हेने जेवा.' रुबिना त्या डाळभातावर तुटून पडते. 'रुबिना, थोडे घास खाल्यावर तुला म्हणायचंय, त्या माणसानं आपली प्लेट दुसऱ्यांदा भरली तर त्याचा अर्थ तो माणूस खरंच चांगला आहे.' अशा अनेक ट्रायल्स घेऊन रुबिना, अझर आणि आयुष यांची नावे अखेर पक्की होतात. डॅनी बॉयलची गोरी गुलाबी त्वचा, उंच कपाळपट्टी, तोंडावरचे विस्फारलेले हास्य बघून रुबिनाची भीड चेपते. मुसळधार पावसात भिजलेली मुलगी पावसापासून स्वत:चा बचाव करण्यासाठी धडपडतेय असा अभिनय रुबिनाला करायला लावला. तो तिने व्यवस्थित केला, तेव्हा डॅनी खूश झाला. 'डॅनी बहोत खूष है. तुमने बहोत अच्छा किया।' असे लव्हलीन रुबिनाला सांगते. झोपडपट्टीत आल्यावर ती आपल्या वडिलांना– अब्बांना सांगते, 'अब्बा, अब्बा, मी चित्रपटात दिसणार आहे.' ती त्यांच्याभोवती नाचत राहते. परवेश अब्बांना बधाई देतो. 'बधाई हो रफीक भाई. रुबिना पाचसौ बच्चों में सिलेक्ट हो गयी है.'

या इंग्लिश सिनेमाचे शूटिंग चार-पाच दिवस चालेल, अशी माहिती परवेश देतो.

रुबिनाला तो सांगतो, 'तुला एका गरीब, छोट्या मुलीचा अभिनय करायचा आहे. तो प्रमुख नायिकेचा रोल नाहीय. पण महत्त्वाचा आहे. तू बघशील... फक्त तीन मुलं निवडली गेली.'

रुबिना त्याला विचारते, 'पिक्चरचं नाव काय आहे?'

'स्लमडॉग मिलिनेअर.'

'सलीम दाग मिली नायर? काय मजेशीर नाव आहे.' रुबिना म्हणते. त्याचा अर्थ कळला नाही, तरी तिला त्यामुळे काही फरक पडत नव्हता. चित्रपटांत काम करायला मिळतेय या कल्पनेनेच तिला स्फुरण चढलेले होते.

चित्रपटाचे प्रत्यक्ष शूटिंग डिसेंबर २००७ मध्ये धारावीच्या झोपडपट्टीत होते.

या चित्रपटाला ऑस्कर लाभल्याने त्यातील लहानमोठ्या नटनटींना आणि तंत्रज्ञांना साहजिकच प्रसिद्धी आणि मान्यता लाभली.

रुबिना या नऊ वर्षाच्या मुलीची कहाणीही माध्यमांच्या कुतूहलाचा विषय ठरली.

झोपडपट्टीत राहणाऱ्या, या मुलीच्या घरच्या दुरवस्थेची दृश्ये बघून अनेकांना तिची दया आली. तिच्या मुलाखती दूरचित्रवाणीवर झळकल्या.

तिची झोपडी कधीही जमीनदोस्त होऊ शकते. महापालिका तिच्यावर बुलडोझर घालू शकते अशा बातम्यांनी तिला फ्लॅट देण्याचा इरादा काही व्यक्ती, संस्था प्रकट करतात.

तशातच एका दुबईस्थित शेखला रुबिनाला विकण्यात येणार आहे, तिचे वडील तसा सौदा करणार आहेत अशी खळबळजनक बातमी ब्रिटिश टॅब्लाइड न्यूज

ऑफ दि वर्ल्डने प्रसिद्ध केली.

त्यामुळे एका फ्रेंच प्रकाशकाला या मुलीची कहाणी पुस्तकरूपाने काढण्याची कल्पना सुचली. त्याने तिच्या झोपडपट्टीला भेट दिली. त्यासाठी त्याने ॲनी बर्थाड आणि दिव्या दुगर या दोघींना तिच्याशी, तिच्या पालकांशी, जवळच्या व्यक्तींशी बोलून रुबिनाचे आत्मकथन लिहून काढावे, अशी कामगिरी सोपवली. तसा करार केला. पुस्तकाच्या फायद्यातून निम्मी रक्कम झोपडपट्टीच्या सुधारणेसाठी कार्य करणाऱ्या एका धर्मादाय संस्थेला देणगी म्हणून देण्याचे आणि उर्वरित रुबिनाच्या शिक्षण-प्रशिक्षणासाठी, तिला अभिनेत्री म्हणून तयार करण्यासाठी देण्याचे जाहीर केले. पुस्तकाच्या प्रसिद्धीसाठी रुबिनाला फ्रान्समध्ये आणि इतर देशात नेण्याचे ठरवले. मे २००९ मध्ये पुस्तकाचे प्रकाशन फ्रान्समध्ये झाले. त्यानंतर त्याचे इंग्रजी भाषांतर प्रसिद्ध झाले.

आत्मकथनाच्या स्वरूपात नऊ वर्षे वयाच्या रुबिनाची कहाणी सादर करण्यासाठी लेखिकांनी खूपच मेहनत घेतली आहे, हे पानोपानी जाणवते. एका नऊ वर्षे वयाच्या मुलीचे हे भावविश्व आहे, तिच्या नजरेतून, तिच्या आकलनाच्या चौकटीत ते प्रकट व्हावे अशी अपेक्षा ठेवून ते वाचायला गेले, तर पदोपदी खटकेल. परंतु तसे काही दडपण मनावर ठेवता, एका सुजाण मुलीचे हे आत्मकथन आहे आणि ते अनुभवी पत्रकारांनी संबंधितांशी संपर्क साधून खूप माहिती मिळवून पेश केलेले आहे, हे लक्षात ठेवून वाचले तर झोपडपट्टीतले जीवन, मुसलमान जीवनशैलीचे पारंपरिक आणि कौटुंबिक चित्रण, आप्त स्वकीयांचे हितसंबंध जपण्याचा त्यातील प्रयत्न, चित्रिकरण, प्रीमियर शो, ऑस्करसाठी मानांकन झाल्यामुळे अमेरिकेतील ऑस्कर पुरस्कार समारंभासाठी झालेला दौरा, परतल्यावर झालेले स्वागत, सोनिया गांधी यांची त्यांच्या घरी झालेली भेट, मॉडेल म्हणून केलेल्या जाहिरातींचे चित्रीकरण, फॅशन शो, तिची झोपडी पाडण्याचे प्रयत्न, नव्या शाळेतील वातावरण, नातलगांच्या आशाअपेक्षांमधले परिवर्तन, माध्यमांनी केलेला पाठपुरावा, दुबईच्या श्रीमंत शेखने दत्तक घेण्याची रुबिनाला दिलेली ऑफर (नंतर उघड झालेला स्टिंग ऑपरेशनचा प्रकार) चित्रपट गाजल्यावर रुबिनाला भेटीला आलेली तिची जन्मदात्री आई खुर्शीद (तिला न भेटण्याचा रुबिनाचा पवित्रा), उदयपूर येथील ताज लेक पॅलेस हॉटेलमधील चित्रिकरण, अमेरिकन स्टार निकोल किडमन, बदललेली जीवनशैली याबद्दलची माहिती वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये तपशीलवार देण्यात आली आहे.

झोपडपट्टीतून उठून रुबिनाला प्रथमच ऑडिशनसाठी स्टुडिओत जावे लागले, चित्रिकरणासाठी फाइव्ह स्टार हॉटेलमध्ये जावे लागले. प्रीमियर शोच्या निमित्ताने चित्रपटसृष्टीतले नामांकित अभिनेते बघण्याची संधी मिळाली. ऑस्करच्या समारंभासाठी अमेरिकेला जाण्याच्या निमित्ताने प्रथमच विमानप्रवास घडला, अमेरिकेतील हॉटेलमध्ये

उतरण्याची संधी मिळाली. डिस्नेवर्ल्डचा फेरफटका घडला, फॅशन शोमध्ये भाग घेण्याची ऑफर आली. किडमनसारख्या विख्यात नटीबरोबर दिल्लीमध्ये ॲडसाठी शूटिंग झाले. दिल्लीत सोनिया गांधी यांच्या भेटीचे निमंत्रण मिळाले आणि घाईघाईत भेटण्याचा सोहळा संपन्न झाला. या प्रत्येक घटनेच्या वेळेच्या मन:स्थितीचे नेमके दर्शन घडवण्याची कोशिश शब्दांकनकारांनी केली आहे.

जुहूच्या 'सन अँड सँड' या पंचतारांकित हॉटेलमध्ये गेल्यावर रुबिनाला वाटले, 'आम्ही आत गेल्यावर दरवानाने आम्हाला आम्ही मोठ्या व्यक्ती असल्याप्रमाणे सलाम केला. मी हॉटेलमध्ये पहिले पाऊल टाकले आणि इतकं थंडगार वाटलं आतमध्ये! आतमध्ये प्रत्येक गोष्ट विश्वास बसणार नाही, इतकी स्वच्छ, चकचकीत होती. हॉटेलची चमचमती फरशी इतकी स्वच्छ होती, की आपलं प्रतिबिंब दिसत होतं...' (२९)

सेटच्या बरोबर मध्यभागी मी उभी होते. डझनभर कॅमेरे आणि लाइट माझ्याभोवती होते. मला थोडं अस्वस्थ वाटलं. भीतीही वाटली. पण डॅनी अंकलनी 'ॲक्शन' म्हटलं आणि सगळं काही मागे पडलं. इतकी माणसं आपल्याला बघताहेत याची काहीच फिकीर वाटली नाही मला. माझ्या उभ्या आयुष्यात मी इतका कोकाकोला प्यायले नव्हते किंवा इतकं आइस्क्रीम खाल्लं नव्हतं.' (पृ. ३५-३६)

चित्रपट संपून प्रेक्षागृहात दिवे लागले. मला भानावर यायला थोडा वेळ लागला. एका दृश्यात पावसामध्ये भिजताना मी खांदे आखडून घेतले होते. तो पाऊस अगदी खरा, नैसर्गिक वाटत होता आणि अझरच्या अंतर्वस्त्रामध्ये मी मिरची ठेवते हे दृश्य. ट्रेनच्या बाजूने माझे धावणे-ओरडणे. पडद्यावर स्वत:ला बोलताना, नाच करताना, भांडताना बघणं ग्रेट वाटत होतं. शेवटी माझं गाणं आलं, तेव्हा माझा आनंद गगनात मावेना. पडद्यावर जे काही दिवस होतं, ते जसं काही माझं स्वत:चंच जीवन होतं. पण कितीतरी चांगलं. जो तो अभिनंदन करीत होता. माझ्या अब्बांना माझा इतका अभिमान वाटला. प्रत्येकजण खांद्यावर थोपटून किंवा कवेत घेऊन म्हणत होता, 'बहुत अच्छा, रुबिना.'

अनिल कपूर माझ्या अब्बांना व मला भेटून म्हणाले, 'रुबिना फार गोड मुलगी आहे. प्रतिभावंत आहे. तिची काळजी घ्या. तिला चांगले शिक्षण द्या. ती खूप पुढे जाईल.' सिनेमानं माझं आयुष्य कसं बदललं आहे, ते त्या दिवशी अब्बांच्या लक्षात आलं असं मला वाटलं. (पृ.६६)

अझर आणि मी दोघं एकदम प्रकाश झोतात आलो. अख्ख्या जगाला आमच्यात स्वारस्य वाटतंय असं जाणवू लागलं. माझ्या सगळ्या मैत्रिणी आळीपाळीनं भेटायला येऊ लागल्या. सिनेमाबद्दल त्या बोलत, प्रश्न विचारत, आमचं घर कायम माणसांनी भरलेलं असायचं. (पृ. ६८)

लॉस एंजेलिसचा विमानतळ तर जर्मनीतल्या विमानतळाहूनही जास्त भव्य आणि सुंदर होता. तेथील प्रतीक्षालये खूपच प्रशस्त होती. तिथे आम्हाला तपासण्या आणि निर्बंध यांच्या न संपणाऱ्या मालिकेला सामोरं जावं लागलं. बाहेर एक मस्त काळी गाडी आमच्यासाठी थांबली होती. इतकी छान गाडी मी आजवर बघितलेली नव्हती. प्रशस्त आणि ऐसपैस गाडीत कोकाकोलाने भरलेला एक छोटासा फ्रीझही होता. रस्त्याने आलिशान महालासारखी घरे टाकून आम्ही पुढे जात होतो. त्या घरांच्या बागादेखील तितक्याच मोठ्या, फुललेल्या होत्या. रस्ते स्वच्छ होते. गाड्याच दिसत होत्या. सर्वांत विचित्र गोष्ट म्हणजे रस्त्यावरून चालणारा माणूसच दिसत नव्हता. (पृ. ७४)

त्या हॉटेलमध्ये चौथ्या मजल्यावरची आमची खोली खूपच प्रशस्त होती. सर्व सुखसोयींनी युक्त होती. झोपडी सोडून अशा मोठ्या हॉटेलात मी पहिल्यांदाच राहत होते. संडास तर वस्तीतल्या माझ्या खोलीएवढा होता. बाथरुम म्हणजे एक मोठा टब होता. माझ्या आयुष्यात असला टब मी पहिल्यांदाच बघत होते. शांपूच्या बाटल्या, क्रीमच्या ट्युब्ज, साबण, टॉवेल्स, सुवासिक द्रव्ये. त्या वस्तू कधी एकदा वापरून पाहते, असे मला झाले होते. रुममध्ये दोन मोठे पलंग होते. त्या दोहोंमध्ये एक छोटे टेबल. टेबलावर दिवा. गाद्या तर इतक्या मऊमऊ की, मी त्या गादीत बुडूनच गेले. टीव्ही म्हणजे एक वर्तमानपत्रासारखा सपाट विशाल पडदा. (पृ. ७५)

या हॉटेलमध्ये खूप रेस्टॉरंटस होती. अमेरिकन्सचे जेवण वेगळ्या पद्धतीचे असते. डाळभात किंवा चिकन मसाला यातले काहीच तिथे नव्हते. फक्त चमत्कारिक चवीचे, अपरिचित पदार्थ. ते बेचव वाटत होते, कारण त्यात मसाले घातलेले नव्हते. ते ज्याला पिझ्झा म्हणायचे, त्याची चव तर मला शेवटपर्यंत आवडली नाही. पिझ्झा म्हणजे एक प्रकारची चपाती, टोमॅटो सॉस किंवा अशाच कसल्यातरी पांढऱ्या पदार्थाने माखलेली. त्यांच्याकडे बटाटेही होते. लांब काप केलेले. पण पुन्हा नुसते मीठ शिंपडलेले. रस्सा नसलेले. अमेरिकेत बिस्किटं, चॉकलेट बार आणि नूडल्स सोडलं; तर मला खरोखर आवडण्यासारखं काही नव्हतंच. नूडल्स म्हणजे पास्ता दोन रंगांमध्ये होता. त्यातला पांढरा पास्ता मला फारसा आवडला नाही. दुसरा लाल सॉसमध्ये थोड्या भाज्या टाकून केलेला हा ठीक होता.

सोनिया गांधी यांच्या घरात जाण्याआधी आमची अनेकदा सुरक्षा तपासणी झाली. आम्हाला एका प्रशस्त बैठकीच्या खोलीत नेण्यात आले. त्या एका सोफ्यावर पुस्तक वाचत बसल्या होत्या. आम्ही आत गेल्यावर बरीच कुत्री आली आणि आमच्याभोवती कोंडाळं करून उभी राहिली. कुत्री धिप्पाड आणि दांडगी होती. अझर आणि मी पुरते भेदरून गेलो. एक तर या मोठ्या प्राण्यांमुळे आणि दुसरं म्हणजे आमच्या दिशेने येणाऱ्या सोनियाजींमुळे.

'रुबिना, अझर माझ्या घरात तुमचं स्वागत असो. तुम्हाला भेटून मला खूप आनंद झाला.'

'कशा आहात तुम्ही मॅम?'

'थँक यू. इतक्या दूर आलात त्याबद्दल... चित्रपटातल्या तुमच्या कामाबद्दल तुमचं अभिनंदन.'

एक हस्तांदोलन, थोडी स्मितहास्याची देव-घेव आणि एक फोटो. बस्स. आमची भेट फारच थोडा वेळ झाली. सारं काही ठीक होईल. त्या आम्हाला नवं घर मिळवून देण्यासाठी मदत करतील असा त्यांनी धीर दिला. नंतर आम्ही तिथून निघालो.

फॅशन शो सुरू झाला. तसं वातावरण चैतन्यमय बनलं. एकच धांदल उडाली. मी आणि अझर जरा अस्वस्थ होतो. शेवटी आम्हालाही कॅटवॉक करायला ढकललं गेलं. 'जय हो'चे आरंभीचे सूर निनादत होते. आम्ही चालायला सुरुवात केली. त्या सुरांनी आम्हाला प्रेरणा दिली आणि नंतर आम्हाला कोणी अडवू शकले नाही. मला ती भावना इतकी सुखकर वाटत होती. प्रेक्षकांच्या टाळ्या वाजत होत्या.

रुबिनाची अशी निरीक्षणे तिच्या वयाच्या आणि आकलनाच्या मानाने प्रगल्भ व प्रौढ वाटतात. शब्दांकन करणाऱ्या लेखकांची करामत त्यात दिसते. परंतु पुस्तकाच्या एकूण स्वरूपातच अशा अनुभवांच्या अभिव्यक्तीला प्राधान्य असल्याने रुबिनाच्या दृष्टीपेक्षा व्यापक भूमिका घेणे क्रमप्राप्त ठरले असणार.

रुबिना आपल्या जन्मदात्या आईशी कशी दुराव्याने वागते, हेही त्यामुळे स्वाभाविक वाटते.

रुबिना आणि तिची भावंडे लहान असतानाच त्यांची जन्मदाती आई खुर्शीद त्यांना सोडून जाते. ती पनवेलला एका झोपडपट्टीत एका परधर्मी पुरुषाबरोबर राहत असते. स्लमडॉगच्या यशानंतर खुर्शीद रुबिनाला भेटायला येते. 'मी रुबिनाला भेटायला आले आहे. कित्येक वर्षात तिला बघितलेलं नाही.' रुबिनाचे वडील अब्बा तिला विचारतात, 'आता तुला तुझ्या मुलीची काळजी वाटली होय?... तिला भेटता येणार नाही. चालती हो.' रुबिना म्हणते, 'मी तिला भेटायला नकार दिला. ती बाई माझ्यासाठी परकीच होती. मी प्रसिद्धीच्या झोतात होते म्हणून तिला आता माझ्याबद्दल प्रेम वाटू लागले असावे. त्या प्रसिद्धीचा झोतातला तिचा हिस्सा तिला हवा होता.'

नंतर खुर्शीद रुबिनाचा ताबा मागण्यासाठी पोलिसात तक्रार नोंदवते. पोलीस चौकशीला येतात. त्यावेळी रुबिना लिहिते, 'मला माझ्या जन्मदात्रीच्या माकडचेष्टांनी अधिक संताप आलाय. ती खरंच वेडी होती. तिनं वस्तीत मोठा तमाशा केला. माझ्या अब्बांना आणि पुऱ्या खानदानाला शिव्या देत होती.' खुर्शीद मुन्नीवर (रुबिनाची सावत्र आई) झडप घातली. तिच्याशी टीव्ही कॅमेऱ्यासमोर मारामारी केली. माझी जन्मदात्री

आई मुन्नीवर काळी जादू करतेय असा आरोप करीत होती. माझी मुन्नी त्यातली नव्हती. ती माझ्यावर आणि अब्बावर जीवापाड प्रेम करायची. खुर्शीदच्या नाटकाचे आमची अवस्था अधिकच दारुण करून ठेवली. डॅनी अंकलसुद्धा काळजीत पडले. त्यांनी आमची काळजी घेणारा ट्रस्ट स्थापन केल्याचे निवेदन पत्रकारांना दिले. मला माझ्या जन्मदात्री आईचा पूर्वीपेक्षा जास्तच तिरस्कार वाटतो. माझे अब्बा माझ्यावर प्रेम करतात. ते मला आदरणीय आहेत.'

अमेरिकेहून परतल्यावर झोपडपट्टीतही पत्रकारांची गर्दी असते. भावंडांना अमेरिकेविषयी कुतूहल असते. पण आधी रुबिना व तिचे कुटुंबीय मशिदीत जातात. 'अल्लाने आम्हाला जे भरभरून दिले, त्याबद्दल आम्ही सर्वांनी एकत्र प्रार्थना करून त्याचे आभार मानावेत असे अब्बांना वाटत होते. अल्लाने मला त्याचे आवडते मूल केल्याबद्दल मी त्याची कृतज्ञ होते.' असे रुबिना म्हणते.

पुस्तकाचा शेवट रुबिनाच्याच आत्मनिर्धाराने होतो. 'आता माझी स्वप्नं अधिक भव्यदिव्य झाली आहेत. प्रयत्न केला तर तारे कवेत घेण्यापासून मला कोणी रोखू शकणार नाही असं मला या क्षणी वाटतंय. जय हो.'

ध्यानीमनी नसताना अचानक जागतिक प्रसिद्धीच्या झोतात आणि समृद्धीच्या लाटेत एखाद्या व्यक्तीला नियती ढकलून देते, तेव्हा असेच काही भव्यदिव्य घडत असते. रुबिनाची ही कहाणी त्यामुळे प्रत्येकाला वाकुल्या दाखवत राहील.

**किंमत : १२०रु. सभासदांना : सवलतीत पोस्टेज : २५रु.**


**'स्वोर्डबर्ड' या इंग्रजी पुस्तकाचा मराठी अनुवाद**

## शांतिदूत

**नॅन्सी यी फान** अनुवाद **मंजूषा आमडेकर**

नॅन्सी यी फान सहावीत असताना क्रांतियुद्धं, दहशतवाद आणि ११ सप्टेंबरच्या घटनेचा अभ्यास करत होती. त्याच रात्री तिला लढाई करत असलेल्या पक्ष्यांबद्दलचं धडकी भरवणारं स्वप्न पडलं. दुसऱ्याच दिवशी तिने विश्वशांतीचा संदेश देण्याकरता *'शांतिदूत'* कादंबरी लिहायला सुरुवात केली. या अत्यंत बुद्धिमान बाललेखिकेने मैत्री आणि साहस या गुणांच्या जोरावर जुलमावर कशी मात करता येऊ शकते, ते या सशक्त कादंबरीतून दाखवून दिलेलं आहे.

**किंमत : १५०रु. पोस्टेज : २५रु.**

**आगामी**




# आदिपर्व

### मालोजीराजे भोसले
### यांच्या जीवनावर आधारित ऐतिहासिक कादंबरी

**डॉ. प्रमिला जरग**

सोळाव्या शतकात निजामशाही, आदिलशाही, मोगल यांच्यात सत्तासंघर्ष सुरू होता, त्यात लढणारे मात्र या भूमीचे पुत्र होते.

विध्वंस होत होता इथल्या भूमीचा. विध्वंस होणारी आपली भूमी, युद्धात आणि सततच्या दुष्काळात होरपळणारी रयत, श्रद्धास्थानांची होणारी दुरावस्था, याचा सल उरात ठेवूनच हा पराक्रमी योद्धा त्या काळाच्या निजामशाहीत वावरला. स्वपराक्रमाने 'सरगुऱ्हो'सारख्या सर्वोच्च दरबारी पदावर गेला.

शहाजी महाराजांनी सहा वर्षे चालवलेली प्रतिनिजामशाही, स्वतंत्रपणे राज्यकारभार चालवण्याचा केलेला धाडसी प्रयत्न; पुढे त्यांच्या व जिजाऊंच्या प्रेरणेने शिवरायांनी स्थापन केलेले स्वतंत्र हिंदवी स्वराज्य- यामागे मालोजीराजेंच्या शौर्याचा, पराक्रमाचा वारसा आहे.

छत्रपती शिवरायांच्या कर्तबगारीतून साकारलेल्या सार्वभौम हिंदवी स्वराज्याचा धागा मालोजीराजेंपर्यंत जातो.

मालोजीराजेंच्या कर्तृत्वाची ओळख मराठी वाचकांना करून देण्याचा प्रयत्न आजवर झालेला नाही.

'आदिपर्व' या कादंबरीने ही उणीव भरून काढलेली आहे.

इतिहासाशी प्रामाणिक राहून लिहिलेली ही अभ्यासपूर्ण कादंबरी
मराठी ऐतिहासिक कादंबरीची परंपरा समृद्ध करणारी आहे.

# पुरस्कार



*** ज्येष्ठ विचारवंत डॉ. आ. ह. साळुंखे यांना शाहू पुरस्कार**

'राजर्षी शाहूंनी दाखविलेल्या मार्गावरून केवळ दोन पावलं चाललो, तर माझा इतका सन्मान झाला. तरुणाने शाहू विचार समजून घेऊन वाटचाल केली, तर आपलाही किती सन्मान होईल, हे आता तरी समजून घ्यावे. कोल्हापूर हे माझे दुसरे हृदय असून, राजर्षी मला जणू कवटाळून कौतुक करत आहेत,' अशा शब्दांत ज्येष्ठ विचारवंत डॉ. आ. ह. साळुंखे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

राजर्षी शाहू मेमोरिअल ट्रस्टतर्फे डॉ. साळुंखे यांना ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य पी. बी. पाटील यांच्या हस्ते शाहू पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. रोख एक लाख रुपये, मानपत्र आणि स्मृतीचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप होते. तुडुंब भरलेल्या शाहूप्रेमींच्या उपस्थितीत शाहू स्मारक भवनात हा दिमाखदार सोहळा झाला. आर्थिक महासत्तेचे स्वप्न घेऊन सध्या वाटचाल सुरू असली, तरी राजर्षींनी केलेल्या कार्याच्या जोरावरच आज आपण हे स्वप्न पाहू शकतो. मात्र, विज्ञानातील प्रगतीबरोबरच सामान्य माणसांचा जीवनस्तर उंचावण्यात आपण अयशस्वी ठरलो, तर हे स्वप्न अपूर्ण ठरेल, असा महत्त्वपूर्ण संदेश यानिमित्ताने झालेल्या वैचारिक मंथनातून मिळाला.

विज्ञाननिष्ठा, जागतिकीकरण, सामाजिक चळवळींची सद्य:स्थिती अशा विविध अंगाने डॉ. साळुंखे यांनी हा संवाद अधिक खुलवला. ते म्हणाले, ''विज्ञानाशिवाय प्रगती अटळ असली, तरी त्यावर विवेकाचा अंकुश असावा. जागतिकीकरणाच्या आव्हानांना सामोरे जावेच लागेल. त्यासाठीच्या स्पर्धेत मात्र माणूसपण टिकवावे. चिमणी स्वत:च्या घरट्यात स्वच्छंदपणे जीवन जगत असेल, तर माणूस असं जीवन का जगू शकत नाही, असा प्रश्न प्रत्येकाने स्वत:ला विचारला पाहिजे. ''

ट्रस्टचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी लक्ष्मीकांत देशमुख यांनी स्वागत केले. विश्वस्त डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला.

*** निळू दामले यांच्या पुस्तकास गर्गे पुरस्कार प्रदान**

समाज विज्ञान मंडळ न्यासातर्फे आयोजित केलेल्या कार्यक्रमात निळू दामले

यांच्या ‘धर्मवादळ’ या पुस्तकाला स. मा. गर्गे पुरस्काराने गौरविण्यात आले.

दामले म्हणाले, ‘‘धर्मग्रंथांचा बागुलबुवा उभा करून माणसांनी कसे जगायचे ते कोणी सांगू नये. रूढी आणि परंपरांचे ओझे झुगारण्याचे स्वातंत्र्य अबाधित राहणे आवश्यक आहे. धर्माच्या नावावर हे स्वातंत्र्य कोणी हिरावून घेता कामा नये. पत्रकारांनी समाजाला मिसळावे. जागेवर बसून हाती आलेली माहिती रंजक करून मांडण्यापेक्षा थेट संवाद साधावा. माणसाचे माणूसपण शोधावे आणि सत्याचा पाठपुरावा करून त्याचा वृत्तान्त मांडावा.’’

‘‘धर्माविषयी जगभर सुरू असलेल्या चर्चेचा दामले यांनी संदर्भासह ऊहापोह केल्याने ‘धर्मवादळ’ हे पुस्तक वाचनीय बनले आहे. या पुस्तकामुळे वैचारिक वाङ्मयात मोलाची भर पडली आहे.’’ असे बागूल यांनी सांगितले.

न्यासाचे विश्वस्त अप्पा कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. कविता भालेराव यांनी आभार मानले.

### * मृण्मयी पुरस्कार

प्रख्यात साहित्यिक कै. गो. नी. दांडेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिला जाणारा ‘मृण्मयी पुरस्कार’ कवी इंद्रजित भालेराव यांना तर नीरा गोपाल दांडेकर यांच्या स्मरणात दिला जाणारा ‘नीरा-गोपाल’ पुरस्कार सामाजिक कार्यकर्त्या मीरा बडवे यांना अंतर्नाद मासिकाचे संपादक भानू काळे यांच्या हस्ते गोनीदांच्या जन्मदिनी देण्यात आला.

गोनीदांनी आपल्या पंचाहत्तरीला सुरू केलेला ‘मृण्मयी पुरस्कार’ त्यांच्या निधनानंतर १९९९ पासून दांडेकर कुटुंबीयांतर्फे दिला जातो. मारुती चितमपल्ली, विलास मनोहर, श्रीनिवास कुलकर्णी, आशा बगे, आनंद अंतरकर, सुधीर मोघे, अरुणा ढेरे, विश्वास पाटील आदी साहित्यिकांना यापूर्वी या पुरस्काराने गौरविण्यात आले असून, यावर्षी परभणीचे कवी इंद्रजित भालेराव यांना त्यांच्या दर्जेदार साहित्यसेवेसाठी दिला जाणार आहे. पुरस्काराचे हे विसावे वर्ष आहे. गोनीदांच्या पत्नी नीरा गोपाल दांडेकर यांच्या स्मरणार्थ सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात मोलाचे काम करणाऱ्या व्यक्तीला दिला जाणारा ‘नीरा-गोपाल’ पुरस्कार यावर्षी अंधांच्या जीवनाला नव्या प्रकाशवाटा देण्यासाठी सातत्याने जिव्हाळ्याचे प्रयत्न करणाऱ्या पुण्यातील मीरा बडवे यांना देण्यात आला. दोन्ही पुरस्कारांचे स्वरूप दहा हजार रुपये रोख आणि स्मृतिचिन्ह आहे.

### * जयप्रकाश सावंत यांना अकादमी अनुवाद पुरस्कार

साहित्य अकादमीचा यंदाचा अनुवादाचा पुरस्कार लेखक जयप्रकाश सावंत

यांना ‘कलिकथा व्हाया बायपास’ या कादंबरीसाठी जाहीर झाला आहे. ५० हजार रुपये रोख आणि मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. २१ ऑगस्टला गोव्यात होणाऱ्या अकादमीच्या वार्षिक समारंभात या पुरस्काराचे वितरण होईल.

अलका सरावदी लिखित ‘कलिकथा व्हाया बायपास’ या मूळ हिंदी कादंबरीलाही साहित्य अकादमीचा पुरस्कार यापूर्वी मिळालेला असल्याने अकादमीचे दोन पुरस्कार एकाच पुस्तकाला प्राप्त झाले आहेत.

*** प्रा. के. रं. शिरवाडकर यांना सोनोपंत दांडेकर पुरस्कार**

महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे डेक्कन कॉलेजचे अध्यक्ष डॉ. गो. बं. देगलूरकर यांच्या हस्ते शिरवाडकर लिखित ‘आपले विचार विश्व’ या पुस्तकाला ‘प्राचार्य सोनोपंत दांडेकर पुरस्कार’ प्रदान करण्यात आला. प्रसिद्ध प्रवचनकार डॉ. कल्याणी नामजोशी, या पुरस्काराचे पुरस्कर्ते डॉ. म. वि. गोखले, परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ. वि. भा. देशपांडे, प्रमुख कार्यवाह डॉ. माधवी वैद्य आणि कोशाध्यक्ष ह. ल. निपुणगे या वेळी उपस्थित होते.

प्रा. के. र. शिरवाडकर म्हणाले, ‘‘विविध प्रश्नांची उत्तरे शोधण्याच्या प्रक्रियेतून लेखनाचा प्रवास सुरू झाला. या पुस्तकातून प्राचीन आणि अर्वाचिन विचारांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केला आहे. पाश्चात्त्य विचार फुलत गेला. त्या तुलनेत भारतीय विचारांना फारशी गती मिळाली नाही हे जाणवले. विद्वत्ता आणि व्यासंग याचा ऱ्हास होण्यामध्ये आपली शिक्षणव्यवस्था कारणीभूत आहे हे लक्षात आले.’’

डॉ. देगलूरकर यांनी दांडेकरांच्या आठवणींना उजाळा दिला. ते म्हणाले, ‘‘पाश्चात्त्य विचार या पुस्तकामध्ये साररूपाने आले आहेत. हे विचार ठाम, ठोस आणि अनुभूतीच्या पातळीवरचे आहेत. आपल्या संस्कृतीमध्ये ब्रह्म सगुण निराकार आणि देव सगुण साकार आहे. देव न मानणाऱ्या मंडळींना आपल्या बुद्धीबद्दल इतकी खात्री असते, की इतरांना बुद्धी असते याचा त्यांना विसर पडतो.’’

*** सरदार जाधव यांना दहिवळ गुरुजी प्रतिष्ठानचा पुरस्कार**

दहिवळ गुरुजी स्मृती प्रतिष्ठान, अहमदनगर तर्फे दिला जाणारा यंदाचा कादंबरीसाठीचा पुरस्कार औरंगाबाद येथील साहित्यिक, चित्रकार सरदार जाधव यांच्या ‘दात’ या कादंबरीस जाहीर झाला आहे. सरदार जाधव हे चित्रकार, लेखक असून त्यांची ‘माणसं अन् कणसं’ (कथासंग्रह), ‘कोयता’ (आत्मचरित्रात्मक कादंबरी), ‘नागतांडव’ (नाटक) ही पुस्तके प्रसिद्ध आहेत. त्यांच्या साहित्यकृतींना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलेले आहे. ग्रामीण जीवनाचं वास्तवस्पर्शी दर्शन त्यांच्या लिखाणातून घडतं. ऊस तोडणी कामगारांच्या जीवनावरील त्यांची ‘कोयता’ ही

कादंबरी प्रचंड गाजली. जनशक्ती वाचक चळवळीने नुकत्याच प्रकाशित केलेल्या 'दात' या कादंबरीतून त्यांनी रेखाटलेला पिसाळलेला माणूस वाचकांना हेलावून सोडतो. विषयांचं वेगळेपण आणि चित्रमय शैली ही त्यांच्या लिखाणाची वैशिष्ट्ये आहेत. कोयता या कादंबरीनंतर बऱ्याच वर्षांनी आलेल्या 'दात'बद्दल वाचकांमध्ये उत्सुकता होतीच.

माधव पवार यांच्या 'हे शुभशकुनांचे पक्षी' या कवितासंग्रहाला तसेच दीपध्वज कोसोदे यांनी लिहिलेल्या पंचनामा या कथासंग्रहाला व संजय पवार यांच्या 'चोख्याच्या पायरीवरून' या पुस्तकांना दहिवळ गुरुजी स्मृती साहित्य पुरस्कार २०१० ने गौरविण्यात येणार आहे.

अहमदनगर जिल्ह्यातील साहित्यिकांसाठीचा विशष साहित्य गौरव पुरस्कार 'भ्रमिष्टाचा जाहिरनामा', 'पिढीपेस्तर प्यादेमात' या साहित्यकृतींची दखल घेऊन संतोष पद्माकर पवार यांना जाहिर झाला आहे.

अन्य पुरस्कार विजेते - बालसाहित्य - रविंद्र जवादे (एक होती परी), समीक्षा - डॉ. अनंता सूर (दया पवारांची कविता आकलन आणि आस्वाद), ललित - राजा शिरगुप्पे (शोधयात्रा-ग्रामीण महाराष्ट्रातील दुर्गम भागांची), संपादीत - प्रा.डॉ.अरुण शिंदे (मुकुंदराव पाटील यांच्या कथा), प्रा. संजय बालाघाटे ('सर'समीक्षा आणि परीक्षणे)

*** किरण यज्ञोपवित यांना व्यावसायिक गुणवत्ता पुरस्कार**

लेखक-दिग्दर्शक-अभिनेते म्हणून समांतर रंगभूमीवर अनेक प्रसिद्ध एकांकिका, दीर्घांक आणि नाटकांसाठी एक दशकाहून अधिक काम केलेल्या यज्ञोपवित यांचा 'रोटरी क्लब ऑफ पुणे मेट्रो'तर्फे व्यावसायिक गुणवत्ता पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. पाच हजार रुपये, मानपत्र, शाल, श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप होते. दिग्दर्शक सुनील सुकथनकर यांच्या हस्ते यज्ञोपवित यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

''स्वत:सह इतरांचे आयुष्य समृद्ध करण्याची क्षमता लेखकाकडे असते. लेखकाची म्हणून एक वेगळी जीवनदृष्टी असते आणि बदलत जाणाऱ्या काळाबरोबर बदलणाऱ्या प्रवाहांचे, सामाजिकतेचे चित्रण करण्याची ताकद त्याच्या लेखणीत असते,'' असे विचार प्रसिद्ध नाट्यकर्मी किरण यज्ञोपवित यांनी मांडले.

'सकाळ'चे संपादक सुरेशचंद्र पाध्ये, 'रोटरी क्लब ऑफ पुणे मेट्रो'चे अध्यक्ष अनिल जोशी, विश्वंभर चौधरी या वेळी उपस्थित होते. कार्यक्रमात अभय महाजन आणि धर्मकीर्ती सुमंत यांच्याशी मुलाखतीच्या स्वरूपात संवाद साधताना यज्ञोपवित

यांनी आपला रंगभूमीवरील प्रवास सांगितला. लेखक म्हणून मान्यता मिळण्यात 'समन्वय' नाट्यसंस्थेचे योगदान, विविध साहित्यिक-नाटककारांचा प्रभाव, कथेचे महत्त्व अशा वेगवेगळ्या विषयांवर त्यांनी आपले विचार मांडले. ''जागर नाट्यसंस्थेतून, नाट्यलेखन करत असताना 'इस्किलार', 'अब्राहम लिंकनचे पत्र' या नाटकांच्या माध्यमातून गजानन परांजपे, शशांक शेंडे या दिग्गज अभिनेत्यांचा जवळून परिचय झाला, तर विषयांमधला ताजेपणा, सतत नवीन प्रयोगांना वाव देण्याचे स्वातंत्र्य 'समन्वय'मुळे मिळाले. 'मित्रद्वय', 'युगान्त', 'मळभ', 'ते पुढे गेले' या नाटकांद्वारे लेखक म्हणून मोठा अनुभव मिळाला,'' असे त्यांनी सांगितले.

सुकथनकर म्हणाले, ''आज केवळ प्रेक्षकांना डोळ्यांसमोर ठेवून चाकोरीबद्ध काम करणारे अनेक नाटककार असताना समाजाकडून अनेकदा अपेक्षित प्रतिसाद मिळत नसतानाही, निष्ठा बाळगून पुढे जात राहणाऱ्या किरणसारख्या काही गुणी कलाकारांचे नाट्यक्षेत्रातील कार्य खरोखर कौतुकास्पद आहे.''

पाध्ये म्हणाले, ''लेखन, दिग्दर्शन, अभिनय, नेपथ्य अशा सर्व आघाड्यांवर नाटकासाठी काम करीत असतानाच यज्ञोपवित यांनी आपल्यातला माणूस जपला आहे.''

*** उस्ताद फैय्याज हुसेन खाँ यांना 'बालगंधर्व पुरस्कार'**

पुणे महापालिकेतर्फे यंदाचा 'बालगंधर्व पुरस्कार' प्रख्यात गायक व व्हायोलिन वादक उस्ताद फैय्याज हुसेन खाँ यांना महापौर मोहनसिंग राजपाल यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. ''या महान महाराष्ट्राच्या, सुरेल संगीताचे... मी कणकण वेचित गेलो...'' अशी सुरेश भावना प्रख्यात गायक उस्ताद फैय्याज हुसेन खाँ यांनी 'बालगंधर्व पुरस्कार' स्वीकारताना व्यक्त केली आणि बालगंधर्व जयंतीदिनाचा पुरस्कार सोहळा त्यांच्या मनोगताने अधिकच संगीतमय झाला.

आमदार उल्हास पवार, ज्येष्ठ अभिनेत्री लीला गांधी, अभिनेता प्रशांत दामले, डॉ. सतीश देसाई यांची प्रमुख उपस्थिती होती. पंचवीस हजार रुपये, सन्मानचिन्ह आणि शाल, श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. फैय्याज खाँ यांनी पुरस्काराची रक्कम 'लोकबिरादरी' संस्था आणि मतिमंदासाठी काम करणाऱ्या 'सावली' या संस्थेला दिली.

पुरस्कार स्वीकारल्यानंतर मनोगत व्यक्त करताना फैय्याज खाँ म्हणाले की, बालगंधर्व हे आमच्या घराण्याचेच दैवत होते. मी स्वत: दहाव्या-अकराव्या वर्षापासून त्यांची गाणी ऐकली, नाटकेही पाहिली. आमच्या 'झज्जर' घराण्याच्या सारंगीवादनाचे बालगंधर्वांनी चीज केले. त्यांनी सारंगीला सन्मान प्राप्त करून दिला आणि या वाद्याची ओळखदेखील त्यांच्यामुळेच महाराष्ट्रातील घराघरांत झाली. त्यांनी महाराष्ट्राला

सुसंस्कृत केले आणि 'कानसेन'ही बनवले. त्यांच्याबरोबर मा. दीनानाथ, वझे बुवा, ओंकारनाथ ठाकूर यांचेही दर्शन मला बालपणीच झाले आणि मी खरोखरच भाग्यशाली ठरलो. धन्य झालो.

आजवर संगीताच्या ज्या ज्या कार्यक्रमांना मी गेलो तेथे विद्यार्थी म्हणून गेलो आणि म्हणून मी प्रत्येकाकडून काही ना काही शिकू शकलो, असे सांगून ते म्हणाले, की या महाराष्ट्राने आणि पुण्यनगरीनेही मला भरभरून दिले आहे. त्याबद्दल मी अगदी कृतज्ञ आहे. शब्द-सुरांना योग्य साथ व दाद देणाऱ्या पुण्याने खाँ साहेबाच्या पाठीवर पुरस्काराची थाप दिली आहे. अशा पुरस्कारांनी किंवा कौतुकानी कलाकारांना नेहमीच स्फूर्ती मिळते, असे प्रशांत दामले म्हणाले.

एका गुणी आणि विनम्र वृत्तीच्या कलाकाराचा हा सन्मान आहे आणि त्यांच्या चाहत्यांसाठी आनंदाचा क्षण आहे, असेही त्यांनी सांगितले. खाँ साहेबांना आजोबा आणि वडिलांकडून संगीताचा जो वारसा लाभला तो त्यांनी समर्थपणे पुढे चालवला, अशा शब्दांत उल्हास पवार यांनी गौरव केला. रंगभूमीची सेवा केलेल्यांचा प्रत्येकी पाच हजार रुपये व स्मृतिचिन्ह देऊन या कार्यक्रमात विशेष सन्मान केला जातो. यंदा दीपक रेगे (अभिनय, गायन), अरुण पोमण (पडद्यामागील कलावंत), हृषीकेश बडवे (कीर्तनकार), स्वामिनी कुलकर्णी (गायिका), आलोक राजवाडे (पुरुषोत्तम करंडक विजेता) आणि हरिभाऊ कुदळे (तबलावादक) यांचा सन्मान करण्यात आला.

### * संगीत नाटक अकादमीचे युवा पुरस्कार

संगीत नाटक अकादमीतर्फे कला क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल दिल्या जाणाऱ्या 'उस्ताद बिस्मिल्ला खाँ युवा पुरस्कारा'साठी महाराष्ट्रातून मुक्ता बर्वे, जुही बब्बर आणि रेश्मा मुसळे-परीतेकर यांची निवड झाली आहे. अनुक्रमे अभिनय, लोकनृत्य आणि वेशभूषा या क्षेत्रांतील कामगिरीसाठीचे हे पुरस्कार आहेत.

शहनाईवाझ उस्ताद बिस्मिल्ला खाँ यांच्या स्मरणार्थ संगीत नाटक अकादमीने सन २००६ पासून या पुरस्कारांना सुरुवात केली. कला क्षेत्रातील राष्ट्रीय स्तरावरील हा महत्त्वाचा पुरस्कार मानला जातो. सन २००९ च्या पुरस्कारांसाठीची घोषणा नुकतीच झाली असून, त्यात महाराष्ट्रातील या तीन कलावंतांचा समावेश आहे. महाराष्ट्रातून कलावंत निवडीच्या प्रक्रियेसाठी रोहिणी हट्टंगडी आणि प्रकाश खांडगे हे परीक्षक आहेत.

पुरस्काराबद्दल मुक्ता बर्वे म्हणाली, ''गेल्या दहा वर्षांत नाट्यक्षेत्रातील माझ्या कामगिरीबद्दलचाच हा पुरस्कार असल्याची माझी भावना आहे. राष्ट्रीय स्तरावरील हा पुरस्कार असल्याने त्यात प्रत्येक राज्यातील कलाकारांच्या नाट्यक्षेत्रातील कामगिरीचे

कसून परीक्षण केले जाते. त्या स्तरावर आपली निवड झाल्याचा आनंद जास्त आहे.''

पुण्यातील सणसवाडीत राहणाऱ्या रेश्मा मुसळे-परीतेकर या वयाच्या सातव्या वर्षापासून लावणी नृत्य करीत आहेत.

*** प्रसिद्ध कीर्तनकार चारुदत्त आफळे यांना यशवंत कुलकर्णी पुरस्कार**

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, पुणे शाखा आणि 'सुशील स्नेह परिवारा'तर्फे आयोजित दीनानाथ मंगेशकर स्मृती संगीत नाटक महोत्सवाची सांगता भरत नाट्य संशोधन मंदिर निर्मित 'कट्यार काळजात घुसली' या नाटकाने झाली.

या वेळी संगीत रंगभूमीवरील ज्येष्ठ गायक-अभिनेते प्रसाद सावकार यांच्या हस्ते प्रसिद्ध कीर्तनकार आणि कलाकार चारुदत्त आफळे यांना 'यशवंत भगवंत कुलकर्णी स्मृती पुरस्कार' प्रदान करण्यात आला. सावकार म्हणाले, ''संगीत रंगभूमी ही मराठी रंगभूमीची जननी आहे. रंगभूमीवर एका वेळी गायन आणि नाटक सादर होणे, ही जगाला दिलेली देणगी आहे. तरुण कलाकारांनी जुन्या नाटकांकडे वळल्यास संगीत रंगभूमीला नवसंजीवनी मिळेल.''

या प्रसंगी 'लोकसत्ता'चे निवासी संपादक मुकुंद संगोराम, नाट्य परिषदेचे शाखा अध्यक्ष डॉ. सतीश देसाई, विपिन गुपचूप, सुनंदा गुपचून, विजय वांकर, शशिकांत कुलकर्णी उपस्थित होते.

*** 'संत नामदेव जीवनगौरव पुरस्कार' प्रकाश निकते यांना प्रदान**

पुणे विद्यापीठातील संत नामदेव अध्यासनातर्फे देण्यात येणारा पहिला 'संत नामदेव जीवनगौरव पुरस्कार' पंढरपूर येथील नामदेव वाङ्मयाचे अभ्यासक प्रकाश निकते यांना कुलगुरू डॉ. रघुनाथ शेवगावकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

पंढरपूर येथे झालेल्या या कार्यक्रमाला माजी आमदार सुधाकरपंत परिचारक, गहिनीनाथ औसेकर महाराज, नामदास महाराज, संत नामदेव अध्यासनाच्या प्रमुख डॉ. वीणा मनचंदा, उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष उल्हास पवार, बाळासाहेब बडवे, वा. ना. उत्पात व प्रा. नि. ना. रेळेकर उपस्थित होते.

सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ, एकवीसशे रुपये व पुणेरी पगडी असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

या वेळी कुलगुरू डॉ. शेवगावकर यांनी निकते यांच्या संत नामदेवांवरील अभ्यासाचा विशेष उल्लेख केला. ते म्हणाले, ''संतांची भूमी असलेल्या महाराष्ट्रात संत नामदेवांचे कार्य मोठे आहे. त्यांच्या कार्याचा, वाङ्मयाचा अभ्यास करून निकते यांनी मोठे काम केले आहे.''

सत्काराला उत्तर देताना प्रकाश निकते यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रा. सुनंदा

अत्रे यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. डॉ. सुमती देशपांडे यांनी आभार मानले.

### * डॉ. शेवगावकर यांना 'आयईईई'चा पुरस्कार

पुणे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. रघुनाथ शेवगावकर यांना 'इन्स्टिट्यूशन ऑफ इलेक्ट्रिकल अँड इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग' (आयईईई) या आंतरराष्ट्रीय संस्थेचा २०११ साठीचा 'अंडरग्रॅज्युएट टीचिंग अॅवॉर्ड' हा सर्वोच्च पुरस्कार जाहीर झाला आहे. दर वर्षी जगभरातून एकाच शिक्षकाची या पुरस्कारासाठी निवड केली जाते. 'इलेक्ट्रोमॅग्नेटिक वेव्ह्ज अँड ट्रान्समिशन लाइन्स' या विषयातील भाषणे, पुस्तके व दृकश्राव्य मार्गदर्शन यासाठी डॉ. शेवगावकर यांना हा पुरस्कार जाहीर झाला आहे.

१९९२ मध्ये हा पुरस्कार देण्यास सुरुवात झाली. त्यानंतर २०१० पर्यंतचे सर्व पुरस्कार अमेरिकन विद्यापीठातील प्राध्यापकांनी मिळविले आहेत. प्रथमच भारतीय शिक्षकाला हा पुरस्कार मिळाला आहे. या पुरस्काराबद्दल त्यांचे विद्यापीठातर्फे अभिनंदन करण्यात आले आहे.

### * बलराज साहनी - साहिर लुधियानवी फाउंडेशनचे पुरस्कार

बलराज साहनी-साहिर लुधियानवी फाउंडेशनच्या वतीने डॉ. भालचंद्र मुणगेकर यांना 'मी असा घडलो' या आत्मकथेसाठी डॉ. श्रीराम लागू यांच्या हस्ते 'कैफी आझमी राष्ट्रीय पुरस्कार' प्रदान करण्यात आला. तसेच, नाटककार, अभिनेते, निर्माते-दिग्दर्शक अतुल पेठे यांना पाच महिला सफाई कर्मचाऱ्यांच्या हस्ते 'बलराज साहनी' पुरस्कार प्रदान करण्यात आला.


डॉ. मुणगेकर म्हणाले की, 'मी असा घडलो' हे माझे आत्मचरित्र नसून ती मला घडविणाऱ्यांची कथा आहे. मला आयुष्यात खूप काही मिळाले. पण सर्वांत हवंहवंसं वाटणारं आयुष्य वयाच्या अठराव्या वर्षापर्यंतचेच आहे.

अतुल पेठे म्हणाले की, बलराज साहनी यांच्या नावाच्या पुरस्काराने माझ्या कार्याला बळ मिळेल. साहनी, लुधियानवी यांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी. सध्याच्या समाजाचे कळीचे प्रश्न विस्ताराने समजावून घेऊन नाटक, सिनेमाच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न मी करणार आहे. कलावंताने आधी चांगला माणूस बनावे व त्यासाठी किंमत मोजण्याचीही तयारी ठेवावी.

डॉ. लागू म्हणाले, ''मुणगेकर व पेठे यांचे कार्य विलक्षण आहे. या पुरस्कारांसाठी हे दोघे योग्य व्यक्ती आहेत.''

❒

**नवे कोरे**




# अरुणाची गोष्ट

**पिंकी विराणी**

अनु. मीना कर्णिक

**१८०रु. पोस्टेज २५रु.**

अरुणा शानबागसारखं प्रकरण हे वैद्यकीय व्यवसायातलं एकमेव प्रकरण असेल!

पण तरीही त्यावर म्हणावं तेवढं संशोधन झालेलं नाही. अशा प्रकारचं आयुष्य जगणाऱ्या रोग्यांसाठी दयामरणाचा निर्णय योग्य म्हणता येईल की अयोग्य यावर म्हणावी तेवढी चर्चा झालेली नाही.

बलात्काराविरूद्धच्या कायद्यातील पळवाटांबाबतही योग्य तो उपाय झालेला नाही.

अरुणाची ना धड मृत आणि ना धड जिवंत अशी अवस्था करणाऱ्या नराधमाला मात्र केवळ सात वर्षांची शिक्षा झाली! तीही चोरी आणि मारहाणीच्या कृत्यांबद्दल. बलात्कार केल्याचा आणि खुनाच्या प्रयत्नाचा आरोप कोणी त्याच्यावर ठेवलाच नाही.

अशा प्रश्नांची उठाठेव करण्याची गरज आहेच कुणाला?

पिंकी विराणींचे हे पुस्तक या अशा धगधगत्या प्रश्नांना वाचा फोडते.

# वाचकांचा प्रतिसाद



संपादक

आपला जून २०१० चा अंक पोहोचला.

आपले जून महिन्याचे संपादकीय उत्तम आहे. या विषयावर कोणीतरी लिहावयास पाहिजे होते.

मी पुण्यातील तीन ग्रंथालयांचा कायम सभासद आहे. कित्येक वेळेला अशी पुस्तके असतात, की ती का छापली असा प्रश्न पडतो. त्यांची किंमतही जास्त असते. आणि मजकूर वाचनीय नसतो.

सुमार दर्जाच्या पुस्तकांचा व्हायरस वाढावयास लागला आहे हे नक्की. नवीन पिढी मराठी वाचत नाही. (उदा. माझी स्वत:ची नातवंड) जुने वाचक अशा पुस्तकांना कंटाळलेले आहेत.

आपण उत्तम संपादकीय लिहिल्याबद्दल आपले अभिनंदन.

**श. मु. गोखले**

४०९, नारायण पेठ, पुणे ४११ ०३०.

संपादक

स. न. वि. वि.

पुणे साहित्य संमेलन विषयक तपशील 'ग्रंथजगत' च्या मे २०१० अंकातून वाचायला मिळाला. वसंत आठवले, गाडगे बाबा इ. मजकूर जो वृत्तपत्रातून चौकटीत मिळायला हवा होता तोही हाती आला. प्रत्येक अंकातून, मराठी साहित्यसृष्टीत जे घडते त्याचे दर्शन होते.

धन्यवाद!

**दिगंबर गाडगीळ**

३९, आनंदवन कॉलनी, नाशिक ४२२ ००५.

माननीय महोदय,

इंग्रजी-मराठी पुस्तकं आवडीने वाचणारी मी एक निष्ठावान आणि रसिक वाचक आहे. परंतु मूळ इंग्रजी पुस्तकांची भाषांतरित किंवा अनुवादित पुस्तकं वाचण्यापासून मी काहीशी दूरचं राहत होते. कारण अशी काही पुस्तकं पूर्वी वाचताना जाणवलेली भाषेची कृत्रिमता, त्यामुळे कंटाळवाणं ठरलेलं ते वाचन...

शोभना शिकनीस यांनी अनुवादित केलेली, 'पीस ऑफ केक', 'हिरॉईन ऑफ द डेझर्ट' आणि 'द डायरी ऑफ मेरी बर्ग' ही तीन पुस्तके अत्यंत ओघवत्या भाषेमुळे आपण भाषांतर वाचत आहोत असे वाटत नाही.

पुस्तकांतील स्थळ, व्यक्ती, संदर्भ, नावं सगळं काही अपरिचित असून देखील जणू काही एखादा चित्रपटच पाहतो आहोत, असेच त्यातील सगळे प्रसंग माझ्या डोळ्यांपुढे अक्षरश: जिवंत झाले.


विशेषत: 'द डायरी ऑफ मेरी बर्ग' हे पुस्तक अतिशय हेलावून टाकणारं आणि मनात भावनांची खळबळ निर्माण करणारं पुस्तक आहे.

ही मुळची अभिजात पुस्तकं मराठी वाचकांपर्यंत पोहोचविण्याची कामगिरी अनुवादिकेनं निश्चितचं चांगली पार पाडली आहे. अशी मूळ पुस्तकं कदाचित वाचकांना सहजासहजी उपलब्ध देखील होत नसावीत. चांगल्या भाषांतरामुळे ते शक्य होईल.


'मेहता पब्लिशिंग हाऊस'च्या भाषेवर चांगलं प्रभुत्त्व असलेल्या अनुवादकांच्या मदतीने करण्यात येणारे हे स्पृहणीय कार्य भविष्यातही असंच पुढे चालू रहावं अशी अपेक्षा.

धन्यवाद!

**डॉ. विजया जोशी**








जगभरातल्या ३० हून अधिक भाषांमध्ये ५० लाख प्रतींच्या विक्रीचा
टप्पा गाठणारी 'बेस्ट सेलर' कादंबरी आता मराठीत

# शांताराम



ग्रेगरी डेव्हिड रॉबर्ट्स
**अनु. अपर्णा वेलणकर**

९९०रु. पोस्टेज ४०रु.

*दूर देशाहून एक गोरं पाखरू. पळून आलं होतं.*
*तुटलं होतं माणसांपासून... मातृभूमीपासून... जगण्यापासूनच!*
*मागावर असलेले पोलीस आणि स्वत:च्या डागाळलेल्या आयुष्याची लाज वाटणारं मन यापासून त्याला पळून जायचं होतं...*
*लपून राहायचं होतं. ते उतरलं होतं मुंबईत.*
*अंधारी, काळी, कलकलाटाची दुनिया. पिचलेली...*
*तरीही ताठ उभ्या कण्याची! क्षणात नरडीचा घोट घेणारी,*
*क्षणात प्रेमाची पाखर घालून पोटाशी कवटाळणारी दुनिया!*
*घर सुटलेलं, कुटुंब तुटलेलं, जिवलग दुरावलेले, अशा शून्य अवस्थेत भिरभिरणारं ते एकुट पाखरू शिरलं मुंबईच्या कुशीत.*
*– आणि बघता बघता सारं बदललं.*
*एक नवीच दुनिया उलगडत गेली.*
*प्रेमाचा पाऊस... द्वेषाचा जाळ... विश्वासघाताचे सुरे...*
*रहस्यांचं चक्रव्यूह आणि गुपितांच्या गुहा!*
*शरीरसुखाच्या उफाळत्या लाटांवर नाचणारा उत्कट प्रणय आणि तुरुंगाच्या अंधारकोठडीतला रक्तरंजित छळ. जगण्याच्या लढाईत धगधगणाऱ्या झोपड्या आणि पंचतारांकित हॉटेलातलं थंडगार ऐश्वर्य.*
*अंडरवर्ल्डमधल्या टोळीयुद्धांच्या चिखलात रुजलेली तत्त्वज्ञानाची कमळं आणि बॉलीवुडच्या झगमगाटाआडचा सुन्न अंधार.*
*– मुंबई.*

# श्रद्धांजली

*** प्राचार्य शिवाजीराव भोसले**

आपल्या ओघवत्या, रसाळ वक्तृत्त्वशैलीने मराठी माणसांची मने केवळ रिझविणारेच नव्हे, तर त्यांच्यावर मूल्यसंस्कार घडविणारे प्राचार्य शिवाजीराव भोसले यांचे फुप्फुसाच्या संसर्गाने २९ जून रोजी निधन झाले. भारतीय तत्त्वज्ञान, महापुरुषांची चरित्रे यांचा दांडगा अभ्यास असणाऱ्या भोसले यांनी अनेक पिढ्यांचे विचारपोषण केलेच, पण त्याचबरोबर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरूपद यशस्वीरीत्या भूषवून शिक्षणक्षेत्रात भरीव कामगिरी केली. त्यांच्यामागे पत्नी, एक चिरंजीव आणि एक कन्या असा परिवार आहे. ते ८३ वर्षांचे होते.

आचार्य अत्रे यांच्याखेरीज साठोत्तरीच्या दशकांमध्ये मोठी गर्दी खेचणारा एकमेव वक्ता म्हणून प्रा. भोसले यांचे नाव घ्यावे लागेल. ज्यांचे एक व्याख्यान नव्हे; तर सलग अनेक दिवसांची व्याख्यानमाला आयोजित केली जात असे, असे वक्ते महाराष्ट्रात फारच कमी होते, त्यात भोसले यांचा समावेश होता. त्यांच्या व्याख्यानाचे दिनांक किमान एक वर्ष आधी निश्चित होत असत.

भारती विद्यापीठाने पुण्यात २६ एप्रिलला त्यांचा 'जीवनसाधना' गौरव पुरस्कार देऊन सत्कार केला. तो त्यांचा शेवटचा जाहीर कार्यक्रम आणि त्यातील भाषण हे शेवटचे भाषण ठरले. 'प्रकृती साथ देत नाही, तरीही या कार्यक्रमास मुद्दाम आलो, जीवन ही साधना असून त्याचा गौरव आपण करीत आहात. श्रोत्यांच्या साथीने मी ही साधना केली, त्याचा मला आनंद होतो आहे,' अशा शब्दांत त्यांनी सत्काराला उत्तर दिले होते. त्यांना निर्वाणाची चाहूल गेल्या काही काळापासून लागलेली होती. 'देहू-आळंदीची स्पंदने मला ऐकू येत आहेत,' असे ते म्हणत. तसेच महाराष्ट्र साहित्य परिषदेने फलटण येथे गेल्या वर्षी मेळाव्याचे आयोजन केले होते, त्याच्या समारोप सत्रात ते उपस्थित राहिले आणि 'उगवत्या पिढीच्या साक्षीने मावळण्यातच आनंद आहे,' असे उद्गार काढले होते.

*** ख्यातनाम तबलावादक चंद्रकांत कामत**

प्रसिद्ध तबलावादक पं. चंद्रकांत कामत यांचे हृदयविकाराने निधन झाले. ते ७७ वर्षांचे होते.

कामत यांचा जन्म २६ नोव्हेंबर १९३३ रोजी धुळे येथे झाला. वडील सुप्रसिद्ध गायक-नट मास्टर शांताराम कामत यांची 'आनंदविलास' तसेच ललित कलादर्शन, यशवंत नाटक संगीत मंडळी, रंगबोधेच्छु, प्रभाकर संगीत नाटक मंडळी अशा अनेक नाटककंपन्यांमध्ये त्यांचे बालपण गेले. अनेक स्त्री-भूमिका त्या तबलावादकांकडून त्यांनी गाजवल्या. भेटेल त्या तबलावादकांकडून त्यांनी तबल्याचे शिक्षण घेतले. शंकर रघुनाथ शिवलकर, रामभाऊ वष्ट, दिगंबर यमाजी कदम यांच्याकडे गुरूसेवा करून कामतांनी तालविद्या मिळवली, नृत्याचेही धडे घेतले.

पं. भीमसेन जोशी, पं. वसंतराव देशपांडे, माणिक वर्मा यांच्या मैफिली, नृत्यांगना रोहिणी भाटे यांच्या कथकनृत्याला त्यांनी तबल्याची साथ दिली. संशयकल्लोळ, एकच प्याला प्रेमसंन्यास, उधार उसनवार, संत सखू अशा मराठी आणि मुन्शी अब्बास अली लिखित उर्दू-हिंदी नाटकांतही त्यांनी भूमिका केल्या. दामूअण्णा मालवणकरांच्या प्रभाकर नाट्यमंदिरातही त्यांनी काम केले. रंगपट, कपडेपट सांभाळण्यापासून अभिनयापर्यंत सगळी कामे केली.

१९६४ मध्ये कामत बनारस घराण्याचे तबलावादक पं. सामता प्रसाद यांचे शिष्य झाले. १९५६ ते १९९१ पर्यंत काम आकाशवाणीमध्ये तबलावादक स्टाफ आर्टिस्ट म्हणून नोकरीला होते. व्ही. जी. जोग, एन. राजन, हरिप्रसाद चौरसिया, कार्तिक कुमार, झाकीर हुसेन, अब्दुल हलीम जाफर खाँ अशा वादकांना त्यांनी साथ केली. आता त्यांची मुले भरत कामत आणि सुभाष कामत तबलावादनाचा वारसा पुढे चालवत आहेत.

*** 'संशयकल्लोळ'ची रोहिणी काळाच्या पडद्याआड**

छोटा गंधर्व यांच्या भूमिकेने रंगमंचावर अगणित मानसन्मान मिळवलेल्या 'संशयकल्लोळ' या नाटकातील रोहिणीची भूमिका करणाऱ्या साताऱ्यातील मनोरमा अनंत राईलकर (९०) यांचे महागाव येथे निधन झाले.

अलिबाग येथील मनोरमा राईलकर यांनी १९४३ साली रंगभूमीवर पदार्पण केले. नाटकाच्या दौऱ्यातच सातारा येथील अनंत राईलकर यांच्याशी त्यांची ओळख होऊन लग्न झाले. या दाम्पत्याला अभिनयाचे वेड असल्याने छोटा गंधर्व, दामू अण्णा मालवणकर यांच्या नाटकात त्यांनी अभिनयाची चुणूक दाखवली.

१९४३ ते १९६३ या २० वर्षांच्या काळात त्यांनी 'शारदा' या नाटकात शारदाच्या आईची, संशयकल्लोळमध्ये रोहिणीची, पुण्यप्रभावमध्ये दामिनीची, बेबंदशाहीमध्ये चंद्राबाईची, नृत्यकथिकामध्ये यामिनीची भूमिका साकारल्या.

*** ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अ. वा. जोशी**

ज्येष्ठ शास्त्रज्ञ आणि भौतिकशास्त्राचे प्राध्यापक डॉ. अविनाश वासुदेव ऊर्फ अ.

वा. जोशी (वय ६७) यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी आणि तीन मुली असा परिवार आहे.

डॉ. जोशी यांचा जन्म दहा ऑगस्ट १९४२ रोजी झाला. नागपूर विद्यापीठातून एम.एस्सी. झाल्यावर त्यांनी १९६४ मध्ये राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा (एनसीएल) येथे पीएच.डी. केली. ब्रिटनमध्ये बर्मिंगहॅम विद्यापीठात त्यांनी संशोधन केले. भारतात परतल्यावर मेरठ विद्यापीठात प्रपाठक आणि हिमाचल विद्यापीठात प्राध्यापक म्हणून काम केले. ते १९८४ मध्ये विद्यापीठात आले. त्यांनी 'क्वांटम फिजिक्स' या विषयावर दहा पुस्तकांचे लेखन केले. काही पुस्तकांचा चिनी भाषेत अनुवाद झाला आहे. नवी दिल्ली येथील 'नॅशनल सेंटर फॉर एज्युकेशन रिसर्च अँड ट्रेनिंग' (एनसीईआरटी) तर्फे इयत्ता आठवी ते दहावीच्या भौतिकशास्त्र विषयाच्या नव्या अभ्यासक्रमाच्या पुस्तकांचे ते मुख्य संपादक होते.

अभियांत्रिकी महाविद्यालयात 'वर्ल्ड व्ह्यू ऑफ फिजिक्स' कार्यक्रमामध्ये त्यांचे योगदान होते. सेवानिवृत्त झाल्यानंतर गुजरातमधील आणंद येथील सरदार वल्लभभाई विद्यापीठात दोन वर्षे, तर 'एनसीआरए' (नॅशनल सेंटर फॉर रेडिओ अॅस्ट्रॉनॉमी) येथे तीन वर्षे 'व्हिजिटिंग सायंटिस्ट' म्हणून काम केले. या काळात त्यांनी दोन पुस्तकांचे लेखन केले. 'सकाळ'साठी त्यांनी विज्ञान विषयावर विविध लेख लिहिले आहेत.

*** समीक्षक चंद्रकांत वर्तक यांचे निधन**

कथासंग्रह, ललित गद्य, संशोधनपर ग्रंथासह प्रवास हा माझा दुसरा श्वास आहे, असे मानून पर्यटनस्थळांचा विशुद्ध निर्लेप आनंद घेतानाच साहित्यातूनही तो लोकांना देणारे कथाकार, साहित्यिक व ज्येष्ठ समीक्षक प्रा. डॉ. चंद्रकांत रामचंद्र वर्तक (वय ८०) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.


नाशिकला अमरधाममध्ये त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्ययात्रेला साहित्य क्षेत्रातील विविध मान्यवर उपस्थित होते. कथासंग्रह, ललितगद्य, समीक्षा संशोधन, प्रवासवर्णनासह त्यांनी तीसहून अधिक पुस्तके लिहिली आहेत. कुसुमाग्रज प्रतिष्ठान साहित्यभूषण समिती, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ संशोधन समिती, नाशिक शिक्षणप्रसारक मंडळासह महाराष्ट्र साहित्य संस्कृती महामंडळ, मराठी विश्वकोश सल्लागार समिती, शासकीय सांस्कृतिक महामंडळासह विविध संस्थांवर त्यांनी काम केले.

❒

**नवे कोरे**

## रोबॉट फिक्सिंग

**निरंजन घाटे**




**१३०रु. पोस्टेज २५रु.**

आजकाल मॅच फिक्सिंगबद्दल बरंच बोललं जातं. विज्ञान तंत्रज्ञानाची प्रगती पाहता रोबॉट फिक्सिंगचे दिवसही लांब नाहीत, हे आपल्या लक्षात यायला हवं.

घाटे यांच्या विज्ञानकथांना बराच मोठा वाचकवर्ग लाभलेला आहे. मध्यंतरी विज्ञानविषयकलेख लिहिताना त्यांनी विज्ञानकथांकडे दुर्लक्ष केलं की काय, असं वाटू लागलं होतं; पण हा नवा विज्ञानकथासंग्रह घाटे यांनी विज्ञानकथा लेखनाकडे दुर्लक्ष केले नाही, हे सिद्ध करेल.

रोबॉट, म्हणजे यंत्रमानव हा तर घाटे यांचा आवडता आणि हातखंडा विषय; पण या कथासंग्रहात 'रोबॉट फिक्सिंग'शिवाय इतर यंत्रमानवी कथांबरोबर यंत्रमानवरहित विज्ञानकथाही आढळतील. घाटे यांच्या वाचकांची या कथा निश्चितच निराशा करणार नाहीत, याची खात्री देता येते.

— — — — — — — — — — — — — —

## स्वप्नचौर्य


**निरंजन घाटे**

विज्ञानकथा ही मानवाला भविष्यकाळात विज्ञान तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळं समाजावर आणि मानवी व्यक्तीगत जीवनावर कोणते परिणाम होऊ शकतील याची पूर्व कल्पना देते.

आगामी चित्रपटातील काही दृश्यं दाखवून चित्रपटाबद्दल प्रेक्षकांना जाणीव करून देणाऱ्या 'ट्रेलर'चाच हा एक प्रकार असतो. त्याच बरोबर विज्ञानकथा काही प्रमाणात आजच्या जीवनावरही भाष्य करीत असते. या सर्व बाबींची चुणूक 'स्वप्नचौर्य' मधे वाचकास वाचायला मिळेल.




**१२०रु. पोस्टेज २५रु.**



# बालनगरी

अनुक्रमणिका

चला गाऊ या
जीवनगाथा १०१

# चला गाऊ या जीवनगाथा



'बाबूजी! बाबूजी!'

दरवाज्यावरील दरवानाची दृष्टी चुकवून कुमार आत धावत गेला. थेट बाबूजींच्या खोलीतच. बाबूजींचे पत्रलेखन सुरू होते. चेहरा गंभीर होता. दुपारी कार्यकर्ते येणार होते. शिवाय सायंकाळी त्यांना पाटण्याला निघायचे होते. कुमार अवेळी आलेला पाहून त्याच्या पाठीवरून हात फिरवीत बाबूजी म्हणाले,

''कुमार, शाळा नाही?''

''नाही कशी? आज तर आमच्या शाळेचा वाढदिवस, बक्षीस समारंभ आणि ही आमची निमत्रंण पत्रिका!''

कुमारने बाबूजींच्या टेबलावर आमंत्रण पत्रिका आपटली. बाबूजींनी विचारले,

''मग तुला एखादं बक्षीस आहे ना?''

''आहे की! कथा कथनाचं.''

''कोणती गोष्ट सांगितली होतीस?''

''तुमची आवडती- अभिमन्यूची.''

''शाब्बास, मग काय जोर आहे बुवा!''

''कसला जोर नी काय...''

''का रे?''

कुमार गंभीर झाला. त्याचे डोळे भरून आले. कंठ दाटून तो म्हणाला.

''पण बाबूजी, ठरलेले पाव्हणेच येणार नाहीत. मघाशीच तार आली त्यांची.''

''माझ्या घराजवळ शाळा आहे, म्हणून घाबरले नाहीत ना!''

''तुम्हाला लोक घाबरतात?''

''अरे, खरं बोलणाऱ्याला, मायभूमीवर प्रेम करणाऱ्याला सारं जग घाबरतं. बरं मग पुढं काय झालं?''

''कुणालाच काही सुचेनासं झालं. आम्हा मुलांना तर खूप वाईट वाटलं. दोन-तीन मुलं तर रडलीच.''

''अरेरे, असं व्हायला नको होतं.''

कुमारला धीर आला. थोडी धिटाई करून तो म्हणाला,

''बाबूजी, एक विचारू?''

''हो, जरूर विचार.''

''तुम्ही, याल पाहुणे म्हणून?''

''कोण मी?''

''हो, हो तुम्हीच. मोठमोठ्या कॉलेजांत जाता, मग आमच्या शाळेत यायला काय हरकत आहे? मला माहिती आहे, आमची शाळा लहान म्हणून तुम्ही येत नाही?''

''तसं नव्हे, पण तुमचे गुरुजी...''

''मी सांगितलंय त्यांना.''

''मग काय म्हणाले ते?''

''म्हणाले, बंगाली वाघ मेंढरांच्या कळपात कसा येईल? त्याला भाग्य लागतं.''

''असं म्हणाले ते?''

''मी त्यांना म्हटलं.''

''काय म्हटलंस?''

''आमचे बाबूजी फार फार चांगले आहेत. त्यांना मुलं फार आवडतात. मी आणतो त्यांना.''

''अरे लबाडा.''

''बाबूजी, आता चला नाहीतर मी मित्रांना नी गुरुजींना तोंड कसं दाखवू?''

''येईन मी. ही नेऊन दे चिठ्ठी तुझ्या गुरुजींना.''

बाबूजींची चिठ्ठी घेऊन कुमार तीरासारखा धावत गेला. चिठ्ठी गुरुजींना दिली. गुरुजी वाचू लागले, 'ठीक चार वाजता येत आहे. फक्त वीसच मिनिटं बक्षीसं वाटीन. दोन शब्द सांगेन. प्रस्तावना नको, आभार

नकोत, हारतुरे नकोत, चहापान नको, वाहन नको, कोणी बोलवायला नको. तयारी ठेवा.'

शाळेचा आनंद गगनात मावेना. सर्वांची एकच धांदल उडाली. बैठक घातली. टेबलखुर्ची मांडली. बक्षीसांचे टेबल सजले. मुले स्वागतासाठी दुतर्फा उभी राहिली.

बाबूजी आले. 'वंदे मातरम्'च्या घोषणांनी सारा आवार निनादून गेला. थेट खुर्चीकडे बाबूजी गेले. मुले व शिक्षक जाग्यावर बसले. सर्वत्र शांतता पसरली. बाबूजी उठून म्हणाले,

''वाचा बक्षीसांची यादी. एकजण हातात बक्षीस द्या. मुलं घेऊन जातील.''

बक्षीसे वाटून झाली. बाबूजी बोलायला उठले. प्रत्येकजण जिवाचे कान करून एकू लागला. बाबूजी बोलले,

''बाळांनो, मला फार वेळ नाही. वाईट वाटतं. कुमारसारख्या कोवळया कुमार-कुमारींची शाळा म्हणून आलो. भारतमातेचे उद्याचे तुम्ही रक्षक म्हणून आज एवढंच सांगतो,

– खरा गुरू ओळखा आणि त्याचीच आज्ञा पाळा. तोच तुमचा मार्गदर्शक.

– आपलं पहिलं काम पारतंत्र्यातल्या मायभूमीला स्वतंत्र करणं! त्यासाठी साहसी व्हा, धाडसी व्हा,

अन्यायाचा निर्भयपणे प्रतिकार करा.

– पटेल तेच आचरणात आणा. कोणी काही म्हणोत. ध्रुवानं ध्रुवपद मिळवलं. रामानं त्राटिका मारली. कृष्णानं कंस मारला. कारण त्यांना ते पटलं होतं. ध्यानात ठेवा, प्रथम स्वराज्यासाठी मग सुराज्यासाठी लढावं लागतंच. विस्तवाशी खेळ असतो तो. यालाच जगणं म्हणतात. असलं जगणं जगाल तर मायभूमी स्वातंत्र्याबरोबर समृद्धतेचं शिखर गाठेल.

– परमेश्वर तुम्हांला असलं तेजस्वी जीवन जगण्याची, विस्तवाशी खेळ खेळण्याची शक्ती देवो. येतो, मी.'

वीज कडाडावी. डोळे दिपावेत. वीज नाहीशी व्हावी. तसे झाले. बाबूजी निघून गेले. सर्वांनी पाहिले. डोळयांवर कुणाचाच विश्वास बसेना.

केवढा विलक्षण प्रसंग!

कोणी म्हणतात बाबूजी अजून आहेत, कोणी म्हणतात नाहीत. पण कोट्यवधी आबाल-वृद्धांच्या अंतःकरणात या नेताजी सुभाषबाबूंची तेजस्वी, ओजस्वी, भव्य, दिव्य मूर्ती कोरलेली आहे. त्यांची स्फूर्तिदायी जीवनगाथा आपण गाऊ या.

नेताजी सुभाषचंद्र बोस

- रा. वा. शेवडे गुरुजी


# चित्र रंगवा






# मार्ग शोधा..

जेरीला त्याच्या चिझ पर्यंत पोहचण्यासाठी मदत करा.





# विज्ञान नवलाई


## डॉ. बाळ फोंडके





आश्चर्यजनक
गोष्टींचा हा
नजराणा म्हणजे
विज्ञान नवलाई








**किंमत प्रत्येकी**
**३०रु.**

पोस्टेज एकत्रित
४०रु.




६ पुस्तकांचा एकत्र संच घेणे आवश्यक आहे.

# संस्कारक्षम कथा / कविता

वि. स. खांडेकर





| | |
|---|---|
| सूर्यास्त | ३० |
| यज्ञकुंड. | ३० |
| मध्यरात्र | ४० |
| घरटे | ४० |
| अस्थी | ३० |

पोस्टेज प्रत्येकी २०रु.

---

भारतीय शूर जवानांच्या शौर्याची स्फूर्ती गीते




**सैनिक हो... तुमच्यासाठी**

आनंद यादव

किंमत ३०रु. पोस्टेज २०रु.

# फ्रँकलिन

पोलेत बूर्ज्वा   अनु. मंजूषा आमडेकर



‘फ्रँकलिन’ कासवाच्या धमाल गोष्टींची मालिका आता मराठीत!

* **फ्रँकलिनची दादागिरी**
* **फ्रँकलिन थाप मारतो**
* **फ्रँकलिन आणि दंतपरी**
* **फ्रँकलिन आणि अंधारगुडुप**
* **फ्रँकलिन आणि पाळीव प्राणी**
* **फ्रँकलिनचा पसारा**
* **फ्रँकलिन हरवतो**
* **फ्रँकलिन आणि फुटबॉल स्पर्धा**
* **चल,आटप लवकर,फ्रँकलिन**
* **फ्रँकलिन आणि हरवलेला कॅमेरा**
* **फ्रँकलिन शाळेत जातो**
* **फ्रँकलिनचं पांघरूण**
* **फ्रँकलिन आणि सण**
* **फ्रँकलिनचा वाईट दिवस**
* **फ्रँकलिन सायकल चालवतो**
* **फ्रँकलिनचा नवा मित्र**
* **फ्रँकलिन आणि वादळी पाऊस**
* **फ्रँकलिन आणि रात्रीची धमाल**
* **शाळेच्या नाटकात फ्रँकलिन**

किंमत प्रत्येकी
५०रु.
पोस्टेज एकत्रित
५०रु.

# The Secret Seven
# द सीक्रेट सेव्हन

**धडाकेबाज छोट्या सात गुप्तहेरांची**
**१५ पुस्तकांची साहसपूर्ण मालिका...**


- द सीक्रेट सेव्हन
- सीक्रेट सेव्हनची साहसी मोहीम
- शाब्बास, सीक्रेट सेव्हन
- रहस्याच्या मागावर सीक्रेट सेव्हन
- आगे बढो, सीक्रेट सेव्हन
- सीक्रेट सेव्हनची यशस्वी कामगिरी
- सीक्रेट सेव्हनची सरशी
- सीक्रेट सेव्हन झिंदाबाद
- सीक्रेट सेव्हन आणि रहस्य
- सीक्रेट सेव्हन समोर कोडं
- सीक्रेट सेव्हनची आतषबाजी
- 'गुणवान' सीक्रेट सेव्हन
- सीक्रेट सेव्हनला धक्का
- सावधान! सीक्रेट सेव्हन
- सीक्रेट सेव्हनची गम्मत जम्मत

**एनिड ब्लायटन | अनु. प्रियंका कुलकर्णी**

**किंमत प्रत्येकी ८०रु. | संपूर्ण सेटची किंमत ९९९रु.**

**एकत्रित पोस्टेज ४० रु.**


# दिस श्रावणाचे आले..



दिस श्रावणाचे आले
मन सैरभैर झाले
ओल्या चिंब रानातून
खग आकाशी उडाले

दिस श्रावणाचे आले
ओल्या मातीचा सुवास
निळयाशार आभाळात
इंद्रधनूचा आभास

दिस श्रावणाचे आले
रानफुलांचा बहर
पानापानांवर
थेंबाथेंबांचा कहर



दिस श्रावणाचे आले
नवे ताटवे डोलती
झाडाझाडांतून
राघू मंजूळ बोलती

दिस श्रावणाचे आले
रानावनात जागर
काळयाशार पत्थरात
दह्यादुधाचे पाझर

दिस श्रावणाचे आले
पाहा हवेत गारवा
दूर कोठूनसा
ऐकू येतसे मारवा

नंदकिशोर शुक्ल
श्रीकृष्ण टॉकिज समोर
चाळीसगाव, जळगाव

# ओळखा पाहू



‘२६/११’च्या हल्ल्यात
कसाबला जिवंत पकडणारे
पोलिस निरीक्षक

विजेत्यास रु. १०१ चे रोख
पारितोषिक दिले जाईल.

आपली उत्तरे दिनांक ५ सप्टेंबर २०१० पर्यंत आम्हाला मिळायलाहवीत. बरोबर उत्तरे देणाऱ्यांपैकी एकाची ड्रॉ पद्धतीने निवड करण्यात येईल. निकाल ऑक्टोबर २०१०च्या अंकात जाहीर होईल.

**उत्तरे पाठविण्याचा पत्ता :**

मेहता पब्लिशिंग हाऊस, माडीवाले कॉलनी, १९४१ सदाशिव पेठ, पुणे-४११ ०३०.

‘जून’ अंकातील ‘ओळखा पाहू’चे उत्तर

नामवंत विनोदी लेखक - बाळ गाडगीळ

स्पर्धेचे विजेते - **निर्मला पाटील - नाशिक**

अनिल दिवाकर, दिनेश जोशी, प्रभाकर साठे - नागपूर, नंदकुमार बडगुजर, श्रीनिवास कर्वे, दादासाहेब कुलकर्णी - जळगांव, गो. का. आकूत, रमेश थेटे, शि. वा. आठवले, रा. द. ढुमणे, विश्वास काळे, अशोक कुलकर्णी, सुजाता काळे, सतीष गोळवलकर - पुणे, वैशाली कुऱ्हेकर, गिरीजा कंठे, उषा कंठे, संजीवनी गायकवाड - अमरावती, भीमराव गुंडे, अतुल जाधव, सुनीता नगरकर, सुरेखा कोंडे, मिनाक्षी जातेगावकर, वैशाली संगमनेरकर - सोलापूर, गौरी गायकवाड, चिन्मय माने, दिपीका शेटे, साहिल बेंद्रे, अमर क्षिरसागर, केदार जोशी - नाशिक.

**प्रायोजक**

श्री.राजू जगदीशचंद्र मेहता, मे. हिराचंद नानचंद अँड कंपनी,
**साडी आडतीचे व लुंगीचे होलसेल व्यापारी**
टिळक चौक, मालेगाव, **जि.नाशिक.**

**सूचना -** प्रायोजकांच्या पत्त्यावर उत्तरे पाठवू नका.

# मेहता मराठी ग्रंथजगत

**एप्रिल २००९ पासून वर्गणीदारांसाठी पुस्तक खरेदीवर सवलत**

**एक वर्षाला २०% तीन वर्षांना २५% पाच वर्षांना ३०%**

**एक वर्षाची वर्गणी १५०रु.**

**तीन वर्षांची वर्गणी ३५०रु.**


**पाच वर्षांची वर्गणी ५००रु.**

**तीन किंवा पाच वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट**

३ वर्षांची वर्गणी पाठवल्यास
**'चतुर बोकोबा' आणि 'नशीबवान शेखर'**
लेखिका : वृषाली पटवर्धन
प्रत्येकी ३० रु. ची पुस्तके भेट!

पोस्टेज २० रु.

५ वर्षांची वर्गणी पाठवल्यास
**'शिवणकला–एक छंद'**
(सलवार कमीज । स्कर्ट–ब्लाऊज इव्हिनिंग गाऊन्स । मिडी)
लेखिका : हेमा कळके
हे ८० रु. चे पुस्तक भेट !
पोस्टेज २० रु.







**भेट पुस्तके प्रती शिल्लक असेपर्यंतच**

**मेहता मराठी ग्रंथजगत,** द्वारा मेहता पब्लिशिंग हाऊस,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे ४११ ०३०. फोन - (०२०) २४४७६९२४

**वर्गणी मनीऑर्डर अथवा डिमांड ड्राफ्टने वरील पत्त्यावर पाठवावी.**

RNI NO-MAHMAR/2000/2739 Licence to post WITHOUT PREPAYMENT/
Regd.No.:L2/RNP/PNW/M/184/09-2011/ L.NO.LWP-50/Posted at Marketyard Pso, Pune
Posting Date 11 August 2010


न
वी
न

# द बॉय इन द स्ट्राइप्ड पायजमाज्

ब्रूनोच्या पोटात एक कळ उठली.
आतमध्ये, अगदी खोल मोठी खळबळ माजली आहे, हे त्याला जाणवलं...
हे जे चाललं आहे;
त्याचे परिणाम भविष्यकाळात कुणाला न कुणाला भोगावे लागणार आहेत हे जगाला
मोठ्यानं ओरडून सांगावसं त्याला तीव्रतेनं वाटलं.




ही गोष्ट दुसऱ्या महायुद्धाच्या सुमाराची-जर्मनीत घडणारी. या युद्धाचे जगावर झालेले भीषण परिणाम आपल्याला माहीतच आहेत; परंतु या युद्धाशी निगडित छोट्या छोट्या गोष्टींनी एका लहान मुलाच्या भावविश्वात किती मोठी उलथा-पालथ झाली त्याची ही गोष्ट.
ही संपूर्ण कहाणी ब्रूनो या नऊ वर्षांच्या मुलाच्या नजरेतून आपल्यापुढे उलगडत जाते.

**जॉन बायेन** अनुवाद : **मुक्ता देशपांडे**
**किंमत– १२० रु. पोस्टेज –२० रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे – ३०. फोन – (०२०) २४४७६९२४


प्रति, ______________________

______________________

______________________

______________________

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट, ३५६, अ गणेश पेठ, पुणे २.